प्रऱ्हाद बोलोनि असें द्विजांला जाला उगा ध्यात अधोक्षजाला; ।
पुढें न बोलेच पुरोहितातें, तातें दिला धाडुनि जो हितातें. ॥ ३८
तों बुद्धि कोपें खवळे द्विजाची जाची म्हणे, 'टाकि कथा अजाची, ।
बाबूल हें चंदनकाननाशीं नाशील भेटोनि निरंजनासी. ॥ ३९
प्रऱ्हाद हा विष्णुकुठारदंड, दंड प्रसंगें असुरां उदंड, ।
दैत्याचिया चंदनकाननासी नाशील भेटोनि निरंजनासी.' ॥ ४०
भविष्यानुरूपें वदे विप्र वाणी न ते तर्जनाभर्जनालागिं वाणी, ।
असे दंडें दुःशब्द दंडें करीती, पुन्हा शीकवीती तया लोकरीती. ॥ ४१
तों रीति ते दानववैभवाची वाची मनींच स्मृति माधवाची ।
बाहेर आणी न अधोक्षजाला जाला भला, हें गमलें द्विजांला. ॥ ४२
बापास तों भेटविती सुतातें तातें निजांकावरि सुव्रतातें ।
घेतां सुखाची न दिसेचि वाणी वांणी वदे राजस मंजुवाणी. ॥ ४३
'बा ! शीकलासि गुरुपासुनि जो पसारा सारा असो, तुज रुचे वद त्याच सारा.'।
गोष्टी वदे कुशल यावरि ज्या पित्याला त्या लागतील मधुरा न कदापि त्याला.॥ ४४

'श्रवण हरिकथेतें, कीर्तनीं गात जावें,
स्मरण चरणसेवा अर्चनीं हो ! भजावें, ।
नमन करुनि दास्यें सख्य आत्मार्पणातें
करुनि तरति वाटे सार हें आपणातें.' ॥ ४५

हिरण्यकशिपू स्वयें परिसतां अशी वैखरी
म्हणे 'गुरुसुता ! तुझी कपटमित्रता हे खरी.' ।
पुरोहित वदे, 'न मी, न जन अन्य, हा भाव दे;
अजी ! सहज बुद्धि कीं तव कुमार जें जें वदे.' ॥ ४६
'गुरुमुखें, न अरे ! जरि शीकशी कुमति उद्भवली तुज हे कशी ?' ।
सुत म्हणे, 'विषयांत सदा पित्या ! अशि न बुद्धि नरासि कदापि त्यां.॥ ४७

१. विष्णूला. 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः' इति उद्योगपर्वणि. 'द्यौरक्षं पृथिवी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥.' २. पुरोहिताची. ३. ईश्वराची. ४. चंदनवन. ५. निष्कलंक. ६. कुऱ्हाडीचा दांडा. ७. पुष्कळ. ८. कमताई. ९. शिक्षा. १०. शब्द. ११. मंजुळ. १२. स्कंध ७ अ० ५ श्लो० २२ पहा. १३. सगळा. १४. मुख्य. (उत्तमांश.) १५. पूजा. १६. दासभावानें कर्मार्पण करणें. १७. विश्वासादि. १८. आत्मनिवेदन, देहसमर्पण. १९. अशी नवलक्षणा भक्ति करून लोक तरतात (अध्याय ५ श्लोक २३–२४). २०. वाणी. २१. हा मुलगा मत्प्रणीत अथवा अन्यप्रणीत बोलतो असें नाहीं. २२. स्वाभाविक. २३. अध्याय ५ श्लोक ३०–३२ पहा. २४. त्या विषयासक्त नराला.

[1]सार मानित असे [2]विषयांतें, विष्णुभक्ति गमते विष यातें; ।
न स्वयें हरि तयां प्रिय वाटे बोधिला परि न ये च सुवाटे. ॥ ४८
सर्व प्रयत्नें भजती [3]गृहातें, न सेविती [4]भागवतां [5]महातें, ।
[6]गृहाव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे [7]भवभंजनाची. ॥ ४९
जे दीस नेती धनमानसंगें, कीं रात्रि निद्रासुरतप्रसंगें, ।
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची. ॥ ५०
चिंता मनीं नित्य असे गृहाची, त्याला गमे कीं पुरुषार्थ हाची, ।
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची. ॥ ५१
चिंता मनीं एक वसे गृहाची चिंतामणी प्राप्त तरी स्पृहाची, ।
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची. ॥ ५२
करोनि पापें भरती गृहातें जे दोष आरोपिति निस्पृहातें, ।
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची. ॥ ५३
टाकिलें जरि अजी विषयांतें, वाटलें गृह जरी विष यांतें, ।
प्रीति जों जलजनाभजनाची घे न तों मति नये भजनाची. ॥ ५४

हरी तंतू आड त्रिभुवनपटाचा पदर जी !
असे जो लोळेना नर गुरुवराच्या पदरजीं, ।
जडीं दावी ब्रह्म श्रुति निकर, त्याच्याच करजीं
विदेही देही ही अमर जगदानंदकर जीं. ॥ ५५

हे तों गुरु पापतरू म्हणावे, अंधाहुनी अंध असे गणावे; ।
दे प्रीति कृष्णीं गुरु तोच साच, श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच. ॥ ५६
[8]पशू जसे चाविति [9]चाविल्यातें, पुनः पुन्हा सेविति सेविल्यातें, ।
कृष्णीं नव्हे प्रीति कदापि त्यांला.' प्रल्हाद इत्यादि वदे पित्याला. ॥५७

करी जो प्रल्हाद प्रिय भजनवार्ता च परमा
रमाकांताच्या त्या चरणिं मन पावे उपरमा. ।
रमाया ही वृत्ती हरिच जग होऊनि पसरे
सरे द्वैतभ्रांती स्वपरअनुसंधान विसरे. ॥ ५८

असें वर्णितां वर्णितां त्या अजाला पित्याचेच [10]अंकीं [11]समाधिस्थ जाला. ।
अहो ! तों स्वमांडीवरूनी अभाग्यें दिला लोटुनी लभ्य जो पूर्वभाग्यें. ॥५९

---

१. श्रेष्ठ. २. 'सार मानितिल जे विषयांतें' असाही पाठ आहे. ३. स्त्रीपुत्रादिसंसारातें. ४. विष्णुभक्तांला. ५. विष्णूला. ६. गृहरूपी व्रतामध्यें, प्रापंचिक विषयांत. ७. ईश्वराची. ८. वृषभ. ९. चर्वितचर्वण करतात. १०. मांडी. ११. ध्याननिमग्न.

ताऊनि डोळे अतिकोपतापें 'मारा' म्हणे 'राक्षस हो! प्रतापें; ।
कुपुत्र पोटांतिल रोग वाटे, छेदूनि लावा यमलोकवाटे. ॥ ६०
याचा वधी जो चुलता सखा रे! हा त्यास पूजी, तुम्हि यास खा रे!।
दांतें नखें पर्वतशस्त्रपातें मारा' म्हणे राक्षस निस्त्रपातें. ॥ ६१
'जो विष्णु माझा स्वपितृव्यहंता त्यातें भजों केंवि, न हे अहंता; ।
वैरी महा आपुलिया पित्याचा जाणे असें दास तथापि त्याचा. ॥ ६२
मी बाप, माझी नलगे च माया, तो आवडे विष्णु कुलाधमा या, ।
हें पांचवें वर्षच्चि या कुमारा, तों हा असा; सत्वर यास मारा.' ॥ ६३
उचंबळे कोप मनीं न सांचे, साचे च ते भार हि राक्षसांचे ।
गदात्रिशूळीं करिती क्षतातें, तातें स्वयें मारवितां सुतातें. ॥ ६४
ते मारिती, बाप म्हणेचि, 'मारा मारा,' न लागे तरि त्या कुमारा. ।
न सोडिते खड्ग, रुते न भाला, भा लागते कीं तम ही नभाला. ॥ ६५
शस्त्रें क्षतें न करितां अजितव्रतातें शंका मनीं धरियली अजि तीव्र तातें, ।
तों मारणादि करवूनि अघात पातें 'त्यातें वधीनचि' म्हणे खळ घात पातें.॥६६
न अग्नि ही माजि अहो जळाला, न मग्न तो ही करवे जळाला, ।
उरावरी आदळि पर्वतातें, केलें उपायांतर सर्व तातें. ॥ ६७
इत्यादि केले जरि घात नाना तो विष्णुनामें करितो तनाना. ।
मुखीं मनीं तोचि, मनीं हरी तो, नेत्रीं हरी, दिग्भ्रम जो हरीतो. ॥ ६८
प्रन्हाद इत्यादिक भाव दावी ती भक्ति त्याची किति हो! वदावी? ।
नें मृत्यु एवं च कदापि त्याला, वाटे मनीं धाक तयीं पित्याला. ॥६९
चिंतर्णवांत बुडतां असुराधमातें वाटे मनीं मरण याच निमित्त मातें, ।
तों नीतिनें करिति [11]ते द्विज बोध राया, कीं, '[12]बाळचेष्टित न योग्य मनीं धराया.
वडिल शुक्र तपाहुनि ये कवी तरि सुबुद्धि अशास हि शीकवी; ।
'[13]जरि असा तरि बुद्ध चि तो असे.' भृगुकुमार भयें वदती [14]ऐसें. ॥ ७१
राजा म्हणे मग तयांच पुरोहितांतें कीं, 'यास न्या स्वसदनीं, शिकवा हितातें, ।
ऐसें करा त्वरित कीं धरि लोकरीती.[15]' [16]नेऊनि त्या द्विज गृहास तसें करीती. ॥

---

१. अध्याय ५ श्लोक ३७ पहा. २. हिरण्याक्ष. ३. निर्लज्ज. ४. चुलत्यातें मारणारा. ५. अध्याय ५ श्लोक ३६ पहा. ६. तेज. ७. आकाश. ८. अन्य उपाय. ९. 'एवं नव्हे मृत्यु कदापि त्याला' असाही पाठ आहे. १०. चिंतासागर. ११. शंड आणि अमर्क. १२. अध्याय ५ श्लोक ४९ पहा. १३. 'परि वरें जरि' असाही पाठ आहे. १४. अध्याय ५ श्लोक ५० पहा. १५. गृहमेधिराजांचे धर्म शिकवावे, असें मूळांत आहे (अध्याय ५ श्लोक ५१). १६. 'नेऊनियां द्विज तसेंचि तया करीती' असाही पाठ आहे.

तेथें मुलें जीं गुरुगेहवासी तीं योजिलीं सर्व जगन्निवासीं, ।
त्या दैत्यबाळां गुरु हाचि झाला, जो दाखवीतो स्वसुखा अजाला. ॥ ७३
मुलांस ही विस्मय फार वाटे कीं, 'लागला हाचि कसा सुवाटे ?' ।
ते पूसती हें तरि या द्विजांला, 'ठावें न तूंतें गुरु कोण जाला ?' ॥ ७४
प्रन्हाद सांगे, 'स्वपिता तपातें जाऊनि सोशी हिमआंतपातें, ।
इंद्रासि मागे विजयी शिराणी धरूनि नेंतां दितिजेंद्रराणी. ॥ ७५
गर्भांत मी हें भय तीस वाटे तों भेटला तो मुनिवर्य वाटे. ।
म्हणे, 'सतीची हरिसी त्रपा हे सहस्रनेत्रा! निज गोत्र पाहें.' ॥ ७६
म्हणे इंद्र, 'पोटीं इच्या पुत्र वाटे तया जन्मतां लावणें मृत्युवाटे. ।
प्रतापें दिसे अग्निकुंडीं विधूमीं, वधूनी तया सोडवीतों वधू मी.' ॥ ७७

ऋषी बोले भक्त त्रिभुवनपतीचा परम हा
महायोगी इंद्रा! करिसि झणि ऐसा नियम हा, ।
महात्मा हा, ज्याची अचळ हरिसेवाविभवधी,
वधी यातें कोण ? प्रभु कवच ज्याचें निरवधी. ॥ ७८

इंद्रें भिऊनि नमिली दितिजेंद्रराणी; हो सुप्रसन्न, हरिभक्ति अशा शिराणी, ।
जातां सुरेंद्र इस सांडुनियां स्ववाटे केली प्रदक्षिण, गुरू हरिभक्त वाटे. ॥ ७९

---

१. घर. २. जगन्निवासाचें ध्यान पूजन करणारी भक्त बनविलीं. ते खेळ सोडून प्रन्हादाच्या शिक्षणानें विष्णूपासक झाले—असा भावार्थ. ३. प्रन्हाद. ४.'जो दाखवी स्वात्मसुखा अजाला' असाही पाठ आहे. ५. मंदराचलावर जाऊन हिरण्यकशिपूनें घोर तपश्चर्या केली. ६. थंडी. ७. उष्ण. ८. दैत्यश्रेष्ठाची राणी (हिरण्यकशिपुस्त्री—कयाधू). हिला इंद्र घेऊन जाई, तेव्हां ती देवदानवयुद्धांत विजयी झालेल्या इंद्रापाशीं शिराणी (स्वइच्छा) मागे. ९. प्रन्हाद त्या समयीं गर्भांतरीं होता. १०. 'तों भेटला नारद त्यास वाटे' असाही पाठ आहे. ११. नारद. (अ० ७ श्लो०७). १२. पतिव्रतेची, दैत्यराजमहिषीची. १३. लाज. १४. हे इंद्रा. (इंद्रानें अहल्येशीं व्यभिचारकर्म केलें म्हणून तिच्या पतीनें (गौतममुनीनें) 'तुझ्या अंगास हजार (सहस्र) भगें पडतील' असा त्याला शाप दिला. तेव्हां त्यानें मुनीची बहुतप्रकारें आराधना केल्यावर मुनी प्रसन्न होऊन 'तीं भगें नेत्रें होतील' असा त्यास उःशाप दिला. या कारणास्तव इंद्राला 'सहस्रनेत्र' अशी संज्ञा आहे.) १५. शरीर. १६. प्रतापानें धूमरहित कुंडांतील अग्नि असा हा (होणारा पुत्र) दिसतो. १७. धूमरहित. १८ नारद. (अ० ७ श्लो० १०). १९. ईश्वर. २०. परमभक्त, महाभागवत. २१. अविनाशी. २२. हरिभक्त हे गुरु (सन्मान्य पुरुष) असें समजून इंद्रानें कयाधूला प्रदक्षिणा घातली. (अध्याय ७ श्लोक ११).

जननिलाच तयीं मुनिशेखरें श्रुतिरहस्य निरूपियलें खरें. ।
'परि मदर्थ अनुग्रह तो करी, उमजला मजला हरि लौकरी. ॥ ८०
उमजला मजला हरि ज्या मुखें गुरुच तो रुचतो हृदयीं सुखें. ।
शिकवणें कवणें मज त्याविना? निजपणीं जपणी जड दाविना. ॥ ८१
मानूनि मिथ्या, नें गणी भैवासी होतों बहू वत्सर गर्भवासी, ।
भिऊनियां या असुरप्रसंगा त्याच्याच या दुर्जन विप्रसंगा. ॥ ८२
प्रपंच मिथ्या, परि दुष्टसंगें वाटे खरासा विषयप्रसंगें, ।
भ्यावें कुसंगा, परि साधकानें न शब्द त्याचा धरिजे स्वकानें.' ॥ ८३
दैत्यार्भकां ही हित शुद्ध वाटे, समस्त ते लागति त्यांच वाटे, ।
हें सर्वही आयकतांच तातें पाचारिलें क्रोधवशें सुतातें. ॥ ८४
गाळीप्रदानीं न करूनि वाणी वाणी वदे हो! अपवित्रवाणी. ।
म्हणे, 'मरूं इच्छिसि रे! निवातें मारीन जो तूं न भिसीच मातें.॥८५
मी क्रुद्ध होतां मज लोक सारे भीती, भिसी एक न तूं कसा रे? ।
या शासना लंघिशि दुर्गमातें कोण्या बळें? सत्वर सांग मातें.' ॥ ८६
प्रऱ्हाद बोले, 'जग गांजितोसी ज्याच्या बळें आत्मपणें जितोसी, ।
रक्षी अनाथा मज ही हरी तो, ज्याला असा बापचि संहरीतो. ॥ ८७
माझें तुझें बळचि तों इतुकेंचि नाहीं, त्याचेंच कीं बळ असे सकळा जना ही; ।
तूं शत्रु मानिसि तया असुरस्वभावें तो टाकिं, देखसिल त्यास निजात्मभावें. ॥
जिंकिले म्हणसि लोक हि सारे त्यांस नागविसि तस्करसा रे! ।
ते न ज्यास वश होति, मनीं च स्वर्ग मृत्यु जित मानिति नीच. ॥८९
शत्रु सों स्वहृदयींच रहाती, नित्य नागविति हें न पहाती; ।
शासनें दश दिशांत करीती देखतों अशि हि कौतुकरीती. ॥ ९०
चोर सों स्वहृदयांत रहाती आणि मानिती चराचर हातीं. ।
श्लाघ्यता स्फुट हि तेच करीती देखतों अशि हि कौतुकरीती. ॥ ९१

---

१. धर्मतत्त्वज्ञान, आत्मानात्मविवेकज्ञान. २. कृपा, प्रसाद. ३. कळला, ज्ञात झाला. ४. नारद. ५. 'भय मी भवासीं' असाही पाठ आहे. ६. संसार. ७. मोक्षसिद्धि इच्छिणाऱ्या पुरुषानें. ८. दुष्टाचा, विषयासक्त जनाचा. ९. बालक. १०. प्रऱ्हादाचा बोध. ११. विष्णुभक्तीच्या मार्गाला. १२. कमताई. १३. सदृश. १४. 'म्हणे खला! दैत्यकुलाधमातें' असाही पाठ आहे. १५. अ० ८ श्लो० ६–७ पहा. १६. अध्याय ८ श्लोक ८–९ पहा. १७. तो असुरस्वभाव. १८. चोरासारखा. १९. कामक्रोधादि सहा वैरी. २०. दहा दिशा स्वतः जिंकिल्या असें समजून शासन (अंमल) करतात. २१. सहा, षडिंद्रियलक्षण. २२. स्थावरजंगम.

सा शत्रु कामादिक, तूं निकामी, न जिंकिसी चित्त धरूनि कामीं. ।
कां श्लाघ्यता व्यर्थ तुवां वदावी ?' प्रऱ्हाद इत्यादिक भाव दावी. ॥ ९२
या गोष्टिनें फारचि तप्त जाला. घे खड्ग. बोले मग आत्मजाला ।
कीं, 'तूं मरूं ईच्छिसि रे ! निपातें स्वयें असें बोलसि सैंन्निपातें ? ॥ ९३
शब्दासि या उत्तर हेंचि वाटे कीं तुज लावूं यमलोकवाटे. ।
जितोसि तूं हा क्षण कोण सोसी ? मी सोसितों आइक ते असोशी. ॥ ९४
त्रिभुवनेश्वर तो मज वेगळा तुज गमे सकळांहुनि आगळा, ।
जरि दिसेल अरे ! मज ईक्षेणीं वधिन त्याच पुढें तुज ये क्षणीं. ॥ ९५

(घनाक्षरी.)

प्रऱ्हादाशीं दैत्य घोर, म्हणे, 'मज थोर थोर, ।
भीती बोलतां समोर, भें न वाटे तूजला. ॥
तूं तो तरुणा किशोर, पांचा वरुषांचा पोर, ।
म्हणसी सा जण ही चोर, नागवीती मजला. ॥
बोल बोलशी तिखट, मरों पाहसी फुकट, ।
मृत्यु आलासे निकट, नाहीं तो समजला. ॥
तुझा मीं प्रत्यक्ष काळ, कैंचा विष्णु रक्षपाळ ? ।
दिसेना जो फटकाळ, लपों जाणें लाजिला. ॥ ९६
अरे ! कोठें तुझा देव ?' म्हणे, 'सर्व वासुदेव, ।
विश्वपटीं स्वयमेव, तंतु तोचि वसतो.' ॥
दैत्य म्हणे, 'अरे ! थांब, गोष्टी ठेवीं लांब लांब, ।
मज समोर हा खांब, यांत कैसा असतो ?' ॥
म्हणे, 'स्तंभीं दारुरूप, दारूमध्यें चित्स्वरूप, ।
थिजलें तथापि तूप, रस तो न नासतो.' ॥
'तरी दिसेना कां मज ?' म्हणे, 'भजोनियां समज, ।
प्रत्यक्षहि अधोक्षज, दिसेल जो दीसतो.' ॥ ९७

(श्लोक.)

'जरि समर्थ असेल तुझा धंणी, तरि तुझी पुरवीलचि तो धैंणी, ।
परि वदें स्थळ कोण तया असे ?' म्हणुनि गर्जत शब्द करी असे. ॥ ९८

---

१. स्तुति. २. पुत्र. ३. अध्याय ७ श्लोक १२–१४ पहा. ४. त्रिदोष झाल्यामुळें. ५. नेत्रांनीं. ६. मालक, स्वामी. ७. इच्छा, तृप्ति.

'असे कोठें तो रे! तुज बहुत ज्याचे भरंवसे?'
'वसे सर्वांठायीं स्थिरचरपटीं तंतु गवसे.' ।
'दिसेना कां स्तंभीं?' 'मज दिसतसे तो नरहरी
हरीतो दुष्टांचे त्वरित मद जो एकचि हरी.' ॥ ९९
'असे स्तंभीं' ऐसें श्रवणिं पडतां शब्द असुरा
सुरापानीं मत्त स्वहित विषयीं जो निजसुरा, ।
सुराधीशद्वेषें करुनि दृढ खड्ग क्षयकरें
करें हाणी मुष्टी करुनि खळ खांबासि निकरें. ॥ १००
स्तंभ तो अवचितांचि कडाडी, अब्द झाड अवघेंचि तडाडी[7], ।
अब्जजादिहृदयांत धडाडी, काळमेघशतनाद घडाडी. ॥ १०१
(घनाक्षरी.)
'स्तंभीं दिसतसे जाण, ऐसें बोलतां सुजाण, ।
दैत्यें घेतलें उड्डाण, सिंहासनावरूनी. ॥
खवळला उग्र खळ, दातें दांत खाय खळ, ।
म्हणे, 'खांबाशि निखळ,' खड्ग मुष्टी धरुनी. ॥
तेचि समयीं कठोर, बहु भयंकर घोर ।
ध्वनि उठे महाथोर, मोठ्या बळें करुनी. ॥
म्हणे असुर विकळ, 'कोण गर्जतो विकळ?' ।
पाहे चहूंकडे खळ, लोचन पसरुनी. ॥ १०२
ध्वनि उठिला अखंड, व्यापी द्वीप खंड खंड, ।
होऊं पाहे खंड खंड, ब्रह्मांड हे विदारुनी. ॥
दिग्गजाचे चंड चंड, भग्न शुंड दंड गंड, ।
लेंढे टाकिती उदंड, पायुवायु सारुनी. ॥
भ्याले दैत्य लंडभंड, दानवेंद्र मुंड मुंड, ।
होती त्याचे पिंड पिंड, रोमांच उभारुनी. ॥
रात्रिंचर कलभंड, झाले पंड थंड थंड ।
जेव्हां सिंहरणशौंड, निघे हांक मारुनी. ॥ १०३

१. मद्य. २. झोंपीं गेलेला, अज्ञान, असावध. ३. देवेंद्राच्या द्वेषानें. ४. त्वेषानें, निग्रहानें. ५. अ० ८ श्लो० १६ पहा. ६. मेघ. ७. 'अब्जजांड अवघेंचि तडाडी' असाही पाठ आहे. ८. ब्रह्मादि.

(श्लोक.)

खरी कराया निज भृत्यवाणी आणी स्व कीं व्यापित ही न वाणी; ।
स्तंभीं सभे अद्भुत मूर्ति दावी, मनुष्य ना सिंह न ते वदावी. ॥ १०४
मनुजरूप नव्हे च न केसरी, सकळ सृष्टि करूं न सके सरी; ।
कनकवर्ण कटीं पट केशरी प्रकट होय असा नरकेसरी. ॥ १०५

पसरट मुख मोठें, आंत दंष्ट्रा कराळा,
परम चपळ जिव्हा खड्ग जैशा निराळा, ।
नयनयुगल जाणों तापलें हेमपाणी,
चहुं भुजिं नखशस्त्रें देखिला चक्रपाणी. ॥ १०६

मानी मनीं देखुनि दुष्ट भारी कीं मूर्तिनें या मज कैटभारी ।
मारील कीं जो वर धातयाचा केला चुकावा बहुधा तयाचा. ॥ १०७
सिंहावरी त्या मग दैत्यहस्ती धांवे गदा घेउनि थोर हस्तीं; ।
पतंग अग्नीवरि जेंवि जातो, हाणी गदा थोर अधोक्षजा तो. ॥ १०८
विधिवरप्रतिपालक जो हरी न दिवसा न निशींतहि संहरी, ।
म्हणुनि युद्ध निशीमुखिं तो करी, मग वधी बुडतां रवि लौकरी. ॥ १०९
अमर तो मरतो अतिलौकरी, चपळ तो पळतो धरितां करीं, ।
उखळला खळ लाववलक्षणी, विलंपती लपती सुर ते क्षणीं. ॥ ११०
आश्चर्य हें नृहरि मानुनियां महास्यें सक्रोध हास्य करि उत्कट अट्टहास्यें, ।
तों झांकिले नयन, भीति मनीं निघाली, मांडीवरी हरि अशास धरूनि घाली.॥
'न धरणीवरि मृत्यु न वा नभीं' वर असा म्हणऊनिच जो न भी; ।
निज तनूवरि त्या खळशेखरा चिरि धरूनि, करी वर ही खरा. ॥ ११२

---

१. सेवक. २. वाचा. प्रल्हादाचें व सनकादिकांचें भाषण सत्य करण्यासाठीं. ३. आपल्या विष्णुत्वास—अखिल भूतव्यापकतेस—उणेपणा न यावा यासाठीं. ४. कमताई. ५. अध्याय ८ श्लोक १८. ६. 'तनू वदावी' असाही पाठ आहे. ७. सिंह. 'मनुजरूप नव्हे नरकेसरी' असाही पाठ आहे. ८. बरोबरी. ९. केशरीरंगाचा. १०. 'पसरित' असाही पाठ आहे. ११. भयंकर, उंच, तुंग. १२. तरवार. १३. प्रतप्त चामीकरचंड. १४. सोन्याच्या रसाप्रमाणें. १५. ब्रह्मदेवाचा. १६. शलभ. (अ० ८ श्लो० २४.) १७. विष्णूला. १८. रात्रींत. १९. सायंकाळीं, संध्यासमयीं. २०. भयानें देव रडतात आणि लपून राहतात. २१. विशाल आस्यें (मुखानें). २२. भयंकर. (अ० ८ श्लो० २८.) २३. मोठ्यानें हंसणें. २४. भय पावतो. २५. खळश्रेष्ठाला, दुष्टश्रेष्ठाला. २६. ब्रह्मदेवानें दिलेला वर; शस्त्रानें मरणार नाहीं, दिवसा अथवा रात्रीं मरणार नाहीं, इत्यादि वर खरा केला.

न गेहीं[1] न बाहेर यालागिं दारीं, बसे उंबरा पोट त्याचें विदारी, ।
सजीवें अजीवें[2] मरेना तसाची चिरोनी नखें ते करी गोष्टि साची. ॥ ११३
चळवळे निसटे करि तांतडी, असुर तो हरि काढुनि आंतडीं, ।
उदर फाडुनि घालितसे गळां करि सुमंगळ देव अमंगळा[3]. ॥ ११४

(घनाक्षरी.)

मुख सिंहाचें उत्कट, नरतनु ही विकट, ।
होय नृसिंह प्रकट, विधिवररक्षणीं. ॥
नखें वज्रसीं तिखट, जिव्हा चंचल चोखट, ।
दांतीं शब्द खट खट, जाणों खड्ग दक्षणीं. ॥
बहु बहु चंड चंड, काळदंतसे उदंड, ।
ज्वाळा तोंडांत उदंड, चंद्ररश्मी रक्षणीं. ॥
कुंडलमंडित गंड, आंगीं बाणलें श्रीखंड, ।
हृदयांबुज खंड खंड दैत्याचा तये क्षणीं. ॥ ११५

चिरुनि वारणगंड[4] जसा हरी[5] असुर मारुनि शोभतसे हरी. ।
दितिज[6] तो गज, केशव केसरी[7] इतर साम्य करूं न शके सरी[8]. ॥ ११६
दितिज यूथप[9] तो मृति पावला, असुरवारण[10]यूथहि धांवला[11], ।
मृतक[12] तें ढकलोनि धरातळीं, वधि तया हरि लाथबुक्यांतळीं. ॥ ११७
पदतळें कितिएक नखें करें तुडविला दनुजेंद्रभयंकरें[13], ।
असुरनाथ नृपासन[14] त्यावरी हरि बसे परि कोप न सांवरी. ॥ ११८
'निववि कोप' असें सुर धातया[15] विनविती स्तविती बहुधा तया. ।
विधि म्हणे, 'दुरुनी च नमो[16] हरि' कवण या समयीं मन मोहरी[17]?॥ ११९
स्तविति देव अजी कनकांबरा[18] 'असुर मारियला' म्हणती 'बरा,' ।
परि अनावरकोप रमापती, सभय लोक चतुर्दश कांपती. ॥ १२०

---

१. घरीं. २. नखें सजीव अथवा निर्जीव नाहींत. ३. त्या अमंगळ असुरास (राक्षसास) देव सुमंगळ करी. ४. हत्तीचें गंडस्थल. ५. सिंह. ६. दैत्य. (दितिभार्येपासून कश्यपास झालेला.) ७. सिंह. ८. बरोबरी. ९. गजांच्या कळपाचा स्वामी. १०. हत्ती. ११. स्वामी मरण पावल्यावर असुररूप वारणांचा (हत्तींचा) यूथ (कळप) देखिल धांवून आला. १२. प्रेत. १३. असुरेंद्राला जो भयप्रद त्यानें. (देवानें.) १४. सिंहासन. १५. सुर (देव) धातया (ब्रह्मदेवाला) कोप शांत कर अशी विनवणी करून स्तवूं लागले. १६. दुरूनच हरीला नमस्कार असो. १७. मोही. १८. नृसिंहाला.

विधि प्रार्थितो तेधवां श्री[1]रमेला म्हणे, 'थोर जो दुष्ट तो स्वैर मेला, ।
करीं जाइं माते! प्रभुक्रोध शांत, त्रिलोकी भिती हे दहाही दिशांत.'॥ १२१

प्रार्थितां [2]अमृतसागरजा ते सांवरोनि कबऱ्यंबर जाते, ।
जाय पा[3]द कितिएक रमा ते, तों गमे भय [4]चराचरमाते. ॥ १२२

परततां [5]कबऱ्यंबर नावरे, पदरही हृदयावरि [6]वावरे, ।
[7]स्मरणभाव न शीघ्र तिचा वळे, नयन चंचळ, जीभहि [8]चावळे.॥ १२३

[9]मग प्रऱ्हादातें म्हणति अवघे, '[10]भक्तपरमा!
[11]रमा ब्रह्मा कीं न स्वकृत विभुकोपा [12]उपरमा, ।
रमाकांता येना तुजविण दया दैत्यदमना,
मनाच्या विश्रामा, त्वरित करिं गा! क्रोधशमना.' ॥ १२४

ज्याला भिती देव [13]विरिंचि [14]पद्मा, प्रऱ्हाद त्याच्या धरि [15]पादपद्मा, ।
आणी जया वंदित सर्व भूतें करी तया दंडवत प्रभूतें. ॥ १२५

बाळकें स्वचरणांबु[16]रुहातें वंदितां प्रभु जगद्गुरु हातें, ।
ऊचलोनि अवलोकुनि ठेवी मस्तकीं अभयहस्तक [17]ठेवी. ॥ १२६

[18]करस्पर्शें झालें परम सुख तें दै[19]त्यतनया,
न या संसाराचें स्मरण उरलें त्या सुविनया, ।
[20]नद्या नेत्रीं दोनी स्रवति, न निघे शब्द सगळा,
गळा दाटे प्रेमें, [21]त्वरित हरि जो मोह सगळा. ॥ १२७

प्रऱ्हाद याउपरि होउनि सावधान प्रेमें[22] स्तवी त्रिभुवनेश [23]दयानिधान; ।
'[24]ब्रह्मादि [25]सात्त्विक तयां कळसी न देवा! मी तों' म्हणे 'असुर राजस वासुदेवा!॥

१. लक्ष्मी. २. 'प्रार्थितां अमर सागरजा ते, सांवरोनि कनकांबर जाते' असाही पाठ आहे. ३. पावलें. ४. चराचर सृष्टीच्या जननीला. ५. कबरीवरचें (वेणीवरचें) अंबर (वस्त्र–पदर). ६. हालूं लागला, सरके. ७. तिची स्मरणशक्ति लौकर जागृत होईना, ती लौकर शुद्धीवर येईना. ८. भलभलतें बोलूं लागे. ९. अ० ९ श्लो० ३ पहा. १०. हे भक्तोत्तमा. ११. रमा किंवा ब्रह्मदेव प्रभुकोपाची शांति (उपरम) करण्यास समर्थ नाहींत. १२. नाश. १३. पितामह. १४. लक्ष्मी. १५. चरणकमळा. १६. कमळ. १७. ठेव–ठेवा, निधान, अभयहस्तकरूप ठेव. १८. प्रभूच्या हस्तस्पर्शानें. (अ० ९ श्लो० ६.) १९. प्रऱ्हादाला. २०. दोन्ही डोळ्यांतून अश्रूंच्या नद्या वाहूं लागल्या. २१. 'त्वरित हरि घे मोहुनि गळां' असाही पाठ आहे. २२. प्रेमगद्गदवाणीनें. (अ० ९ श्लो० ७.) २३. दयेचें भांडारगृह, दयेचा ठेवा. २४. ब्रह्मदेव, सुरगण, मुनि, सिद्ध इत्यादि. २५. सत्त्वगुणविशिष्ट. सत्त्वगुणसंपन्न जे ब्रह्मादि देव त्यांसही तुझें स्वरूप पूर्णपणें कळत नाहीं, मग मी जो राजसगुणसंपन्न (रजोगुणी असुर) त्या मला तें कसें कळेल?–असा भावार्थ.

भक्ती करूनि तुज गाइं अधोक्षजाला झालासि तूं स्वपददायक त्या गजाला. ।
मारूनि नक्र गति दे द्विरदा तयाला यालागिं मी स्तवितसें वरदातयाला.॥ १२९
मुखांतूनि नक्राचिया कुंजरासी जसें सोडवीलें कृपापुंजरासी ! ।
तसें सोडवीलें मला देवदेवा ! पित्याच्या करापासुनी वासुदेवा !' ॥ १३०
प्रऱ्हाद इत्यादि करी स्तुतीतें, अर्पी नृसिंहासि सरस्वतीतें. ।
कृपा तयाऊपरि देव दावी, यानंतरें तेंचि गमे वदावी. ॥ १३१
ऐशा स्तुतीनें हरि तुष्ट झाला, बोले कृपेनें असुरात्मजाला ।
कीं, 'वर्णितां या निगमागमातें संतोषलों मी, वर माग मातें'. ॥ १३२
म्हणे श्रीप्रऱ्हाद 'प्रभु ! वचन हें लोभकर जी !
रजीं मातें घाली म्हणुनि हा शब्द वरजी. ।
रजीं या पायांच्या सुख कवण नाहीं मज हरी !
हरी दुःखें सारीं तव गुणकथा श्रीनरहरी ! ॥ १३३
अंतरीं धरुनि पूर्ण रिरिक्षा, पाहतोसि निजभक्तपरीक्षा, ।
[11]अन्यथा स्वजनभावच नासी, कां वदे करुण त्या वचनासी ? ॥ १३४
स्वामीस जो वेंचिल काम्य वाणी [12]वाणीज्य ते भक्तिहि दीनवाणी, ।
वाणी च कीं सेवक वेतनाचा, निष्काम तो पंथ पुरातनाचा. ॥ १३५
जशी [13]लौकिकी भक्ति भृत्याजनाची तशी क्षुद्र देवांसही पूजनाची, ।
न तूं स्वामि तैसा, नव्हे भृत्य कामी, वरा अल्प यालागिं मागेन कां मी?॥ १३६
[14]म्हणसि मागचि जी ! कमळावरा ! त्वरित दे तरि या अमळा वरा, ।
किमपिही उपजेच न कामना करिं असें विधिच्या जनका ! मना. ॥ १३७
मनीं उद्भवे जेधवां [15]काम कांहीं, तयातें हरी तेज लज्जादिकांहीं; ।
[16]तनू प्राण सर्वेंद्रियां कष्ट भारी जळाला करीं काम हा कैटभारी ! ॥ १३८

---

१. मोक्षप्रद. २. हत्ती. इंद्रद्युम्न राजा गजयोनिमुक्त झाला या कथेकडे येथें लक्ष्य आहे. (द्वि=दोन, रद=दांत, दोन ज्याला दांत असतात तो द्विरद, द्वौ रदौ अस्य.) ३. वर देणाऱ्याला. ४. हत्तीला. ५. वाणीतें, स्तुतीतें. ६. निगम (वेद) आगम (शास्त्र); वेदशास्त्र जो मी त्या मला. ७. रजोगुणांत. ८. हा शब्द उच्चारूं नको. रजोगुणांत (संसारांत) मला घालण्याच्या संबंधें कांहीं बोलूं नको. ९. धूळ. १०. रक्षण करण्याची इच्छा. (रक्षितुमिच्छा.) 'पूर्णनिरीक्षा' असाही पाठ आहे. ११. नाहीं तर करुण (ईश्वर) स्वभजनभावच (स्वसेवकांचा भक्तिभाव) नाहींसें करणारें 'वर माग' असें वचन काय म्हणून वदेल ? १२. काम्य फळाची इच्छा करणें हा वाण्याचा व्यापार. (वाणीज्य.) १३. बाह्यतः, वरूनवरून. १४. अध्याय १० श्लोक ७ पहा. १५. इच्छा. 'भूल' असाही पाठ आहे १६. 'मना प्राण सर्वेंद्रियां कष्ट भारी' असाही पाठ आहे.

सकळ काम मनामधुनी त्यजी, सुख अपार तयासचि सत्य जी ! ।
वरचि देशिल जी ! जरि लौकरी, न उपजे मनिं [1]काम असें करीं'. ॥ १३९
प्रऱ्हादशब्दें हरि तुष्टला हो ! 'घ्यावा' म्हणे 'हा चि यथेष्ट लाहो'; ।
लक्ष्मीपतीचें मन [2]जो हरीतो बोले असा त्यास वदे हरी तो. ॥ १४०
'कीं बोल हे सत्य न अन्यथा रे ! मद्भक्ति चित्तांत न अन्य [3]थारे, ।
ज्याला असें कांहिं न पाहिजे तें त्याचें असें म्यां मन [4]पाहिजेतें. ॥ १४१
ऐसें तथापि जिस [5]सिंधुचियाच [6]पाळी पाळी स्वभूमि फळ हें तुझिया कपाळीं, ।
पाळी तुझी म्हणुनि सर्व [8]वसुंधरा या, राया ! तुतें इतर योग्य न तें धराया.॥ १४२
[9]ऐकाहात्तर चौकड्या कलिकृतत्रेतायुगीं द्वापरीं,
हें मन्वंतर काळ एक इतुका जो होय याऊपरी; ।
प्रऱ्हादा ! इतुकीं युगें अधिक ही कांहीं तुझ्या [10]शासनीं,
पृथ्वी सर्व असो' म्हणे नरहरी 'ये बैस सिंहासनीं'. ॥ १४३
'त्यामाजि माझी स्मर हे कृपा कीं या पूर्विंच्या पातकपुण्य[11]पाकीं'. ।
उद्विग्न दुःखीं न सुखीं [12]स्पृहा ही, ऐसें असावें तरि निस्पृहांहीं. ॥ १४४
स्पृहाद्वेषत्यागें [13]अनुभवि अहो योग भलता,
[14]लता प्रारब्धाची असि च जरि तोडी कुशलता'; ।
वदे प्रऱ्हादातें हरि, 'कुशलभागा समज गा !
जगामध्यें ऐसे तुम्हि सकळ मद्भक्त मज गा ! ॥ १४५
जडीं ही चिद्रूपा कपटपट तंतूस मज गा,
जगामध्यें पाहें हरि[16]सुमनहारा न भुजगा; ।
जगाया या लोकीं भजनगुण गातो सतत रे !
तरे त्याचे पायीं जन भवनदीपार उतरे'. ॥ १४६

---

१. इच्छा. २. 'मोहरीतो' (मोहतो) असाही पाठ आहे. ३. टिके. ४. पाहतों. ५. समुद्र. ६. मर्यादा. जिला समुद्राची पाळी (मर्यादा) त्या पृथ्वीला. ७. रक्षण कर, राज्य कर. ८. पृथ्वी. ९. एकाहत्तर चौकड्यांचें एक मन्वंतर होतें आणि चौदा मनु असल्यामुळें चौदा मन्वंतरांनीं एक कल्प (ब्रह्मदेवाचा दिवस) होतो. मनुष्यांचीं तीस कोटी, सदसष्ट लक्ष, वीस हजार, (३०६७२००००) इतकीं वर्षें झालीं म्हणजे एक मन्वंतर होतें. १०. आज्ञेंत. ११. परिणाम. १२. दुःखानें उद्विग्न होऊं नको अथवा सुखामुळें कशाचीही स्पृहा (वांच्छा) धरूं नको. १३. 'सुख असुख हो भोग भलता' असाही पाठ आहे. १४. वेल. १५. हरि हाच सुमनांचा (पुष्पांचा) हार आहे, भुजग नाहीं असें जो पाहतो. १६. फूल, संसार.

प्रपंचाच्या त्रासें वनि वसति कीं मौन धरिती,
तरी त्यांची भेटी क्षय [1]भवभयाचा न करिती; ।
व्रती या गोष्टीचे बुध असति कीं विष्णुभजनीं,
जनीं जाणावे ते रवि हरिति [2]अज्ञानरजनी. ॥ १४७
'दे मुक्ति ही [3]भुक्ति हि भक्तराया दे भक्ति ही अन्य जना तराया.' ।
प्रल्हाद माथां धरि शासनातें अंगीकरी [4]तातनृपासनातें. ॥ १४८
स्वपितयास न हो [5]अधमा गती म्हणुनियां विनवी [6]शिशु [7]मागुती. ।
हरि म्हणे, 'सुत ज्यांस असा असे, सुगति पावति पातकि ही असे. ॥ १४९
एकवीस निजपूर्वज सारे, उद्धरी सुत [8]विर्तां तुजसा रे! ।
सत्क्रिया करिं तथापि तयाची ज्यां तनू चिरिलि ज्या पितयाची.' ॥ १५०
[9]येंपरी निज कृपा[10]अवलोका दाखवूनि [11]अपुनर्भव लोका, ।
तें चि हें चरित लोक तराया ठेविलें [12]भवनदी उतराया. ॥ १५१
मुक्ति मुक्ति अशि दाखवि भक्ता, वामनें मन तया अविभक्ता. ।
अर्पिलें करुनि अर्पण बोला, ग्रंथ हा 'नृहरिदर्पण' बोला. ॥ १५२
नृहरि थोर लहान हि [13]दर्पण प्रभु तयांत करी स्वसमर्पण, ।
इतुकियांत चरित्र समस्त कीं जनिं धरू सुपुरुष हि मस्तकीं. ॥ १५३
बोलतों करुनि अर्पण बोला, ग्रंथ हा 'नृहरिदर्पण' बोला, ।
[14]वामनें त्रिभुवनीं प्रगटावें, यांत ये रितिच पुण्य वदावें. ॥ १५४

---

१. संसारभीतीचा नाश करीत नाहीं. २. रात्र, अज्ञानरूप अंधकार. ३. भोग. ४. सिंहासन. पित्याचें राज्य. ५. नीच गति, अधोगति. ६. बालक. ७. पुनः. ८. प्रसवितां, जन्म देतां. ९. 'यें रिती निजकृपा अवलोका, दाउनी नरहरी निजलोका' असाही पाठ आहे. १०. दृष्टि. ११. जेथें पुनः जन्म (भव) नाहीं अशा लोका. १२. संसाररूपिणी नदी. १३. आरसा. १४. 'वामनें जग हि माधव दावी, ग्रंथरीतिहि अशीच वदावी' असाही पाठ आहे.

# गजेंद्रमोक्ष.

(श्लोक.)

चक्रायुध[2] स्वमरणार्तिस[3] जो[4] हरी तो[5] धांवे चढोनि खगराजभुजीं[6] अहो! तो, ।
चक्रेंचि नक्रमुख[7] फोडुनि पाय हातीं ओढी[8] धरूनि हरि[9] हा, विधि हें पहाती. ॥ १

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवत–स्कंध ८ अध्याय २–४ ह्यांच्या आधारें लिहिलें आहे. क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषार्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें पकडिलें. तेव्हां त्यानें नक्राच्या हातांतून सुटण्याचा होता तेवढा यत्न केला, परंतु मगरमिठी सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया, आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला, पण नक्रापुढें त्यांचेंही कांहीं चालेना. या उद्योगांत हजार वर्षें गेलीं आणि सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं ईश्वराचा धांवा केला. (अध्याय ३ श्लोक २–२९.) 'मी ग्राहापासून मुक्त होऊन टाळण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों' इत्यादि स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान् हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायण! अखिलगुरो! भगवन्नमस्ते' असें दीनवाणीनें बोलून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपडून भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून, चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें. (अ० ३ श्लो० ३३.) हा नक्र म्हणजे देवल ऋषीच्या शापानें नक्र झालेला हूहू नामक गंधर्व होय. यानें ईशस्तव केला तेव्हां हा शापमुक्त होऊन गंधर्वलोकास परत गेला. गजेंद्र हा पूर्वींचा द्रविडदेशाचा इंद्रद्युम्न नामक राजा होय. हा विष्णुव्रतपरायण असून मलयाचलावर तपश्चर्या करीत असतां, तेथें एकदां सशिष्य अगस्त्यमुनि आला. त्याचा यानें ध्यानस्थ असल्यामुळें प्रत्युत्थानादि आदरसत्कार केला नाहीं. तेव्हां मुनीला राग आला. 'हा असाधु दुरात्मा विप्रांचा अपमान करणारा गजासारखा स्तब्धमति आहे. तेव्हां हा गज होवो' असा त्यानें शाप दिला. (अ० ४ श्लो० १०.) परंतु मुनीची प्रार्थना केली तेव्हां त्यानें 'विष्णु तुझा उद्धार करील,' असा उच्छाप देऊन समाधान केलें. नंतर इंद्रद्युम्न हा आत्मस्मृतिविनाशिनी अशा कुंजरयोनींत जन्म पावला. पुढें भगवत्स्पर्शानें अज्ञानबंधमुक्त होऊन भगवद्रूप झाला. (अ० ४ श्लो० ६.) अशी कथा या काव्यांत आहे म्हणून याला 'गजेंद्रमोक्ष' असें अन्वर्थक नांव दिलें आहे. २. चक्र (सुदर्शन) हेंच आयुध ज्याचें तो. ३. निजमरणरूप दुःखातें. ४. वर्णन करावयाच्या कथेचा सारांश काव्यारंभींच थोडक्यांत सांगण्याचा वामनाचा परिपाठ आहे, त्यास अनुसरून हा पहिला श्लोक आहे. ५. 'ऐकोनि भक्तवचनार्तिस जो हरी-तो' असाही पाठ आहे. ६. खगांचा (पक्ष्यांचा) राजा जो गरुड त्याच्या खांद्यावर. ७. नक्राचें (देवलमुनीच्या शापानें सुसर झालेल्या हूहूनामक गंधर्वाचें) तोंड. ८. 'ओढी धरोनि विधि सर्वहि हें पहाती' असाही पाठ आहे. ९. विष्णु.

नक्रें तळ्यांत धरिला प्रबळेंचि हस्ती, तों 'ये' म्हणे [1]व्यथित [2]यूथप '[3]पद्महस्ती,' ।
सत्कीर्ति तूं, [4]श्रवणमंगलनाम नाथा ! [5]सर्वेश [6]आदिपुरुषा ! गति दे अनाथा. ॥ २

[7]गजा दे जो मुक्ती त्वरित [8]विभु नक्रासि [9]दमुनी,
मुनी ज्याला शास्त्रीं हरि म्हणति त्यालाचि नमुनी; ।
कथा ते संक्षेपें कथिन बरि [10]पक्षींद्रगमना,
मनामध्यें ध्यातों [11]द्विरदवरदा ! दुःखशमना ! ॥ ३

जळीं दातें नक्र [12]द्विरदपदमांसास्थि उकरी,
करी प्राणत्यागा, [13]सुमति सुचली तों झडकरी. ।
करी धांवा कीं वो सुलभ वर जो [14]देवनिकरीं
करीं घे अर्पाया कमल [15]पदपद्मीं सुखकरी. ॥ ४

'नसे ठावा ब्रह्मा, न शिव, अथवा श्रीपति हरी,
[16]हरी जो तापातें, उचलुनि [17]कृपासिंधुलहरी, ।
[18]हरी वाटे [19]काळाकरिस, [20]विपती [21]मृत्युभुजगा,
जगाचा तूं ऐसा, धनि कवण तो ? पाव मज गा.' ॥ ५

[22]वदे दुःखी तेव्हां म्हणउनि कळे देवनिकरा,
करावा तो मुक्त स्वशरण गमे श्रीप्रियकरा; ।
करीं चक्रा शस्त्रा प्रभु उचलि [23]यानीं [24]खगमनीं,
मनीं साक्षी तो ये, गज [25]जळज घे जों स्वनमनीं. ॥ ६

---

१. दुःखित. २. कळपाचा पालक अथवा स्वामी. (गजेंद्र.) ३. पद्माला हातांत धरणारा विष्णु ये (येवो) असें म्हणे. ४. कानांला मंगल (शुभकारक) आहे नाम ज्याचें तो. ५. सर्वांचा स्वामी. ६. आदिदेव, ईश्वर, परमात्मा. ७. अगस्त्यमुनीच्या शापानें गज झालेल्या इंद्रद्युम्न नामक राजास. ८. प्रभु. ९. शासन करून, शिक्षा लावून. १०. गरुडावर बसून जो गमन करतो त्या. ११. गजेंद्रास वर देणारा. (द्विरद=हत्ती ज्याला दोन रद (दांत) असतात तो.) १२. हत्तीच्या पायाचें मांस आणि अस्थि नक्र दातांनीं उकरी. 'मांसास उकरी' असाही पाठ आहे. १३. चांगली बुद्धि सुचली. १४. देवांच्या समूहांत. १५. कमळतुल्य पायानें कमळ उचलून हातीं घेतलें. १६. हरण करी, निवारी. १७. नदीच्या लाटा ज्याप्रमाणें शरीरताप शांत करतात त्याप्रमाणें परमेश्वर आपल्या कृपारूप सागराच्या लहरी (लाटा) उठवून जनांचें दुःख निवारितो. १८. सिंह. १९. काळ (यम) हाच कोणी करी (हत्ती) त्याला हरी हा हरी (सिंहासारखा) वाटतो. २०. वि=पक्षी, पति=स्वामी; पक्ष्यांचा राजा=गरुड. २१. मृत्युरूप सर्पाला हरी हा विपति (गरुडच आहे असें) वाटतें. 'पळवी मृत्युभुजगा' असाही पाठ आहे. २२. 'करी धांवा दुःखी' असाही पाठ आहे. २३. वहनावर (गरुडावर) बसून. २४. आकाशांतून ये. २५. कमळ.

'[1]असा मी सर्वा त्यां त्रि[2]दशनिकरां वंद्य सकळां,
कळाया ही ये त्यासह, करि तया मुक्त वि[3]कळा; ।
कळा प्रेतप्राय स्मरणकरित्यातें न [4]अवधी,
वधी नक्रातें त्या अवसरें [5]कृपाब्धी निरवधी. ॥ ७
[6]मृताच्या त्या तोंडामधुनि [7]पैंद तो हा झडकरी;
करीतें [8]बोढेना, प्रभुच करुणा मागुति करी; ।
[9]करी दों पायातें सह उचलि यांनीं सुखकरीं,
करींद्रा [10]सारूप्य त्वरितगति दे [11]मुक्तिनिकरीं. ॥ ८
स्तवी ब्रह्मा शंभु त्रि[12]दशपति तो मुक्तहि नवा,
[13]नवां भक्तींची हे गति दिधलि ज्याला [14]अभिनवा, ।
न वाटे त्यां सर्वां हरिविण धनी आणिक जगा,
[15]जगाया हे भक्ती प्रभुच म्हणती ईश मज गा. ॥ ९
भुजा चारी पीतांबरधर असी मूर्ति बरवी,
रवी जाणों हातीं [16]रथचरण तें दीप्ति मिरवी; ।
गदा एके हातीं [17]जळजयुग दोहीं शुभ करीं,
करींद्रा वैकुंठ त्वरित हरि दे देवनिकरीं. ॥ १०
'[18]वंदे तेव्हां सर्वां द्वि[19]रदवरद श्रीपति असा,
'[20]असारीं संसारीं [21]गजगति असी गातचि असा. ।

---

१. 'असा मी सर्वांचा' असाही पाठ आहे. २. देवसमुदायाला. ३. शक्तिहीन, दुर्बळ, व्याकुळ. ४. मर्यादा. ५. दयासागर. ६. मेलेल्या नक्राच्या. ७. पाय. ८. ओढेना. ९. 'करी ह्या पायातें धरुनि उचली श्री सुखकरीं', 'करी त्याचे पायां धरुनि उचली श्रीशुभकरीं' आणि 'करीं दों पायातें सह उचलि यांनीं शुभकरीं' असे पाठभेद आढळतात. १०. सरूपता मुक्ति. हिच्या योगें भक्तजन ईशासमान (सरूप) होतात. ११. मुक्तिसमुदायांत (मुक्तीचे चार प्रकार आहेत:—सायुज्य, समीपता, सलोकता, आणि सरूपता) १२. देवांचा स्वामी. (इंद्र.) १३. नवविध भक्तींचे हे प्रकार:—श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आणि आत्मनिवेदन. १४. नवीन. १५. 'जगाया हे भक्ति प्रभु मग म्हणे त्यास मज गा' आणि 'जगा या हे भक्ति प्रभु मग म्हणे हें समज गा' असे पाठभेद आहेत. १६. रथाची पाय म्हणजे रथचक्र हातांत होतें तें जसें काय सूर्यच हातांत आहे असें दीप्तिमान् दिसे. १७. दोन कमळें. १८. 'वंदे तेव्हां सर्व द्विरदवरदा श्रीपति असा' असाही पाठ आहे. १९. गजाला वर देणारा. २०. सारहीन, निःसत्व, नीरस, निष्फळ. २१. गजेंद्रास दिलेली गति (मुक्ति).

पहांटे हें गाय प्रतिदिनिंहि माझें चरित रे!
तरे दुःखाब्धी तो न परमपदींहूनि उतरे. ॥ ११
गजाची जे मुक्ती क्रमुनि इतरां शक्ति न जनीं,
जनीं गाती त्याला फळ परम या विष्णुभजनीं. ।
जनीं भक्तस्वामी करि भजक हो! गातचि असा'
असारीं संसारीं म्हणुनि विनवी वामन असा. ॥ १२

---

## वामनचरित्र. (प्रथम.)

(श्लोक.)

इंद्राचें पद दैत्यराज बळि तो विप्रप्रसादें हरी,
तेव्हां कश्यपमंदिरीं अदितिच्या दिव्यव्रतें श्रीहरी ।
झाला वामन, मुंजि तेचिसमयीं होतांचि भिक्षाछळें,
सर्वस्व त्रिपदें हरी, स्मर मना! त्याचीं पदें कोमळें. ॥ १
बळी योग तो नर्मदेच्या तटाकीं करी, आहुती शुक्र अग्नींत टाकी. ।
अकस्मात तों देखतां वामनाला, सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला. ॥ २
करिं कमंडलु दंड मृगाजिन, त्रिजगमाप करी बटु वामन; ।
सकळवेदविशारद चांगला कटितटीं अतिसुंदर मेखला. ॥ ३
श्रुतिमयें वचनें वदतां पटु बळिमखाप्रति अद्भुत ये बटु; ।
लुटलुटां द्विजअर्भक येकटु करि उदार कथा भलता लटु. ॥ ४

---

१. दुःखसागर. २. उत्तम पदापासून पतित होणार नाहीं, ही या कथापठनाची फलश्रुति होय. (अध्याय ४ श्लोक १४–१६.) ३. भक्तांचा स्वामी (गुरु) जो करी (गज) त्याला. ४. 'असारीं या सौरा' असाही पाठ आहे. ५. प्रल्हादाचा पौत्र बळी यानें दैत्यकुलगुरु शुक्राचार्य यांच्या साहाय्यानें विश्वजिन्नामक यागकरून इंद्राचें पद बळकाविलें. तें त्यास परत देण्यासाठीं श्रीविष्णूनीं वामनरूप धारण केलें आणि बटुवेषानें बळीपासून यज्ञ करीत असतां त्रिपादभूमिदानाचें उदक स्वहस्तीं घेतलें. बळीनें उदक सोडतांच वामनानें विराटरूप धारण करून एका पावलांत पृथ्वी आणि दुसऱ्या पावलांत आकाश व्यापून, तिसरें पाऊल बळीच्या मस्तकीं दिलें आणि त्यास पाताळीं लोटिलें. अशी कथा या प्रकरणांत आहे म्हणून यास 'वामनचरित्र' असें नांव आहे. ही कथा श्रीमद्भागवताच्या आठव्या स्कंधांत अध्याय १६–२३ यांत वर्णिली आहे. ६. विप्राच्या (कुलगुरु भृगु त्याच्या) प्रसादानें. ७. इंद्राचें पद बळी हरण करी. ८. भिक्षेच्या मिषानें. हें पद्य वंदनरूप मंगलाचरण आहे. ९. यज्ञ. (विश्वजिन्नामक.) १०. मातीचें उदकपात्र. ११. हरणाचें चामडें. १२. 'त्रिजग मोजिल तो बटु वामन' असाही पाठ आहे. १३. कांची, कमरपट्टा. १४. वेदाक्षरें. १५. कुशल. १६. 'पटु वदे वचनें चिमणा लटू' असें पाठांतर आढळतें. १७. बालक. १८. एकटा. १९. अज्ञान.

करिं कमंडलु ये जगजीवन, त्रिजग उद्धरि जो पदजीवन, ।
स्ववचनें बळिचें मन मोहरी[1], रुचिर [2]वामनपाद नमो हरी. ॥ ५
देखोनि ऐशापरि त्या द्विजाला, चित्तीं बळीच्या बहु तोष झाला; ।
येऊनियां संमुख पाय वंदी, वर्णी गुणां होउनि [3]भाट बंदी. ॥ ६
तूं गा! कोण? [4]अपूर्व, कोण वसती? 'हें विश्व[5]? जी! तत्वतां,
पाळी कोण तुतें? '[6]अनाथ अजि मी त्राता न मातापिता.' ।
द्यावें काय तुतें? त्रिपाद धरणी माझ्या पदें फार घे,
[7]नेघें, वामन बोलिला बळिस कीं, तृप्ती त्रिलोकीं रिघे. ॥ ७
पूजी बळी मग म्हणे बटु वामनातें, कीं, 'माग जें तुज अभीष्ट गमे मनातें. ।
देणार गा! इतर मी, मज काम नाहीं; जें मागसी, पुरवितों तव कामना ही.' ८
म्हणे, 'धन्य राया! स्ववंशानुसार प्रभू बोलसी हा तुझा बोल सार, ।
रणीं आणि दानीं तुझीया कुळीं रे! न दे पाठ कोणीच राया! बळी रे! ॥ ९
राया! मला एक असे [9]अपेक्षा, त्यावेगळी सर्व क्षणी उपेक्षा, ।
मोजूनि माझ्या त्रिपदेंचि मातें दे भूमि [11]विप्रप्रवरोत्तमातें.' ॥ १०
बळि म्हणे अतिसादर [12]वामना, 'बहुत वाटसि गा! बरवा मना; ।
मज अशा भुवनत्रयपाळका बहु न मागसि कां? द्विजबाळका! ॥ ११
शब्द मी धरिन [13]मस्तकावरी, ब्राह्मणा! अधिक भूमिका [14]वरीं. ।
वाटसी बहुत नेटका मना, जे असेल वद नीट कामना. ॥ १२
द्विजसुता! तुझिया वचनामृतें मज गमे उठतील [15]शवें मृतें; ।
निपुण दीससि निर्मळ [16]आरसा, परि न मागसि अर्थहि फारसा.' ॥ १३
हरि म्हणे, 'मजला इतुकें पुरे, त्रि[17]भुवनात्मक होउनियां उरे. ।
त्रि[18]पदमात्रचि कार्य असे बरें, अधिक मागति लोक न ते बरे.' ॥ १४

---

१. मोही. २. 'वामनरूप' असें पाठांतर आहे. ३. स्तुतिपाठक. ४. अनादि. ५. विश्रांत कोठें वसति आहे किंवा सर्व विश्वंभर. ६. मी अनाथ आहें, माझा कोणी पालनकर्ता नाहीं, माझा कोणी स्वामी नाहीं, म्हणून मींच सर्वांचा स्वामी असा गर्भितार्थ. ७. मीं धरणी फार घेणार नाहीं. ८. तीन पावलें भूमि दिली असतां तीन लोक दिल्यानें होणारी तृप्ति पावेन; तीन पावलांनीं तीन लोक व्यापून टाकिल्यावर आणखी कांहीं पाहिजे असें नाहीं. ९. इच्छा. १०. इच्छा. ११. ब्राह्मणांतील जे श्रेष्ठ त्यांतील उत्तम अशाला. (अध्याय १९ श्लोक १६–१७.) १२. अध्याय १९ श्लोक १८–२० पहा. १३. आज्ञा शिरसा मान्य करीन. १४. माग, मागून घे. १५. प्रेतें. १६. आदर्श. १७. तीन पावलें भूमि दिली असतां ती मला त्रैलोक्यापेक्षां अधिक होईल, ती त्रैलोक्य व्यापून उरेल. १८. अध्याय १९ श्लोक २७ पहा.

शब्दभाव बळिला न आकळे, शुक्र संनिध तयासि तो कळे; ।
तो म्हणे भुज सभे उभारुनी त्या बळीप्रतिच हाक मारुनी. ॥ १५
'अदितिच्या उदरीं हरि जन्मला, म्हणुनि ये समयीं कळलें मला. ।
विभव राज्य हरील समस्त रे! यशहि विश्रुत होइल अस्त रे! ॥ १६
म्हण 'न देउं शकें तुज मी अगा!' बइस मौनपणें अथवा उगा, ।
म्हणसि 'देइन' यावरिही जरी, रिघसि दाटुनि पातकपंजरीं. ॥ १७
संकल्प जो तूं करसील बापा! न देववे, पावसि सद्य पापा, ।
पदद्वयीं विश्व पुरेचि जेव्हां, जाशील राया! नरकासि तेव्हां. ॥ १८
करूनि संकल्प न दे द्विजा, तो प्राणी स्वपापें नरकासि जातो; ।
आधींच 'नेदीं'[10] म्हणतां भला हो, घेसी झणी वैखरि[11]माजि लाहो[12].॥ १९
जरि विचारुनि गोंविसि वैखरी[13], तरिच होइल जाण अगा! खरी.' ।
म्हणुनि शुक्र अजी! बहु बोलतो, परि वदों वदला बळि बोल तो. ॥२०
विचारूनि[14] आचार्यवाचा[15] निदानीं[16] बळी तों धरी बुद्धि[17] सर्वस्वदानीं, ।
म्हणे, 'बोलतां ते जरी सत्य वाणी, द्विजा! केंवि वाचा वदों दैन्यवाणी'. ॥
हे भूमि वेश्या, इसि सर्व जाती[19] भोगूनियां मृत्युमुखासि जाती, ।
लोभें इच्या लंघुनि विप्रवाणी, धिक् बोलणें वैखरि दीनवाणी. ॥ २२
निगम[21]विधिविधानें मोडुनी हे पसारे,
यजुनि विविधयागीं वंदिती यासि सारे. ।
वरद हरिच तो हो विप्र कोणीच्च हो! जी,
कितितरि मज मागो भूमि देतों अहो! जी[22]!' ॥ २३
सर्वस्वदानीं बळि सिद्ध झाला, पूज्यासनीं बैसविलें द्विजाला; ।
प्रक्षाळि त्या श्रीपदपंकजातें ध्याती रमा अब्जभवादि[23] ज्यातें. ॥ २४

---

१. 'त्रिपद' या शब्दाचा गर्भितार्थ. २. समजे. ३. 'वदे' असाही पाठ आहे. ४. भुज (हात) वर करून शुक्र म्हणतो. ५. अध्याय १९ श्लोक ३०–४२ पहा. ६. वैभव. ७. प्रख्यात. 'विश्रुता'-च्या ठिकाणीं 'विस्तृत' असेंही पाठांतर आढळतें. ८. वामना. 'म्हणुनि सांगतसें तुज मी अगा' असाही पाठ आहे. ९. 'जावें तुवां कीं नरकासि तेव्हां' असाही पाठ आढळतो. १०. देत नाहीं. ११. बोलण्यांत मात्र लाभ होईल, दान देतों असें तोंडानें म्हणण्याचा लाभ होईल, परंतु प्रत्यक्ष दान केल्याचा लाभ होणार नाहीं, दानक्रिया घडणार नाहीं, व्यर्थ बोलणें मात्र होईल. १२. लाभ. १३. वाणी, वचन शुंतविशील. १४. विचार करून. १५. शुक्राचार्यांचें भाषण. १६. अखेरीस. १७. सर्वस्वदान करण्याची इच्छा धरी. १८. अध्याय २० श्लोक २–१२ पहा. १९. ज्ञाति. २०. पावती. २१. वेदोक्त कर्ममार्गानुसारें. २२. अहो महाराज. (शुक्राचार्य.) २३. ब्रह्मदेवादि.

आली समीप यजमानिन पट्टराणी, पाहे हरीस, नपुरेच जिची [1]शिराणी, ।
ओती करीं कनकपात्र धरूनि [2]वारी, सर्वस्व दे पति तयास न जे [3]निवारी. ॥ २५
कुंभस्तनी कनककुंभ धरूनि, पाणी ओती मणी चपळ नासिकिंचे [4]सुपाणी, ।
भी लावितां बळि पदीं स्वकठोर [5]पाणी सर्वस्वपात्र बळिचें हरि चक्रपाणी. ॥ २६

'[6]विध्युक्त संकल्प करूनि पाणी घालूं' म्हणे 'पूजुनि चक्रपाणी.' ।
निघे न झारींतुनि नीर[7]बिंदू, म्लानत्व पावे बळिचा [8]मुखेंदू. ॥ २७
[9]कीं शुक्र झारींत रिघोनि गोळा करूनि अंगें अजि! होय [10]बोळां, ।
फोडी हरी घालुनि दर्भ डोळा, जना दिसे विप्र[11]कुमार भोळा. ॥ २८
पूजूनि ऐसेरिति [12]दौनवारी, घाली करीं तें बळि [13]दौनवारी; ।
म्हणे, 'स्वपादीं अजि भूमि मोजीं, जे अर्पिली, त्याचि पदीं नमो जी'. ॥ २९

संकल्पयुक्त पडतां स्वकरांत पाणी, [14]वांढे त्वरेंकरुनि वामन चक्रपाणी; ।
पाताळ पादतळ मस्तक सत्यलोकीं, कानीं दिशा दिन[15]मणी नयनावलोकीं. ॥ ३०

एक्या पदें भूमि भरूनि थोडी, पायें दुज्या अंडक[16]टाह फोडी; ।
'दे तीसरा पाद' म्हणे बळीला, म्हणोनि [17]पाशें दृढ आकळीला. ॥ ३१
पदयुगें भुवनत्रय मोजिलें, [18]बळिशिरीं तिसरें पद योजिलें; ।
पदनखें[19] विधिअंड विदारिलें, [20]पदंजळें भुवनत्रय तारिलें. ॥ ३२
त्याकारणें प्रार्थुनियां हरीची, करी स्तुती प्रेमरसें [21]विरंची; ।
[22]प्रल्हाद आजा बळिभूपतीचा आला महाभक्त रमापतीचा. ॥ ३३
म्हणे, 'तुवां हे दिधली [23]त्रिलोकी, नेला तुवां पूर्ण कृपावलोकीं, ।
केला तुवां दंड कृतार्थ झाला,' प्रल्हाद इत्यादि वदे [24]अंजाला. ॥ ३४

---

१. कौतुक. २. पाणी. ३. निवारण न करी, आड न येई. ४. उत्तम तेजाचे. ५. हात. ६. 'करूनि संकल्प करांत पाणी' असाही पाठभेद आढळतो. ७. पाण्याचा थेंब. ८. मुखचंद्र. ९. कारण. १०. झाई इत्यादिकांमधें जो फडका असतो तो, फडक्यांचा चोथा. ११. बटु वामन. १२. दैत्यशत्रु. (विष्णु.) १३. दानासंबंधी उदक. १४. अध्याय २० श्लोक २१ पहा. १५. सूर्य. १६. कटाह=कढई, कढईच्या आकारासदृश ब्रह्मांड. १७. गरुडाकरवीं सोमाभिषवाच्या दिवशीं बळिला वारुण पाशांनीं बद्ध केलें. (अध्याय २१ श्लोक २६.) १८. 'पद तजें बळिच्या शिरिं योजिलें,' 'शिरिं पदा तिसऱ्या मग योजिलें' असेही पाठभेद आढळतात. १९. येथें समास असल्यामुळें संधि कर्तव्य अवश्य असून केला नाहीं. २०. चरणतीर्थानें किंवा पादजल जें गंगोदक त्यानें. २१. ब्रह्मदेव. २२. प्रल्हाद हा भक्तवर्य दैत्यदानवाधिपति, याचा पुत्र विरोचन आणि त्याचा पुत्र बळि. २३. स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ. २४. विष्णूला.

पत्नी बळीची जगदीश्वरातें वंदूनि बोले कमळावरातें, ।
म्हणे, 'धणी तूंचि चराचरांचा वृथाभिमान प्रभुजी! नरांचा.' ॥ ३५
सर्वांचिया आइकतां स्तुतीतें, बोलावुनी त्याच महामतीतें, ।
म्हणे, 'बळी! दे तिसऱ्या पदातें कीं भोगि पापें बहु आपदांतें. ॥ ३६
करूनि संकल्प न देति जेव्हां, जासील राया! नरकासि तेव्हां'. ।
बळी म्हणे, 'देइन देवराया! आहेंचि संकल्प खरा कराया. ॥ ३७
तैसा न भी मी नरकासि देवा! या पाशबंधासिहि वासुदेवा! ।
न भी सुरांच्या जयवाद्यनादा भीतों तसा मी अपकीर्तिवादा. ॥ ३८
करूनि संकल्पहि तूज देना, कोणी मला धन्य जगीं वदेना, ।
माझ्या शिरीं ठेवि तिज्या पदातें, जें छेदितें सर्वहि आपदांतें'. ॥ ३९
करी बळी स्वात्मनिवेदनातें, संतोष ज्याणें मधुसूदनातें. ।
दैत्येंद्र तात्काळचि मुक्त केला, प्रेमामृताचा हरि हो! भुकेला. ॥ ४०
देऊनियां सुतळराज्य अखंड दारीं, राहोनियां बळिचिया गृहपुत्रदारीं, ।
झाला जसा हृदयमंदिरिं वामनाच्या वृत्ती चिदात्मक करी अवघ्या मनाच्या.॥ ४१

---

## वामनचरित्र. (द्वितीय.)

(घनाक्षरी.)

करीं कमंडलु दंड, दावी कौतुकें उदंड, ।
ध्यावा हृदयीं अखंड, भवगजकेसरी. ॥
सुखी सर्वांचें ही मन करी कमळनयन, ।
सहस्राननशयन दावी शब्दकूसरी. ॥
इंद्रासी दे इंद्रपद, बळीमस्तकीं स्वपद, ।
गंगा आणुनी त्रिपद, जगीं पुण्य पसरी. ॥
पायीं पावन जीवन, कथा जीवाचें जीवन, ।
ऐशा वामनीं वामन नेणे बुद्धि दूसरी. ॥ १

---

१. हिचें नांव विंध्यावली. २. विष्णूतें. ३. उदारधी बळीतें. ४. किंवा, नाहींतर. ५. अध्याय २१ श्लोक ३२–३४ पहा. ६. अध्याय २२ श्लोक २–११ पहा. ७. नवविध भक्तींपैकी एक–स्वसमर्पण, निवेदन=देणें, स्वाधीन करणें. ८. अध्याय २२ श्लोक ३२ पहा. (सुतल हें सप्तपाताळांतील एक; येथें आधि नसतात.) ९. गृह पुत्र स्त्रिया यांच्यामध्यें, मुलांमाणसांमध्यें. १०. संसाररूप हत्तीला सिंह. ११. सहस्रानन (शेष) आहे शयन (निजण्याचें स्थान) ज्याचें असा विष्णु.

अहो बळी भाग्यवंत, ज्याचे दारीं भगवंत, ।
देतां जग अंतवंत अनंतत्व पावला. ॥
देऊनि ही तिन्ही लोक, अणुमात्र नेणे शोक, ।
मस्तकें ही पुण्यश्लोक चरणींचें पावला. ॥
सर्व अर्पुनि ही धीर, तिज्या पावलासी शीर, ।
देतां न लावी उशीर, आनंद दुणावला. ॥
शाप देतां शुक्र खळ, तरी नव्हे चि विकळ, ।
दान करुनी सकळ म्हणे, 'डाव फावला'. ॥ २
इंद्राहुनि ही कल्याण, करी बळीचें सुजाण, ।
तया देवाचीच आण, नव्हे गोष्टि लटकी. ॥
केला इंद्र भाग्यवंत, देउनी ज्या अंतवंत, ।
संपदा त्या भगवंत, करी ज्याच्या बटकी. ॥
इंद्र इंद्रपददास, बळी त्यावरी उदास, ।
दासीसम ज्या पदास लेखीना निपट कीं. ॥
म्हणूनि च विश्वपाळ, झाला द्वारीं द्वारपाळ, ।
जयापाशीं सर्वकाळ असुरांच्या कटकीं. ॥ ३
बळी हाचि सत्वगुण, यास करा हो निपुण, ।
भाग्या अपत्याची खुण, कळतां ठसा पडे. ॥
तंतूलागीं सर्व पट, देतां काय खटपट ? ।
तैसें अर्पितां निपट विश्व हें न सांपडे. ॥
ऐसें दान दे जें सत्व, तुरे त्यास ही भिन्नत्व, ।
आत्मनिवेदनतत्व नेणती हे बापडे. ॥
व्यर्थ घेऊनी संन्यास, वेष दावीती अन्यास, ।
होतां वामनीं हा न्यास कर्मशेंडी उपडे. ॥ ४

# भागवतरामायण.[1]

## अध्याय पहिला.

(श्लोक.)

करिति चरण तूझे जे शिळा[2] दिव्य रामा[3],
हरुनि दुरित[4] माझें हो तुतें सेव्य[5] रामा! ।
भ्रमरमन[6] पदाब्जीं पाववी त्या विरामा,
भवहर[7]! भवचापध्वंस[8]! विश्वाभिरामा[9]! ॥ १
जगीं तूं असा कीं घटीं एक मांती[10], गुण श्लोककोटींत तूझे न मोंती[11]; ।
निरूपीन त्या सिंधुंच्या[12] बिंदुमात्रा पुरे तेचि संसाररोगास मात्रा[13]. ॥ २
महाऔषधांतून थोडेंच कांहीं, करी, सेवितां, नाश वातादिकांहीं. ।
पुरे आमुची हे अविद्या[14] मराया तुझें एकलें नाम जी! रामराया! ॥ ३
जरी नाशिली आमुची जी अविद्या, जितांही दिली मुक्ति देऊनि विद्या, ।
तुझी कीर्ति मुक्तीहुनी गोड वाटे, शुकादीकही चालती याच वाटे. ॥ ४
म्हणोनि जे भागवतीं[15] शुकानें लीला तुझी वर्णिलि कौतुकानें, ।
टीका तिची मी क्षितिलोकवाणीं[16] करीन, जेथें न सुखासि वाणी[17]. ॥ ५
बहू वृद्धी ग्रंथा न करुनि वदावी यशसुधा[18],
प्रतिश्लोकीं जे कां करि अमृतसंतृप्त वसुधा[19], ।
समश्लोकी[20] टीका[21] म्हणुनि करितों जी! रघुपती!
जिला मंत्रप्राय[22] स्मरति वदती लोक जपती[23]. ॥ ६

---

१. ही रामायणांतील कथा श्रीमद्भागवताच्या नवम स्कंधांत अध्याय १०-१२ यांत संक्षेपतः दिली आहे, तिला अनुसरून हें प्रकरण रचलें आहे म्हणून याला 'भागवतरामायण' किंवा 'संकलित रामायण' असें अन्वर्थक नांव दिलें आहे. यज्ञरक्षणासाठीं विश्वामित्र रामाला दशरथापासून मागून घेऊन जातो येथपासून या प्रकरणांत कथा वर्णिली आहे. २. रामाचे पदस्पर्शानें शिळेची अहल्या स्त्री झाली या कथेस अनुसरून हें वर्णन आहे. ३. सुंदर स्त्री. ४. पाप. ५. सेवन करण्यास योग्य. (चरण.) ६. माझें भ्रमरासारखें मन तुझ्या पदाब्जीं (चरणकमळीं) विरामा (विश्रांति) पाववी. ७. हे संसारनाशक. ८. शंकराचें धनुष्य मोडणाऱ्या. ९. सुंदर, रमणीय. १०. मृत्तिका. घटाचे कारण जशी एक माती तसा तूं जगीं (जगाचा) एकच कारण आहेस. ११. कोटिश्लोकांत तुझे गुण मावत नाहींत. १२. गुणसिंधूच्या. १३. औषध, रसायन. १४. अज्ञान, माया. १५. श्रीमद्भागवताच्या नवम स्कंधांतील १०—१२ या अध्यायांत. १६. देशभाषेंत, मराठीभाषेंत. १७. कमताई. १८. यशोमृत. १९. पृथ्वी. २०. श्लोकास श्लोक अशी. २१. भागवताच्या नवमस्कंधांत संक्षिप्त रामायण आहे त्याची ही टीका होय. २२. मंत्रसदृश. २३. जिचा जप करतात. 'जपति'स्थानीं 'यजिति' असाही पाठ आहे.

निजाश्रमा राघव कौशिकानें[1] नेला, कथा तेथुनि हे शुकानें।
आरंभिली, मंगळ तीस गातें, गावीसुनी[2] उद्धरि जो जगातें. ॥ ७
चाले वनाप्रति पुलस्त्यसुतासि[3] मारी, पाळी स्वकोशलधरा[4] सहभूकुमारी[5]. ।
या मंगलाचरणपद्यरसें शुकानें संक्षिप्त वर्णिलि कथा अतिकौतुकानें. ॥ ८
टाकी तातार्थ[6] राज्यावन[7], वन विचरे त्या[8] पदीं, ज्यास वाटे,
सीताहस्ताब्ज भारी; अनुज[9] कपिपती[10] सेविती नित्य वाटे. ।
बोलें निर्नासिकेच्या[11] असुर जनकजा ने तईं क्रोधलेशें
बांधी[12] दापूनि सिंधू, वधि रिपुकुळ, त्यां[13] रक्षिलें कोशलेशें[14]. ॥ ९
अहो ! विश्वामित्रें[15] दशरथनृपा प्रार्थुनि जयीं
स्वयज्ञातें नेला प्रभु, असुर[16] मारूनि विजयी, ।
तयासंगें जातां करुण मिथुळाग्रामगमनीं[17]
शिळा[18] शापें मार्गी करि पदरजें[19] हंसगमनी[20]. ॥ १०
सीतास्वयंवरगृहीं भवचाप[21] हातीं, भंगी मुख क्षितिपें[22] वीर अहो ! पहाती. ।
लीलेंकरूनि गजबाळक इक्षुदंड[23] मोडी, तसा भय करी ध्वनि तो उदंड[24]. ॥ ११
जिंकोनि ने स्वगुणरूपवयें समाना सीता रमा स्वहृदयावरि लब्धमाना. ।
निःक्षत्रिया क्षिति करी, हरि गर्व वांटे[25] त्यांचा[26], ज्यांस[27] नृपबीज[28] असह्य वाटे. ॥ १२
जो[29] स्त्रीस लंपट सकाम तथापि त्याची माथां धरूनि करि गोष्ट खरी पित्याची, ।
राज्यादिकें त्यजुनि जाय वना सदार[30], प्राणावरी जितंची[31] मुक्त तसा उदार. ॥ १३

१. विश्वामित्रानें. २. 'गातो मुनी उद्धरी जो जगातें' असाही पाठ आहे. ३. रावणाला. ४. आपला कोसल देश. ५. भूमिजा, सीता. ६. अध्याय १० श्लोक ३ पहा. ७. राज्याचें रक्षण. (अवन=रक्षण.) ८. ज्यास (पदास) सीतेचें हस्तकमल (अब्ज) भारी वाटे त्या पदीं वन विचरे (वनांत भ्रमण करी)–असा अन्वय. ९. लक्ष्मण. १०. सुग्रीव. ११. जिचें नाक कापलें आहे अशा शूर्पणखेच्या बोलें (सांगण्यावरून) असुर (रावण) जनकजा ने (सीतेस नेई). १२. समुद्रास सेतुरूप दोरीनें बंधन करी. १३. त्या बिभीषणास. १४. कोशलेश्वरें. (रामें.) १५. अध्याय १० श्लोक ५-७ पहा. १६. मारीचादि राक्षस. १७. मिथिलानगरी, जनकपुरी. हें शहर नेपाळांत असावें असें म्हणतात. १८. गौतमाच्या शापानें मार्गात शिळा होऊन पडली होती त्या अहल्येला. १९. पायांच्या धुळीनें. २०. हंसासारखी मंदगतीनें चालणारी (स्त्री). २१. शिवधनुष्य. २२. प्रमुख राजे, नृपवीर. २३. ऊंस. हाच दृष्टांत मूळ भागवतांत आहे. २४. मोठा. २५. मार्गांत. २६. त्याचा (भार्गवाचा) वाटेंत गर्व हरि, ज्यास (ज्याला) नृपबीज असह्य वाटे–असा अन्वय. २७. 'त्याच्या जया नृपतिबीज' असाही पाठ आढळतो. २८. राजांचें (क्षत्रियांचें) बीज. २९. दशरथ. ३०. स्त्रीसह. (दार=बायको.) ३१. जिवंत असला तथापि मुक्त मनुष्य प्राणावर जसा उदार असतो तसा.

[1]लंकापतीभगिनिच्या [2]मुखदूषणातें केलें, वधी मग तया [3]खरदूषणातें. ।
मारी चतुर्दशसहस्त्रहि, चापहातीं, [4]कोदंड चंड वनिं कष्ट मुनी पहाती. ॥ १४
[5]सीताकथा परिसतां [6]स्मरविव्हळानें जो निर्मिला दशमुखें [7]मृग हो! खळानें, ।
मारीच तो, वधि तया [8]प्रभुकार्यदक्षा जाऊनि दूरि, [9]शिव संहरि जेंवि [10]दक्षा. ॥
तो [11]राक्षसाधम हरी जनकात्मजा ते नेतां [12]वृकें जसि [13]अजा अतिदीन जाते. ।
तेव्हां वनीं रघुपती अतिशोक दावी, कीं स्त्रीप्रियास गति शेवटिं हे वदावी. ॥
जातां स्वकार्य मृतदेह [14]कबंध मारी जे मित्र होति कपि शोधुनि [15]भूकुमारी. ।
वाळीवधाउपरि सांगति तेच वेळे ये विश्ववंद्य मग यांसह [16]सिंधुवेळे. ॥ १७
सक्रोधलोचनभयेंचि पडे समुद्रा आंदोळतां जळचरें अतिमौन[17]मुद्रा. ।
झाला [18]संमूर्त शिरिं घेउनि [19]पूजनातें ये पाय वंदुनि वदे [20]भवभंजनातें. ॥ १८
'जो तूं अनंत, समजों न कुबुद्धि त्यातें [21]कूटस्थ आदिपुरुषा जगपाळित्यातें ।
देवप्रजाधिपति भूतपति क्रमानें मायापति [22]स्रजिसि [23]सत्वरजस्तमानें. ॥ १९
मानें तसें जलधितें, अजि लंघि[24] मातें, [25]श्री पाव, मारुनि [26]पुलस्त्यसुताधमातें
पाषाण तारि, पसरे यश जेंवि लोकीं, गातील [27]कीर्ति नृप सेतुपथा विलोकीं.'॥२०
सुग्रीव नीळ हनुमंत कपींद्रसेना, ते आणितां गिरिशिखीं नभ तें दिसेना, ।
त्या सेतुनें रघुपती [29]कपिदग्ध लंका देखे, बिभीषण वदे मति निष्कलंका. ॥ २१

---

१. रावणाची बहीण शूर्पणखा. (श्लोक ८–९.) २. तोंडाला डाग. ३. राक्षसविशेष. ४. धनुष्य. ५. श्लोक १०. ६. कामपीडितानें. ७. कनकमृगाचें रूप मारीच राक्षसानें धारण केलें होतें. ८. प्रभूचें (रावणाचें) कार्य करण्याविषयीं दक्ष. ९. शिवाची पत्नी ही दक्षप्रजापतीची कन्या, हिचें नांव सती. एकदां दक्षानें मोठा यज्ञ केला, तेव्हां त्यानें शिव आणि सती यांशिवाय सर्वांस बोलाविलें. सती आमंत्रण नसतां ही भर्त्याची आज्ञा घेऊन यज्ञोत्सवार्थ पितृगृहीं आली. तिचा त्यानें अपमान केला. तेव्हां शिवानें वीरभद्रनामक स्वपार्षदाकरवीं यज्ञविध्वंस करवून दक्षाचें शिर तोडिलें इत्यादि कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. (भागवत–स्कंध ४ अध्याय ५.) १०. दक्षप्रजापतीला. हाच दाखला मूळांत आहे. (श्लोक १०.) ११. रावण. १२. लांडग्यानें. १३. शेळी. (श्लोक ११.) १४. राक्षसविशेष. १५. सीता. १६. समुद्रमर्यादेवर, समुद्रतीरावर. (श्लोक १२.) १७. स्तब्ध. १८. मूर्तिमान् (समुद्र) शरीर धारण करून. १९. अर्घादिक द्रव्यातें, पूजासाहित्यातें. (श्लोक १३.) २०. संसारनाशक. (राम.) २१. विकारशून्य. २२. उत्पन्न करतोस. २३. सत्वापासून सुरगण, रजापासून प्रजापति आणि तमापासून भूतपति या क्रमानें. (श्लोक १४.) २४. श्लोक १५ पहा. २५. सीता. २६. रावणातें. २७. नृप सेतुपथ पाहून कीर्ति गातील. २८. पर्वतांचीं शिखरें. या शृंगानीं सेतु बांधला. २९. वानरानें (मारुतीनें) जाळलेली.

वेष्टूनि ते नगरि वानर ते निघाले, लंकेंत घालिति गृहादिवरूनि धांले.[1] ।
हस्ती जसे ढवळिती ह्रदिनीजळाला[2] देखोनि रावण अहो! ह्रदयीं जळाला. ॥ २२
पुत्र[3] प्रहस्त अतिकायविकंपनादी धूम्राक्ष दुर्मुख दिशा भरिती स्वनादीं,[4] ।
सर्वांस त्यांस सहकुंभनिकुंभ धाडी,[5] तो कुंभकर्णहि उठे जग झोडि धाडी.[6] ॥ २३
येतां निशाचरचमू[7] अतिवीर्यशक्ती हातीं धनुष्य शर तोमर शूल शक्ती ।
सुग्रीव लक्ष्मण मरुत्सुत[8] ऋक्ष[9] नीळ या [10]अंगदादि सह ये प्रभु मेघनीळ.[11] ॥ २४
त्या अंगदादि रघुनायक वानरांनीं शस्त्रीं गदागिरितरूशरतोमरांनीं,[12] ।
ते मारिली निघनिघों चतुरंगसेना[13] सीतापहारकदळीं[14] शुभ तें दिसेना. ॥ २५
लंकेश लक्षुनि बलक्षय[15] कोपतापें ये वाहनावरि[16] चढोनि महाप्रतापें. ।
तों ये [17]सुरेंद्ररथ, त्यावरि रामराया हाणी शर त्रिशत रामशरें मराया. ॥ २६
बोले रघूत्तम,[18] 'खळा! मळ[19] राक्षसांचा तूं श्वान शून्यगृहभोजनभक्ष साचा ।
सीता [20]परोक्ष हरिसी, तुज निस्त्रपातें[21] मी काळ मारिन अमोघबळास्त्रपातें'.[22] ॥ २७
जों घे दशानन असा व्यवसाय[23] कानीं, दापूनि त्यास रघुनायक सायकानीं[24] ।
भेदूनि ऊर वधि, आनर्नि रक्त नाकीं, जैसा व्यथे[25] सुकृतसंचितरिक्त[26] नाकीं.[27] ॥ २८
रघुपति विजयी त्या रावणातें वधूनी, श्रम तदुपरि[28] केला राक्षसांच्या वधूनीं.[29] ।
शुक मग विभुलीला[30] दिव्य जे तीस वर्णी स्वपितृकृत[31] वदे हे श्लोक बत्तीसवर्णी.[32] ॥
श्लोकवृत्त कथिलें यमकांनीं,[33] गाति त्यांस न पडे यमें[34] कानीं. ।

---

१. हल्ले. २. नदीच्या उदकाला (ह्रद=पाण्याचा डोह, ते आहेत जिला ती नदी). 'नदिच्या जळाला' असाही पाठ आहे. (श्लोक १६–१७ पहा.) ३. इंद्रजित. ४. आपल्या गर्जनेनें. ५. पाठवी. (श्लोक १८ पहा.) ६. धाड घालणारा. ७. राक्षससेना. ८. मारुति. (श्लोक १९ पहा.) ९. आस्वल. (जांबवान्.) १०. वालिपुत्र. ११. घनश्याम. १२. तोमर–शस्त्रविशेष. १३. रथ घोडा, पायदळ व हत्ती हीं सेनेचीं चार अंगें आहेत. तीं जींत आहेत अशी सेना. १४. सीतेचा अपहार करणारा जो रावण त्याचे सैन्यांत. (श्लोक २० पहा.) १५. सैन्याचा नाश. १६. पुष्पकविमानावर अथवा रथावर. (श्लोक २१ पहा.) १७. इंद्ररथ. १८. श्लोक २२ पहा. १९. पुरीष. २०. न कळत. कुत्रा जसा असमक्ष घरांत शिरून कांहीं वस्तु घेऊन जातो तसा. (श्लोक २२.) २१. निर्लज्जातें. २२. कार्य करणाऱ्या अशा बलवान् अस्त्रपतनानें, सफळ होणाऱ्या शस्त्राघातें. २३. उद्योग. २४. बाणांनीं. २५. दुःख पावे. २६. पुण्यसंग्रह सरलेला. (श्लोक २३ पहा.) २७. स्वर्गी. २८. त्यानंतर. २९. स्त्रियांनीं. मंदोदरी इत्यादि स्त्रियांनीं शोक केला. (श्लोक २४–२८.) ३०. प्रभूचें (रामाचें) सहज चरित. ३१. शुकाचा पिता व्यास त्यानें केलेले. ३२. बत्तीस अक्षरी श्लोक, ज्यांत बत्तीस अक्षरें आहेत असे अनुष्टुप् छंदाचे श्लोक. ३३. यमकरचना ...

पावतील रघुनाथपदातें[1] जे सदां स्मरति नाथपदातें[2]. ॥ ३०

अष्टाक्षरी चरण तो यमकीं न साजे, लीलाच त्यांतिल सुखावह मानसा जे. ।
न प्रासही दिसति ज्यास बरे कदापी, कीं काळमृत्युस तदर्थचि एक दापी. ३१

समश्लोकीमध्यें रघुपति[3]! करी तो नियमकीं,
कथावे श्लोकार्थ स्वगुणरचनायुक्त यमकीं, ।
अनुष्टुप्पद्यातें म्हणुनि विशद छंदनिकरीं[4]
करीतो रामाचे चरण शिरिं ते वंदुनि करीं[5]. ॥ ३२

---

## अध्याय दुसरा.

(श्लोक.)

मृतां राक्षसांची वधूवृंद[6] सेना रडे आफळे, अंत दुःखा दिसेना. ।
स्त्रिया आणि मंदोदरी शोकरीती निघोनी पुरींतूनि भारी करीती. ॥ १ ॥

मेले सुमित्रात्मजसायकांनीं[7] आलिंगुनी त्यासहि बायकांनीं, ।
केला बहू शोक अनेक रीती उच्चस्वरें रोदन ज्या करीती. ॥ २

रडति दशमुखाच्या त्या स्त्रिया 'नाथ! नाथा!
तुजविरहित लंका आणि आम्हीं अनाथा; ।
नगरिवरि रुसोनी वीरशेजे निजावें
तरि शरण पुरीनें[8] आजि कोणास जावें? ॥ ३

होउनी वश तुवां मदनातें, आणिली प्रभुवधू[9] सदनातें, ।
क्षोभली जनकराजकुमारी, तो प्रभावचि असा तुज मारी. ॥ ४

लंका स्त्रियांसहित ते विधवाच केली, गृध्रान्न[10] ते तनुहि जे विषयीं भुकेली, ।
सद्वंशभूषणहि[11] तूं नरकासि जासी, केला अनर्थ सकळां तनुजानुजांसी[12].' ॥ ५

पुसोनि रामास बिभीषणानें क्रिया[13] मृतांच्या कुळभूषणानें ।
केल्या स्वशास्त्रें परलोकरीती, तिळोदकीं लोक जसे करीती. ॥ ६

देखे रघूत्तम अशोक वनांत सीते, नेत्रीं स्रवे विरहशोकवना[14] तसी ते. ।

---

१. रामाच्या स्थानाप्रत. २. स्वामीच्या पायास. ३. हे रघुनाथा. ४. वृत्तसमुदायीं. ५. हातांनीं. ६. स्त्रीसमुदाय. ७. सुमित्रात्मजाच्या (लक्ष्मणाच्या) सायकांनीं (बाणांनीं.) ८. लंकेनें. ९. सीता. १०. जे तनु विषयीं भुकेली ते गृध्रान्न, जो देह विषयासक्त झाला तो गिधाडांनीं खाण्यास योग्य. ११. तूं उत्तम कुलाचें भूषण असूनही, तुझा जन्म उत्तम कुळांत झाला असूनही. १२. तनुज=पुत्र, आणि अनुज=बंधु. १३. और्ध्वदेहिकक्रिया. १४. शोकाश्रुजल. (वन=उदक.)

नाहींच बिंदुभरिही जळ ज्यांत कंठी कंठीत हे दिन असी [1]जळजातकंठी. ॥ ७ ॥

पावली स्वविरहें तनु कंपा, राम तीव्ररि करी [2]अनुकंपा, ।
होय तोचि [3]सुखवासर सीते मग्न [4]रामसुखवासरसीं ते. ॥ ८

जवळि [5]अनुज सीता राम बैसे विमानीं,
[6]कपिपतिसह ज्यातें बंधुतें जेंवि मानी. ।
[7]दशमुखअनुजा दे [8]उत्तमश्लोक लंका,
पवनजसह यानीं घे तया [9]निष्कलंका. ॥ ९

प्रभु करि चिरजीवी शत्रुच्या [10]सोदरासी,
[11]रविशशि गगनीं तों राज्य दे [12]मोदरासी. ।
रघुपति परते, हो! तें सुरां सौख्य वाटे,
स्तविति [13]कुसुमवर्षे त्या विमानांत [14]वाटे. ॥ १०

[15]गोमूत्रपक्क [16]जव भक्षुनि वाट पाहे, येणें तदर्थ भरतावरि हो कृपा हे. ।
कीं [17]स्थंडिलावरि निजे, क्षण [19]कल्प [18]कंठी, जो प्राण ठेउनि असे बसला स्वकंठीं.॥

श्रवणिं भरत ऐके राम आला अयोध्ये,
अभिमुख [20]विभुतें ये, येति [21]आमात्य योध्ये. ।
[22]पुरजनगुरुसंगें पादुका मस्तकांतीं
करिति रविशशींच्या ज्या अहो! [23]ध्वस्त कांती. ॥ १२

वसे नंदिग्रामीं, परि हृदय रामीं भरत तो,
विना त्याचे पाय त्रिभुवनिं न जो लाभि [24]रमतो, ।

---

१. जळजात म्हणजे शंख (पाण्यांत झालेला) त्याजसारखा आहे कंठ जिचा अशी, कंबुकंठी. २. कृपा. ३. सुखाचा दिवस. ४. रामासह सुखानें वास करणें ह्याच रसांत. ५. लक्ष्मण. ६. सुग्रीवासह बसे, ज्या सुग्रीवाला भावासारखा मानी. ७. रावणाचा धाकटा बंधु बिभीषण. येथें 'दशमुखानुजा' असा संधि कर्तव्य असून तो वृत्तसुखार्थ केला नाहीं. ८. पवित्र आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा असा. (राम.) ९. निष्पाप अशा बिभीषणाला पवनजसह (मारुतिसह) राम पुष्पकयानीं घेई. १०. भावाला. ११. चंद्र सूर्य आकाशांत आहेत तोंपर्यंत. १२. आनंदराशी. १३. पुष्पवृष्टिद्वारा. १४. वाटेनें, मार्गांत. १५. गोमूत्रांत शिजविलेले. १६. सातु (यव—सक्तु) हें सुप्रसिद्ध धान्य आहे. याला 'होमधान्य' म्हणतात. १७. नुसत्या भूमीवर. १८. अतिदीर्घ काळ. १९. एक क्षण कल्पाप्रमाणे समजून कंठी (घालवी, लोटी). २०. प्रभूतें (रामाला) सामोरा येई. २१. अमात्य, प्रधान. २२. पुरांतील लोक व गुरु (वसिष्ठ) ज्याच्या बरोबर. २३. ज्या पादुका चंद्रसूर्यांचें तेज नाहींसें करतात. २४. रमतो.

बसे वेदाध्यायीं, धरि इतर ठाईं न मन तो,
करि वाद्यांगीतांसहित पदपद्मा नमन तो ॥ १३

कनकमय पताका, वृंदें[1] चित्रध्वजांचे,
रथ चपळ तुरंगीं स्वर्णसन्नाह[2] ज्यांचे, ।
कवचसहित योद्धे मुख्य मुख्य प्रजांचे
प्रभु[3] अभिमुख येती, दास पादांबुजांचे[4]. ॥ १४

चिन्हें महाविभवराजविलासमुद्रा आणी पुढें भरत त्या करुणासमुद्रा[5], ।
प्रेमें पदावरि पडे; विसरूनि देहा, आलिंगनें प्रभु भुजा पसरूनि दे हा[6]. ॥

प्रथम शिरिंहुनी त्या[7] पादुका पादपद्मा,
जवळि भरत ठेवी, ज्या पदीं निंत्य[8] पद्मा, ।
मग चरणिं पडे त्या क्षेमें[9] दे सुस्वभावा,
प्रभु नयनजळीं सप्रेम न्हाणी स्वभावा[10]. ॥ १६

ब्राह्मणांस करि वंदन पादीं[11], 'हें मला प्रिय' असें उपपादी[12]. ।
लक्ष्मण क्षितिसुतेसह[13] पायीं लोक वंदिति जयास उपायीं ॥ १७

कोसलाधिपति[14] कोसललोकीं[15] देखिला बहु दिसां अवलोकीं, ।
नृत्य वस्त्र उडऊनि करीती पुष्पवृष्टि वरि कौतुकरीती. ॥ १८

धरी भरत पादुका व्यंजन[16] चामरें[17] वीजिती[18],
बिभीषण कपींद्र जे निजसुखें तयाच्या जिती ।
सुधाकर[19] धरी मारुतसुत[20] सितातपत्रा[21] कृती[22]
प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्राकृती. ॥ १९

धरुनि सधनु भाते दास्य शत्रुघ्न मानी,
धरि करिं जळझारी रामकांता विमानीं, ।

---

१. चित्रविचित्र ध्वजांचे समुदाय. २. स्वर्ण=सोनें, सन्नाह=सामान, ज्या घोड्यांचें सामान सुवर्णाचें होतें. ३. 'प्रमुग्रति मुळ येती' असाही पाठ आहे. ४. (रामाच्या) चरणकमळाचे. ५. कृपासागर. ६. हा प्रभु. (राम.) ७. ज्या पादुका भरतानें नेल्या होत्या त्या. ८. ज्या पदीं नित्य पद्मा (लक्ष्मी) वसे त्या पादपद्माजवळ पादुका ठेवी. ९. आलिंगन. १०. आपल्या बंधूला. ११. पदाचे ठायीं. १२. प्रतिपादन करी, बोले. १३. सीतेसह. १४. राम. १५. अयोध्येच्या लोकांनीं. १६. पंखा. १७. चंवरी. १८. वारा घालिती. १९. चंद्र २०. वायुपुत्र (मारुति.) २१. शुभ्र (सित) छत्र (आतपत्र–आतपापासून उन्हापासून, त्राण करणारें.) २२. कुशल, धन्य.

धरियलिं असिचर्में[1] अंगदें[2] ऋक्षपाळें,
विभव नगरलोकां दाविलें हें कृपाळें. ॥ २०
रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योमवाटे,[3]
द्विजगुरुसह नेत्रां[4]उत्पलीं सोमें[5] वाटे, ।
नटति युवति गाती कीर्ति बंदी[6] विमानीं,
प्रियतमजन आत्मा आपुला जेंवि मानी. ॥ २१
रचित कुसुमरत्नें श्रीअयोध्या पुरी ते,
जन अमृतरसाच्या वाहती त्या पुरीतें[7]; ।
[8]नृपगृहिं गुरुपत्न्या माउल्या[9] त्यांस भावें,
नमन करि तयीं त्या तोषल्या बंधुभावें. ॥ २२
वंदिलें अवधियां वडिलां हो ! धाकुट्यां[10] स्वपदवंदनलाहो. ।
रामलक्ष्मणधरातनयांहीं घेतलें पुजुनि पूजन यांहीं. ॥ २३
वसे नंदिग्रामीं जननिहि विना रामनयनीं
न पाहे शत्रुघ्नासह भरत जो भूमिशयनी, ।
म्हणोनी [11]चौघांही भिजविति तिघी[12] एकसमयीं
तनुप्राणन्यायें नयनजळिं मायारसमयी[13]. ॥ २४
मग उकलि जटांतें राम कोदंडपाणी[14]
कुळगुरु जयिं न्हाणी घे चतुःसिंधुपाणी[15]; ।
त्रिदशगुरु[16] सुरेंद्रा, येरिती रामचंद्रा
द्विज वडिलहि देती मान वंशाब्धिचंद्रा[17]. ॥ २५

---

१. ढाला. २. आस्वलांचा स्वामी जांबवान् त्यानें. ३. आकाशमार्गीनें (व्योमवाट—हा संस्कृतप्राकृत शब्दांचा समास अप्रशस्त समजतात.) ४. नयनकमलांस चंद्राप्रमाणें वाटला. ५. चंद्र. ६. भाट, राजादिकांपाशीं असणारा स्तुतिपाठक. ७. प्रवाह. ८. 'नृपगृहिं गुरुपत्न्या माउल्या त्यांस भावीं, नमन करि तयांतें तोषिलें बंधुभावी' असाही पाठ आहे. ९. राममाता. १०. जे धाकटे होते त्यांजला सीतारामासारख्या थोरांस वंदन केल्याचा लाभ झाला, धाकटे मोठ्यांच्या पायां पडले. ११. चौघांपुत्रांस. १२. कौसल्या, कैकेयी आणि सुमित्रा या तिघी माता बाष्पोदकानें चौघां पुत्रास भिजविती. १३. मायेनें प्रेमरसपूर्ण अशा. १४. कोदंड (धनुष्य) आहे पाणीच्या ठायीं (हातांत) ज्याच्या असा. १५. चार समुद्राचें उदक अभिषेकासाठीं घेई. १६. त्रिदशांचा (देवांचा) गुरु जो बृहस्पती तो जसा इंद्रास मान देतो तसा द्विज व वडील माणसें रामाला मान देतात. १७. रविवंशरूप समुद्रास आनंदविणारा चंद्रच.

सुस्नात होउनि असा करुणांबुराशी अंगीकरी मग विभूषण अंबरांशी; ।
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें घे तो पदप्रद सुरां कमळासनातें. ॥ २६
प्रजा स्ववर्णाश्रमधर्मवाटे लावी, जया बापचि राम वाटे. ।
प्रजा गमे संतति त्या पित्याला स्पर्शों न दे दुःख कदापि त्यांला. ॥ २७
त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला, देखूनि राज्य करितां रघुवंशजाला. ।
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजांला, प्रेमें प्रजा भजति त्या भरताग्रजाला.॥२८
वनें नद्या पर्वत सर्व खंडें द्वीपांसमुद्रांसहितें अखंडें, ।
हे कामधेनू सकळां प्रजांला देखूनि होती भरताग्रजाला. ॥ २९
बहु भिति यमलोका श्रीवरा रामराया,
जन मरण न पावे जो न बैसे मराया; ।
वळखति न जराधिव्याधिशोकादिकां या
श्रमभय असुखातें नेणती लोककाया. ॥ ३०
रघुपती निज एकवधुव्रता शिकवि हो! जनचित्तमधुव्रता, ।
स्फुट करी गृहधर्म समस्त कीं धरुत लोक कथारस मस्तकीं. ॥ ३१
करि जनककुमारी नित्य निर्व्याज सेवा,
तुम्हिंहि जन मनीं हो! तो महाराज सेवा; ।
सगुण सलज्ज सीता भाव जाणे पतीचे,
मन हरिति पतीचें प्रेमसंलाप तीचे. ॥ ३२
रामवृत्त कथिलें यमकांनीं गाति त्यांसि न पडे यम कानीं, ।
भिन्न अर्थरचना सम जावी काव्यरीति चतुरीं समजावी. ॥ ३३

---

१. कृपासागर. २. वस्त्रांस. ३. सुरांस (देवांस) आणि कमलासनातें (ब्रह्मदेवातें) पद देणारा जो प्रभु (राम) तो आसन घे—असा अन्वय. ४. प्रजेस आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागण्यास लावी. ५. कृतयुगाप्रमाणें सुखप्रद. ६. रामचंद्राला. ७. नव खंडें. ८. ही सर्व प्रजेस इष्टफळ देणारी कामधेनु झाली. ९. रामाला पाहून. १०. जरा (वृद्धपणा,) आधि (मानसिक व्यथा), व्याधि (शरीरव्यथा) आणि शोक यांस. ११. लोकांचीं शरीरें. १२.एकपत्नीव्रता. १३. लोकांचें चित्त हाच कोणी मधुव्रत (भ्रमर) त्याला. 'मधुव्रता'बद्दल 'सधुव्रता' असा पाठ आढळतो. १४.सीता. १५.निष्कपट. १६. सेवन करा. १७. गुणशालिनी. १८. लज्जावती. १९. मनोगत. २०. प्रेमयुक्त संवाद. २१. यमकरचना करून, यमकयुक्त श्लोकांनीं. 'आवृत्तिं वर्णसंघातगोचरां यमकं विदुः' असें यमकाचें लक्षण आहे. 'श्लोकाचे प्रथम चरणाचे अंतीं, किंवा पूर्वार्धाचे अंतीं जीं अक्षरें आलीं असतात तींच एक दोन तीन चार पाहिजे तितकीं अक्षरें दुसऱ्या चरणाचे किंवा अर्धाचे अंतीं असतात असा जो शब्दालंकार तो' यमक होय. यमकाचे अनेक प्रकार आहेत.

## अध्याय तिसरा.

(श्लोक.)

तदुपरि[1] शुक सांगे, राम मांडी मखातें[2]
निज पदचि यजी[3] जें हें जगद्धाम खातें; ।
गुरुवचनविधानें लंकनाथारि[4] पूजी
सुरमय सुर सेवी तद्रिपूंचा[5] रिपू जी ! ॥ १
दिशा पूर्व होत्या[6] दिल्ही दक्षिणा हो !
दिल्ही ब्रह्मयातें दिशा दक्षिणा हो ! ।
प्रतीचीस[7] अध्वर्यु दे जो तयाला,
उदीची[8] दिशा देत उद्गातयाला. ॥ २
आचार्य जो मध्यम भू तयाला, देतां महा उत्सव दातयाला. ।
'हें निस्पृह ब्राह्मण सर्व लाहो', 'गोडी' म्हणे राम 'मतीस लाहो'. ॥ ३
तनुस[9] अंबरमात्रचि[10] भूषणें[11] इतर सर्व दिल्हें रघुभूषणें[12]. ।
करि असें रघुनंदन दान कीं उभि समंगळसूत्रचि[13] जानकी. ॥ ४
घेऊनियां ब्राह्मण सर्व लाहो ते बोलती ब्राह्मणवत्सला[14] हो ! ।
जो ब्राह्मणांचा स्वयमेव देव प्रभूसि त्या बोलति भूमिदेव[15]. ॥ ५
'न जी ! दीधलें काय आम्हांसि देवा ! दिल्हें फार याहूनिही देवदेवा ! ।
प्रकाशोनि चित्तीं अविद्यातमातें हरी देखतों त्याचि सर्वोत्तमातें. ॥ ६
सर्वज्ञता दशशताननही[16] न मोजी ब्रह्मण्यदेव रघुराज ! तुतें नमो जी ! ।
तूं पुण्यमूर्ति अजि ! मस्तकरत्न[17] देवां, जो दे स्वपादरज हंस[18] जना सदैवां.' ७
जयाचा जगीं कीर्तिसंलाप होतो, स्वयें गूढ रातीं जना हो ! पहातो, ।
वदे एक कोणी स्वभार्येस वाचा तितें आयके श्रोत्रें[19] तो राघवाचा. ॥ ८
'स्वयें जासि दुष्टे ! पराच्या गृहातें, नव्हें राम मीं, कीं धरूं तूज हातें, ।

---

१. त्यानंतर. २. यज्ञातें. ३. यज्ञ करी, पूजी. ४. लंकनाथ रावण त्याचा शत्रु. (राम.) ५. त्यांच्या (देवांच्या शत्रूंचा शत्रु जो सुरमय (देवस्वरूप) राम तो सुर सेवी (देवांची सेवा करी). ६. होता, ब्रह्मा, अध्वर्यु, आणि उद्गाता असे चार ऋत्विज यज्ञांत असतात. ७. पश्चिम दिशेला. ८. उत्तर दिशा. ९. शरीराला. १०. वस्त्रमात्र. ११ शरीरआच्छादनार्थ वस्त्रमात्र ठेवून इतर सर्व भूषणें दान केलीं. १२. रामानें. १३. सीतेच्या गळ्यांत मंगळसूत्र होतें--अन्य अलंकार नव्हता. १४. ब्राह्मणावर दया करणारा. १५. ब्राह्मण. १६. दशशत (एक हजार) आननें (मुखें) ज्यास असा. (शेष.) १७. शिरोभूषण. १८. परमहंस. १९. कान.

दशग्रीव लाऊनि ने हात सीते वैधूलुब्ध अंगीकरी हो तसी ते.' ॥ ९
दुराराध्य जे अज्ञ ते लोकरीती न जाणोनि वार्ता अशाही करीती; ।
म्हणूनी सतीतें वियोगाश्रमातें करी, जाय ते वाल्मिकीआश्रमातें. ॥ १०

ऋषि जवळि असे ते गर्भिणी रामराणी,
नव विभवहि मानी डोहळ्यांची शिराणी. ।
कुश लव सुत दोघे होति ते दिव्य काळीं,
मुनि करि विधिकर्मे उत्सवाच्या सुकाळीं. ॥ ११

ऐसेच लक्ष्मणकुमारहि वंशकेतु तो एक अंगद दुजा सुत चित्रकेतु, ।
तक्षाख्य पुष्कर असीं भरतात्मजांचीं नामें कुळें बहुत विस्तरणार ज्यांचीं.॥ १२

शत्रुघ्नपुत्रीं स्वसमानसाचीं नामें सुबाहु श्रुतसेन साचीं; ।
शत्रुघ्न मारी असुरास आणी तद्वित्त रामार्पणहेतु आणी. ॥ १३

शत्रुघ्ननामगत दाखवि अर्थ साचा कीं पुत्र जो लवण त्या मधुराक्षसाचा, ।
मारूनि तो मधुवनीं मथुरा स्रजी कीं जीमाजि कृष्णतनु राम खेळास जिंकी.॥ १४

पतीचीं पदें काननीं रामरामा स्मरोनी म्हणे आननीं, 'राम ! रामा !' ।
मुनीच्या करीं पुत्र आणूनि घाली, क्षितींत स्वयें मायपोटीं निघाली. ॥ १५

आयकोनि जरि शोक निवारी, चालिलेंच नयनांतुनि वारी. ।
राखिले गुण तिचे हृदयातें नावरेच अजि ! त्या सदयातें. ॥ १६

सीताहेतु क्लेश आद्यंत रामा, एवं लोकीं दुःख मूळाच रामा, ।
थोरां थोरां कष्ट यांच्याचि संगें दावी ऐसें राम सीताप्रसंगें. ॥ १७

तयाहीवरी अग्निहोत्रादि याजी करी ब्रह्मचर्य स्वयें तो क्रिया जी, ।
अखंडाग्नि तेरा सहस्राब्द होमी करी ख्याति कीं कर्मकर्ता अहो ! मी.॥ १८

पदयुग मृदु जें कां पल्लवातुल्य वाटे,
तदपि तुडवि कांटे दंडकारण्यवाटे; ।
स्मरत चरित त्याला ठेवुनी तोचि ठेवा
गमन करि मनीं ते लोक हो ! पाय ठेवा. ॥ १९

१. स्त्रीलंपट. २. हा राम. ३. आराधना (सेवा) करण्यास कठिण. ४. सीतेतें. ५. आवड. ६. वंशध्वज. ७. हे लक्ष्मणाचे ऊर्मिलेपासून झालेले पुत्र. ८. तक्ष आणि पुष्कर हे भरताचे पुत्र. ९. शत्रुघ्नाचे पुत्र. १० आणखी. ११. त्या राक्षसाचें धन. १२. रामाला देण्यासाठीं. १३. घेऊन येई. १४. शत्रुघ्न नांवाचा, 'शत्रूंस मारणारा' असा शब्दार्थ. १५. उत्पन्न करी. १६. कृष्णावतार धारण करणारा. (राम.) १७. लवणाला. १८. सीता. १९. मुखानें २०. स्वतः सीता. २१. उदक. २२. स्त्रिया. २३. संचय केलेलें धन.

आश्चर्य कीं, अधिक साम्य जया असेना, त्याला सहाय समरीं कपि ऋक्षसेना; ।
बांधी समुद्र, वधि रात्रिचरादिकांही[1] हे कीर्ति तारकहि त्यास न थोर कांहीं. ॥ २०
गाती ऋषी नृपऋषीप्रति[2] या यशांतें, पापघ्न शुभ्र[3] करि दिग्गज जो दिशांतें; ।
तो राम मी शरण तच्चरणांबुजातें संभाविती सुरनरेंद्रकिरीट[4] ज्यातें. ॥ २१

रघुपतिचरणांचा दर्शनस्पर्शलाहो
उठत बसत चित्तीं राघव स्पर्शला हो ! ।
निघति परम योगी भाग्य तें कौसलाहो !
जितचि भव[5] जयांचा राघवीं नासला हो. ॥ २२

पुरुष रघुपतीच्या आयके जो कथा रे !
भवभय न तयाचें हें घडी एक थारे; ।
तुटति सकळ कर्मै होय दुःखाग्नि हिंसा[6]
परमकरुण भूतीं होय टाकूनि हिंसा[7]. ॥ २३

नृप[8] पुसत शुकातें, 'वर्तला केंवि राम?
स्वजनअनुजलोकीं[9] सर्वलोकाभिराम[10], ।
वद सकळ जनींही केंवि तो पूर्णकाम[11]?
प्रियतर वरिला जी[12]! हा करीं पूर्ण काम.' ॥ २४

सिंहासनीं बसलिया वरि दिग्जयातें, धाडी स्वबंधुवश सर्वहि ते अर्थातें[13]; ।
भृत्यांसह प्रभु फिरे नगरीस पाहे श्रीमूर्ति दाखवि जनांस करी कृपा हे. ॥ २५

गजमदसलिलाचे[14] कीं सडे चंदनाचे,
सुरवरमुकुटांचे वोवसे[15] वंदनाचे; ।
नगर विविध दावी भाव हे मानसाचे
रघुपतिपदपद्मीं लाधले मान साचे. ॥ २६

गोपुरें उपरमाडिया सभा हेमकुंभ[16] वरि देति यास भा[17]; ।

---

१. राक्षसादिकांस. २. राजर्षि. ३. स्वच्छ. ४. देवांचे आणि राजांचे मुकुट. ५. संसार. ६. दुःखाग्नि हिंसा (हिमसा–थंडसा) होई. ७. हनन करणें, जीवघात. 'परम करुणमूर्ति होय टाकूनि हिंसा' असाही पाठ आहे. ८. परीक्षित् राजा. ९. प्रजा आणि बंधुवर्ग यांच्याशीं. १०. सुंदर, प्रिय. ११. सफलेच्छ. १२. अजी, अहो. १३. ज्या रामाला. १४. हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणाऱ्या दानोदकाचे. १५. व्रत, नियम. १६. सुवर्णाचे कळस. १७. शोभा.

मंदिरीं सुरगृहीं ध्वजांचि या साउल्या निबिड नित्य ज्यांचिया. ॥ २७
प्रतिद्वार रंभादिपूगीफळांचे तरू घोंस केले फुलांपोफळांचे ।
प्रभा तोरणामाजि कां आरशांची महा दीप्त हेमांबरा फारशांची. ॥ २८
स्थळीं स्थळीं आणुनि पूजनातें तों पूजिती लोक निरंजनातें; ।
ते बोलती, 'पाळि अजि! क्षितीतें पूर्वी तुवां उद्धरिलेंचि तीतें.' ॥ २९
देखोनि काळें बहु राघवास त्यों त्या पाहती टाकुनियां गृहा सैत्या; ।
ज्या सुंदरी वेंचति मंदिरोपरी पुष्पें बहू वर्षति हो! परोपरी. ॥ ३०
ये त्यावरी निजगृहाप्रति जें विराजे, कीं देखिले सकळ पूर्वज रौजराजें; ।
वस्तू अमोल्य गणना न धना कदापी जें कां कुबेरवरुणेंद्रगृहांस दीपी. ॥ ३१
स्वयंभा वैडूर्या करुनि रचिले स्तंभ बरवे,
तयांच्याही पंक्ती क्षितिवरी बरी पाच मिरवे; ।
प्रवाळाचीं द्वारें स्फटिकमय भिंती विरचिता,
गृहाच्या रामाच्या सकळ रचना दिव्य उचिता. ॥ ३२
शृंगारिलें चित्रविचित्रहारीं मुक्तादिकीं रत्रितमोपहारी, ।
सर्वोपभोगार्थ समृद्धिकारी वसे गृहीं त्या प्रभु निर्विकारी. ॥ ३३
सुगंधी सदा धूपदीपीं विराजे, जनस्वामी त्यांच्या गृहीं जेंवि राजे, ।
स्त्रिया जेंवि देवांगनां दास दासी अशा मंदिरीं चित्त रामीं उदासी. ॥ ३४
प्रभु करि सहसीता त्या गृहीं लोकलीला,
श्रवणपठणमात्रें नाशती ज्या कलीला; ।
स्वसुखरतविरक्तां सेव्य जो राम होतो
स्मर तदुरतिकाळीं श्रीघनश्याम हो! तो. ॥ ३५
स्वधर्मानुकूळ प्रभू भोग सारे यथाकाळ भोगूं न वर्णीं असारे, ।
बहू वर्षवृंदें जरी राहिला हो! दिल्हा वामनाला पदध्यान लाहो. ॥ ३६

---

१. केळी सुपारी आदिकरून. (रंभा=केळ, पूगीफळ=पोफळ.) २. पुष्कळ अशा हेमांबरांची (कनकवस्त्रांची). ३. मायारहितातें. (ईश्वरातें.) ४. रामास. ५. पौरांगना. ६. वडती. ७. कुबेरानें. (राजांचा-यक्षांचा राजा स्वामी ज्यानें.) ८. तुच्छ मानी. ९. रत्नविशेष. १०. अंधकारनाशक. ११. अप्सरा. १२. पापाला. १३. वर्षांचे समुदाय, पुष्कळ वर्षे.

# कृष्णजन्म.

(श्लोक.)

करुनि नमन एका देवदेवा हरीतें,
भवभय अवघेंही नाम ज्याचें हरीतें; ।
हरिविण इतरातें सेवितां बद्ध होतो
कथिन चरितरूपें, व्यासभावार्थ, हो ! तो. ॥ १

ठेउनि नंदसदनांत हरि स्वहातें
मांया व्रजेशतनया तिस ने गृहातें; ।
आणी अजा, त्यजुनि अन्य गृहीं अजाला,
तों बद्ध मागुति पहा वसुदेव झाला. ॥ २

कथेमाजि या तत्व हें व्यासदेवें असें दाविलें, जें पहावें सुदैवें. ।
हरी जन्मला तेथुनी हे कथा रे ! तरे, या चरित्रीं जरी चित्त थरे. ॥ ३

प्रहर दोनि निशा विमलक्षणीं, प्रगटला निजउत्तमलक्षणीं, ।
दिसतसे भुवनत्रयपालक, त्रिदशनायक अद्भुत बालक. ॥ ४

नयन सुंदर ते श्रवणावधी; विमलदृष्टि अजा त्रिगुणा वधी; ।
प्रगटला अतिअद्भुत बालक, विधिपितो जगचालक पालक. ॥ ५

---

१. हें सगुणभगवल्लीलावर्णनात्मक प्रकरण श्रीमद्भागवत—स्कंध १० अध्याय ३–४ यांच्या आधारें लिहिलें आहे. यांत कृष्णाची जन्मकथा वर्णिली आहे म्हणून यास 'कृष्णजन्म' असें नांव दिलें आहे. या श्लोकांत नमस्कृतिरूप मंगल असून कथेचें अवतरण केलें आहे. २. इंद्रादिक सकल देवांचा देव, परमेश्वर. ३. संसाररूप भीति. ४. हरण करितें, नाहींसें करितें. ५. देवाधिदेव जो परमात्मा हरि त्यावांचून इतर देवांची उपासना करणारा प्राणी बद्ध होतो. ६. श्रीकृष्णचरित्ररूपानें. ७. प्राणी बद्ध होतो, हा व्यासोक्तीचा भावार्थ. ८. अहो. ९. वसुदेवानें श्रीकृष्णास गोकुळांत नंदाच्या घरीं ठेवून योगमाया जी आदिशक्ति तिला स्वगृहीं बंदिशाळेंत आणिलें अशी कथा आहे. १०. आदिशक्ति, अविद्या. ११. नंदाची मुलगी (तनया). १२. जन्मरहित माया तिला आणिलें. १३. जन्मरहिता कृष्णा. १४. अजाला (परमात्मस्वरूप देवाला) सोडून मायेला आणिलें म्हणून वसुदेव बद्ध झाला. १५. या श्लोकांत वर्णन करावयाच्या कथेचा सारांश वामनानें थोडक्यांत सांगितला आहे. १६. 'हरिविण इतरांतें' इत्यादि व्यासोक्तीचें खरेंपण. १७. दैववानानें, भाग्यवंतानें. १८. जर चित्त स्थिर राहील तर. १९. निर्मल क्षणीं, शुभमुहूर्तीं, निर्मल समयीं. २०. लक्षणांनीं संपन्न. २१. देवांचा नायक, देवाधिदेव. २२. आकर्ण, कर्णपर्यंत नयन. २३. सत्त्व, रजस् आणि तमस् या त्रिगुणांचा नाश करणारा. २४. तो बालक ब्रह्मदेवाचा पिता (जनक) आणि जगाचा पालक व चालक होय.

[1]भुजा चारि; हातीं धरी शंखचक्रें, गमे सिद्ध मारावया [2]दैत्यचक्रें, ।
गृहीं दीप्ति त्या अद्भुता बालकाची दिसे, सर्व लोकांचिया पालकाची. ॥ ६
श्री[3]वत्सयुक्त उर सुंदर केशवाचा, वर्णूं शके न गुण ज्यांतिल लेश वाचा; ।
शोभे गळां परम [4]कौस्तुभ [5]भासमान; ज्योतीस ये न [6]रविची [7]अतिभा समान.॥७

[8]कनकवसन, [9]यावा ज्यांत [10]सौदामिनीचा
[11]घनतनुवरी वास श्रीजगत्स्वामिनीचा; ।
[12]श्रवणिं मणिकिरीटी कुंडलें सुप्रभातें,
[13]तरुणअरुणशोभा जेंवि फांके प्रभातें. ॥ ८

शोभे [14]कटीं जडित सुंदर [15]रत्नकांची [16]श्रीअंगदें [17]मणिमयें [18]सहमुद्रिकांची; ।
ऐसी तनू परमअद्भुत बालकाची देखे [19]यदूत्तमपिता जगपालकाची. ॥ ९
आनंदसिंधु[20]सलिलांत [21]निमग्न झाला, देखोनि [22]शूरसुत तो स्वसुता अजाला; ।
सप्रेम तो हळहळू गुण केशवाचे वर्णून, [23]कंसभयही कथि लेश वाचे. ॥ १०
'व्रजा जाउनी नंदगेहीं [24]रमाया,' असी घालुनि आपुली स्वैर [25]माया ।
म्हणे, 'नंदकन्येसि आणूनि ठेवा, व्रजीं आपुला देह नेऊनि ठेवा.' ॥११
ऐसें वदूनि जनका यदुवंशजाला, सद्यःप्रसूतजन बालकरूप जाला; ।
[26]वेशांतरें नट जसा निजभाव दावी, ते ईशशक्ति गति अद्भुत ते वदावी.॥१२

---

१. हें अष्टवर्षात्मक चतुर्भुज श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन आहे. शंखचक्रगदापद्मधारी मूर्तीनें प्रसवसमयीं देवकीपुढें उभी राहून बालकत्व धारण केलें. २. दैत्यसमुदाय. ३. श्रीवत्स हें भृगूच्या लाथेचें चिन्ह उरावर ज्याच्या आहे असा. (स्कंध १० अध्याय ३ श्लोक ९–११.) ४. समुद्रमंथन केल्यानंतर उत्पन्न झालेल्या चौदा रत्नांपैकीं एक, कौस्तुभ नामक मणि. या रत्नांचीं नांवें:–'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः । अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मंगलम् ॥'. ५. तेजस्वी, प्रकाशमान. ६. सूर्याचें अत्यंत प्रखर तेज कौस्तुभाची बरोबरी करीना. ७. अत्यंत तेज. ८. पीतांबर. सोन्याच्या कांतीसारखा तेजस्वी पीतांबर. ९. येणें, आगमन. १०. विद्युल्लतेचा. ११. मेघासारखें शरीर ज्याचें त्यावर. १२. कानांत. १३. तरुण सूर्याची शोभा जशी प्रभातीं फांकते तशी रत्नखचित किरीटकुंडलांची शोभा कानांवर चमकत होती. १४. कमरेंत. १५. कमरपट्टा. १६. बाहुभूषणें. १७. रत्नखचित. १८. मुद्रिका आहेत जिला अशी तनु. १९. यादवांतील श्रेष्ठ वसुदेव. २०. उदकांत. २१. बुडाला. २२. वसुदेव. २३. केशवाचे गुण वर्णून कंसापासून भय आहे असेंही थोडक्यांत सांगितलें. २४. गोकुळांत राहण्यासाठीं. २५. आदिशक्ति. २६. वेष पालटून नट जसा त्या त्या वेषास अनुरूप असा भाव दाखवितो त्याप्रमाणें श्रीकृष्ण ही करी, त्यानें मोठें रूप टाकून नंदगृहीं बालरूप धारण केलें.

'नि गोकुळासि मज' येरिति देवदेवें आज्ञापिला निजपिता वसुदेव देवें. ।
विष्णुत्व[2] दाउनि शिशू जलजाक्ष[1] झाला, [3]तों चालिलाचि उचलुनि [4]अधोक्षजाला.

उचलुनि हरि जों तो होय सानंद [5]जाया,
प्रसवलि गुण[6]माया गोकुळीं [7]नंदजाया; ।
त्रिभुवनपतिची ते शक्ति, हो, योगनिद्रा
करि सकळ जनातें [8]भ्रांतिसंयोगनिद्रा. ॥ १४

[9]निशा अर्ध, नाहींच लोक[10]प्रवृत्ती, विशेषें बुडाल्या [11]तमीं [12]क्षिप्रं [13]वृत्ती; ।
करी द्वारपाळां महा गाढनिद्रा, जसी जन्मली गोकुळीं योगनिद्रा. ॥ १५

जयां ठेवी द्वारीं बहुभरंवशानें [14]खेळ [15]खेळां
तयां लागे निद्रा; गळति कुलुपें, हो खळखळां. ।
निघे [16]बेडी घेतां उचलुनि घनश्यामल हरी,
[17]भवग्रंथी ज्याची [18]परिहरि कृपासिंधुलहरी ॥ १६

कवाडें लोहाचीं न निघति कधीं जेंवि [19]निकरें,
घणीं जीं लोहारीं बसविलिं खिळे ठोकुनि करें; ।
[20]असंगाचें शस्त्र प्रभु उचलितां तीं उघडती;
कटाक्षें कृष्णाच्या अघटित विचित्रेंचि घडती. ॥ १७

हलुहलु [21]घनें गर्जे, तीव्र वर्षोनि [22]वारी,
[23]शेषशतफणि त्यातें छत्ररूपें [24]निवारी. ।
सखि [25]बहिण यमाची क्रूर त्याहूनि वाटे,
भय मनिं वसुदेवें मानिलें फार [26]वांटे. ॥ १८

---

१. कमलनेत्र. २. विष्णूचें शंख चक्र गदा पद्म श्रीजुष्ट चतुर्भुजादि दिव्यरूप दाखवून. ३. तंव, त्या बरोबर, बालरूप घेतल्या बरोबर. ४. विष्णूला. 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः' अथवा 'द्यौरक्षं पृथिवी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥.' ५. जावयाला. ६. सगुण मायेला. ७. नंदाची स्त्री यशोदा. ८. योगनिद्रेनें सर्वांस भ्रांति आणि निद्रा यांत निमग्न केलें. सर्व भ्रांत आणि निद्रित झालीं. ९. मध्यरात्रसमयीं. १०. व्यवसाय, लोकांची चळवळ नाहीं. ११. अंधकारांत. १२. त्वरित. १३. जीविका, लोकांच्या वृत्ति अज्ञानांधकारांत बुडून गेल्या. (अध्याय ३ श्लोक ४६–४८.) १४. खळ कंस. १५. दुष्टां द्वारपाळां. १६. वसुदेवाच्या पायांतील शृंखला तुटून पडली. १७. संसाररूप ग्रंथि. १८. ज्याची कृपासिंधुलहरी भवग्रंथि परिहरी—असा अन्वय. १९. जोरानें. २०. संसारविरक्तिशस्त्र, प्रपंचानासक्तिशस्त्र. २१. मेघ. (अध्याय ३ श्लोक ४९.) २२. उदक. २३. शेष. (सहस्र फणा ज्याला तो.) २४. शेषानें आपलें फणारूप छत्र उभारून पर्जन्याचें निवारण केलें. २५. यमुना नदी. २६. वाटेनें, मार्गांत.

उघडितां क्षण, मागुति लौकरी, सुरपती अतिवृष्टि जगीं करी; ।
जनभयानक होय यमानुजा, बहु सफेनजलाकुलभानुजा. ॥ १९

शतें आवर्तांचीं; अचल चलती चंचलगती
असे मोठे फेन भ्रमति उदकें त्यांत फुगती; ।
नदी ते दे मार्ग स्थिरपतिस तेव्हां झडकरी,
जसा झाल्या सेतू, जलधि पथ रामार्पण करी. ॥ २०

शुभांगी जसी विंचरीते शुभांगा, द्विधा केश सारी, करी आशु भांगा, ।
कलिंदात्मजेचें तसें होय पाणी, पथें त्या पिता ने शिशू चक्रपाणी. ॥ २१

नंदव्रजाप्रति असा वसुदेव देवा आणी सुखेंचि यमुनेंतुनि देवदेवा; ।
तों झोंप गोवळजनां अति, गोपिकांहीं, गेला गृहांत नकळेचि तथापि कांहीं. ॥

यशोदेसि होतां सुता योगनिद्रा, समस्तां स्त्रियांयुक्त ये गाढ निद्रा ।
न जाणेचि ते पुत्रि कीं पुत्र कांहीं, न ते लक्षिली आणिकां बायकांहीं. ॥ २३

यशोदेपुढें ठेउनी कृष्णजीतें, गृहा ने तिला 'ने' म्हणे कृष्ण जीतें, ।
स्वभार्येपुढें तीस आणूनि घाली, पदीं त्याचि बेडी क्षणीं त्या रिघाली. ॥ २४

घे ज्या गृहींच उचलूनि अधोक्षजाला, बेडी निघोनि अति सत्वर मोक्ष झाला; ।
मीया तयाच सदनीं भरि शृंखळांला, जागें करी स्वरुदितेंचि तयां खळांला. ॥

हरी ठेवी, माथा उचलुनि गृहा ये झडकरी;
हरीच्याही बापाच्या चरणिं दृढ ते बंधन करी. ।

---

१. क्षणभर. २. इंद्र. ३. लोकांस भयावह अशी. ४. यमुनानदी. ५. फेनयुक्तउदकव्याप्त. ६. सूर्यकन्या यमुना फेणानें आणि उदकानें भरून गेली. ७. भोंवऱ्याचीं शतें, शेंकडों भोंवरे. ८. पर्वत. (चलन न पावणारे, स्थावर असे जे पर्वत.) ९. फेंस. १०, स्थावर पदार्थांचा स्वामी जो कृष्ण त्याला. ११. सेतु झाल्यावर. १२. समुद्र. १३. मार्ग. १४. सुंदर स्त्री. १५. उत्तमांग, मस्तका. १६. दोन भाग. १७. त्वरित. १८. यमुनेचें. १९. तेव्हां गोपिकांलाही अति झोंप लागे—असा अर्थ. २०. माया यशोदेच्या पोटीं उत्पन्न झाल्यावर. २१. सर्व स्त्रीजनाला निद्रा आली. २२. जितें कृष्ण गृहा ने असें म्हणाला तितें गृहा आणिलें २३. सुटका. २४. "यांत पहिल्या व शेवटल्या चरणांतील चकार निरर्थक अधिक आहेत. पहिल्या चरणांत 'गृहींच' या ठिकाणीं 'गृहांत' असा शब्द आणि चौथ्या चरणांतील 'चितया' एथें 'सकळा' असा शब्द घातला असतां [या] पद्याची बरीच शुद्धि होईल." २५. माया दृढबंधन घाली. जे मायेस वश होतात ते बद्ध होतात, इतर मुक्त होतात—असा भावार्थ. २६. आपल्या रोदनानें. २७. दुष्ट जो कंस त्याला. २८. बापाच्या. २९. या मायेनें हरीच्याही बापाला बद्ध केल्याशिवाय सोडिलें नाहीं.

हरीच्या आज्ञेहीकरुनि इतरांतें न यजिजे,[1]
अनन्यें सद्भक्ती करुनि हरितें त्याचि भजिजे. ॥ २६
निघालीसे वाटे क्षण, चरणिं बेडी[2] तरि पडे;
न बंधाचा[3] कंद त्रिभुवनपतीवीण उपडे. ।
जई राया कंसा, गज वधुनि[4] मल्लांसह वधी.
पुन्हा कृष्णप्राप्ती करुनि सुटका ते निरवधी.[5] ॥ २७
हरी[6] वामनाचा[7] हरी[8] क्षिप्र बंध; स्वनामेंचि[9] जो हा तयाचा प्रबंध,[10] ।
कथातत्वनामें जगीं हो प्रसिद्ध; प्रकर्षें जया वर्णितो विप्र[11] सिद्ध. ॥ २८

---

## मृत्तिकाभक्षण.[12]

(श्लोक.)

स्वउदरांत चराचर[13] मृत्तिका, पसरुनी मुख दावित कौतुका, ।
प्रगट जो करि बाल्यकथारसा,[14] नमिन त्या हरिच्या पदसारसा.[15] ॥ १
गोपबालक गडी बळिराम, क्रीडतां हरिसवें अभिराम,[16] ।
'मृत्तिका सुत तुझा घननीळा[17] भक्षितो' वदति हें जननीला.[18] ॥ २
न रागेजणारी[19] कधीं नंदराणी, करी कृष्ण खोडी तिला हे शिरोमणी;[20] ।
तरी मृत्तिका भक्षितां कृष्णजीतें दटावी, चढे क्रोध अत्यंत जीतें. ॥ ३

---

१. यजन (पूजन) करावें. २. ही मायेची बेडी उपदेशानें क्षणभर निघाली तरी ती पुनः उपदेशाचा ठसा उडून गेल्यावर पडते आणि दृढ होते. ३. या बेडीचा (बंधनाचा) कांदा (मूळ). ४. कृष्ण व बलराम यांनीं मथुरेच्या वेशींत गजाला आणि मल्लांला ठार केलें, या कथेकडे येथें लक्ष्य आहे. ५. अनंत कालपर्यंत. ६. कृष्ण. ७. वामनपंडिताचा भवबंध हरण करतो. ८. हरण करी. ९. वामन हें विष्णूचेंही नांव आहे. १०. काव्य, कथा. ११. शुकमुनि. १२. हें प्रकरण श्रीमद्भागवत-स्कंध १० अध्याय ८ याच्या अनुरोधानें रचिलेलें आहे. एकदां कृष्णानें माती खाल्ली, तेव्हां यशोदा त्यास रागें भरली. त्यावरून त्यानें आपलें तोंड उघडून मृत्तिका भक्षण केली नाहीं असें दाखविण्याच्या मिषानें तोंडांत मातीपासून रचलेलें चराचर विश्व दाखविलें, अशी कथा या काव्यांत वर्णिली आहे, म्हणून यास 'मृत्तिकाभक्षण' असें नांव आहे. १३. मातीपासून उत्पन्न केलेलें सकल स्थावरजंगमात्मक विश्व. १४. बाळपणच्या कथारसास. १५. चरणकमळा. (सारस=कमल.) वामनानें काव्यारंभींच वर्ण्यकथाभागाचा सारांश या श्लोकांत सांगितला आहे. १६. रमणीय, सुंदर. १७. तुझा घनासारखा (मेघासारखा) श्यामवर्ण सुत. १८. यशोदेला. १९. रागें भरणारी, रागास जाणारी. (अध्याय ८ श्लोक ३३.) २०. आवड, कौतुक.

[1] कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें[2];
दुजा हस्त क्रोधें हरिवरि उगारूनि निकरें[3], ।
दटावी; तेवेळीं भयचकित[4] डोळे करि हरी,
करी अंडत्रासें[5] वरि कर दुजा [6]जो भय हरी. ॥ ४
असीं कोटि अंडें जयामाजि माती, तया 'खादली कां,' म्हणे 'आजि माती ?' ।
मुखश्री करूनी हरी दीनवाणी, असत्यांतही बोलतो सत्य वाणी. ॥ ५
'माती नाहीं खादली म्यां, यशोदे! यां [9]सर्वांची गोष्टि मिथ्या असों दे, ।
मिथ्या तूतें ज्येष्ठही बंधु सांगे; जो, तो, [10]यांचा शब्द मिथ्या असा गे!. ॥ ६
जाण हे [11]अनृत सर्व [12]वैखरी; मानिसी जरि, तथापि ही खरी, ।
माझिया निजमुखाकडे तरी दृष्टि दे बरवि [13]बाह्य अंतरीं.' ॥ ७
[14]मृषा लोकवाणी, मृषा अर्थ तीचा; खरा अर्थ तो वेदवाणीश्रुतीचा; ।
असे ती मुखीं आपुल्या वेदवाचा, पहा तीस; भावार्थ तो माधवाचा. ॥ ८
असत्य हें बोलति सर्व वाचा, साचा असा शब्दहि माधवाचा; ।
[15]असत्य हें यास्तव बोलिलों कीं, सत्यत्वही सर्व असत्य, [16]लोकीं. ॥ ९
मृषा तरी हा व्यवहार साचा, यालागिं या वाक्यसुधारसाचा, ।
मिथ्या दिसे भाव, म्हणूनि दावी पोटींच माती, गति हे वदावी. ॥ १०
'नसे खादली, खाउनी [17]मृत्तिकाही,' म्हणे, या स्ववाक्यासि मिथ्यत्व कांहीं ।
दिसे, तें हरायास पोटांत सारे तिला दाखवी मृत्तिकेचे पसारे. ॥ ११
पोटांत बाहेरुनि जें रिघेना, तें भक्षणप्राय म्हणूनि घेना; ।
म्हणोनि हे मृन्मय लोक सारे पोटांत हे दाखविले पसारे. ॥ १२

---

१. श्रीकृष्णाचा हात. २. हातानें. ३. जोरानें. ४. भयानें कावरे बावरे झालेले, भयपीडित. ५. सकल ब्रह्मांडाच्या भयानें, कृष्णाला भय वाटलें म्हणून सकल विश्व भयाभीत झालें–असा भाव. ६. दुजा कर जो भय हरी तो अंडत्रासें वर करी–असा अन्वय. ७. ब्रह्मांडें. ८. मावतात. ९. या गोपबालकांची. १०. जो याचा शब्द तो मिथ्या (असत्य)–असा अन्वय. ११. असत्य. १२. वाणी. १३. बाहेरुन आणि आंतून. १४. खोटी. एक ब्रह्मच काय तें सत्य, बाकी त्याशिवाय सर्व असत्य–इत्यादि उपनिषद्वचनास अनुसरून हें वर्णन आहे. १५. या लोकींचें जें सत्य तें सर्व असत्य आहे यास्तव मी मृत्तिकाभक्षण केलें हें या लोकींचें जें म्हणणें तें मिथ्या आहे. १६. सृष्टींत. १७. माती खाऊन सुद्धां नाहीं असें म्हणतो–हें तर देखत खोटें दिसतें, परंतु याचाच खरेपणा दाखविण्यासाठीं सकलमृत्तिकामय चराचर विश्व कृष्णानें आपल्या तोंडांत यशोदेस दाखविलें.

हरीची असी वेदवाणी पुराणी[1] न जाणोनि, मानी मृषा नंदराणी. ।
अहो! विश्व जो दाखवी पांडवासीं[2] म्हणे त्यासि, 'साचा तरी तोंड वासीं.'[3] ॥ १३
'कीं मृत्तिका हे अवघीच, माते[4]! आधींच माझ्या उदरांत माते[5]. ।
ते भक्षिली कां म्हणसील मातें, नेणोनि ऐशा पुरुषोत्तमातें.' ॥ १४
असा आपुला शब्द तो देव साचा करूं पाहतो; त्या कथेच्या रसाचा. ।
पहा भाव तो मातृशब्दीं हरी तो असत्यत्व हे आवरूनी हरीतो. ॥ १५
एवं, पहातां अजि कोटि अब्दीं[6] नयेचि मिथ्यत्व मुकुंदशब्दीं; ।
तें आयका यावरि माय काय बोलों शके, दाखवि विश्वकाय[7]. ॥ १६
घटाकार आकार मातींत माती, असी मातसे सर्वही ज्यांत माती, ।
अशा विश्वरूपा, मुकुंदा उदारा दटावी धरूनी करीं गोपदारा! ॥ १७
म्हणे, 'पूससी ओष्ठ चाटूनि चाटा[8]! पुन्हा बोलसी धीट गोष्टी अचाटा[9]; ।
घडीही घरीं पाय तूझा न थांरे[10], न आटोपसी तूं मला सर्वथा रे! ॥ १८
पसरुनी मुख दाखविसी मला, तरि खरा मज वाटसि रे मुला!' ।
म्हणवुनी जननीवचनें हरी पसरुनी मुख संशय संहरी[11]. ॥ १९
वदनि जों अवलोकुनि पाहते, जननि विस्मित होउनि राहते; ।
स्थिरचरात्मक हें जग देखिलें; स्वसुत ईश्वर हें मनिं रेखिलें. ॥ २०
यशोदेसि हें तत्व दाऊनि देवें, पुन्हा घातला मोह त्या वासुदेवें; ।
कडे घेतला मागुती पुत्रभावें[12], यथापूर्व पाहे तयातें स्वभावें. ॥ २१
असीं कौतुकें शेषशायी[13] हरी तो करीतो, कथेनें अविद्या[14] हरीतो. ।
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला; कलींमाजि या तारिलें वामनाला. ॥ २२

---

१. जुनी. २. अर्जुनास. सकलविश्वरूपदर्शनप्रसंगीं कृष्णानें सकल विश्व आपल्या मुखांत त्वरेनें शिरत आहे असें अर्जुनास दाखविलें असें वर्णन आहे. (भगवद्गीता—अध्याय ११ श्लोक २५–३१ पहा.) ३. उघड, पसर. ४. हे आई. ५. मावते. ६. वर्षांत. ७. आपलें विश्वस्वरूप शरीर. ८. चावटा. ९. अद्भुत, विलक्षण. १०. स्थिर होई. ११. निरस्त करी; परिहार करी. १२. हा कृष्ण माझा मुलगा आहे अशा भावानें. (अध्याय ८ श्लोक ४५) १३. शेषावर शयन करणारा. १४. अज्ञान, माया.

## बालक्रीडा.[1] (प्रथम.)

(श्लोक.)

कडे घेउनी कृष्णनाथा उदारा, गृहद्वारदेशीं[2] उभी नंददारा; ।
मिळे बायकोमात्र[3] तेथें व्रजाची, जयां पुत्र तीचा अवो[4]! तीव्र जाची[5]. ॥ १
शिखी[6] जसा वेणुवनींच[7] पेटे, गाऱ्हाणियांचे उठती चपेटे[8]; ।
चित्तें मुकुंदीं अतिसानुरागा[9]; मुखीं मृषा[10] दाविति तीव्र रागा. ॥ २
वदनिं कोप मृषा जरि वांवरे[11], सरस हास्य तथापि न आवरे; ।
न लपणारचि अभ्रकपंजरीं[12], लपविली जसि दीपकमंजरी[13]. ॥ ३
वरी क्रोध, सप्रेम पोटांत नारी; अपांगें[14] अशा लक्षिती पूतनारी[15]; ।
यशोदेप्रती त्याचिया लोकलीला, अहो! वर्णिती नाशिती ज्या कलीला[16]. ॥ ४
‘कडे तूझिया दीसतो साधु हा गे!, मुते उंबरा आमुच्या, आणि हागे; ।
पडे नेणतां पाय, वो! त्याचि माजीं, करी हास्य तेव्हां मुलांच्या समाजीं. ५
बरें गोड तें सर्व चोरूनि खातो; कळे ठाव जो नाकळे आणिकां तो. ।
दधी दूध भक्षूनि, दे मर्कटांतें[17]; करूनी तयां तृप्त, फोडी घटांतें. ॥ ६
प्रकाश देहें करि कैटभारी[18], भारी तनूज्योति[19] तमीं[20] उभारी; ।
भा[21] रीघते जे गगनीं रवीची, वीचीप्रभा[22] सिंधुचिया छवीची[23]’. ॥ ७
देखोनि हें सांगति कृष्णमाते कीं, ‘दीप्ति त्याची न गृहांत माते. ।
प्रभा रवीहूनि तमांत दावी, ते गोष्टि याची किती हो! वदावी. ॥ ८
हातास याच्या न वंचाय[25] कांहीं, केलें असे ज्या गृहबायकांहीं; ।
त्यांच्या मुलां ताडण उग्र हातें करी, म्हणे, ‘जाळिन या गृहातें; ॥ ९

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवत-स्कंध १० अध्याय ८ यास अनुसरून रचिलेलें आहे. यांत कृष्णाच्या लहानपणच्या लीलांचें म्हणजे कौमारचापलाचें वर्णन आहे, म्हणून याला ‘बालक्रीडा’ असें नांव दिलें आहे. २. द्वारांत. ३. गोकुळांतील सर्व स्त्रिया. ४. अहो. ५. गांजी, गांजणूक करी. ६. अग्नि. (ज्याला शिखा आहे तो.) ७. कळकाच्या वनांत. ८. वेग. ९. ज्यांच्या मनांत कृष्णाविषयीं अत्यंत प्रेम अशा. बाहेरून मात्र राग दाखविणाऱ्या–असा भावार्थ. १०. खोटा. ११. पसरे. १२. अभ्रकाच्या पिंजऱ्यांत जशी दीपकमंजरी (दिव्याची ज्योत) लपत नाहीं तशी त्या स्त्रियांची सरसहास्ययुक्त मुखचर्या रागाखालीं लपली नाहीं, उघड झाली. १३. ज्योति. १४. नेत्रकटाक्षानें. १५. पूतनेचा अरि=कृष्ण. १६. पापाला, कलिधर्माला. १७. माकडांतें. (अध्याय ८ श्लोक २८–२९ पहा.) १८. कैटभ असुराचा अरि. (कृष्ण.) १९. शरीरकांति. २०. अंधकारांत. २१. कांति. अंधकारांत याची प्रभा (कांति) सूर्याप्रमाणें भासते. २२. लहरीची कांति. २३. कांतीची. २४. भासते. २५. जाय; ‘नवजाय’ असाही पाठ आढळतो.

वरीं ज्या न हातास कांहींच लागे, करी तो बहू जाच त्यांच्या मुलां गे ! ।
रितीं भाजनें फोडुनी, कांठमोरे गळां घालितो, आणि घेतो चिमोरे. ॥ १०

निद्रितांसि चरणीं तुडवीतो, लेंकुरें उठउनी रडवीतो, ।
थुंकुनी भरितसे वदनातें, 'आग लाविन' म्हणे 'सदनातें'. ॥ ११

'नाहींच केलें सदनांत कांहीं ज्या गेहिंच्या कश्मल बायकांहीं, ।
न बिंदु जेथें मज गोरसाचा, न गेह तें, दुर्गतिमार्ग साचा' ! ॥ १२

जो बैसतो राखत, वो ! गृहातें तो सोडितो वत्स समग्र हातें; ।
तों वासरें नावरती न गाई, परोपरी हा छळितो, अगाई ! ॥ १३

व्यग्र स्त्रिया करुनि सर्व पशूंसमाजीं;
चोरी असे करित त्या सदना चिमाजी; ।
एवंच राखतहि ज्या बसतो गृहातें,
त्या आंत गोरससडा करितो स्वहातें. ॥ १४

शिंकीं न पावे जरि हात याचा, करीतसे यत्न महा तयाचा; ।
पिढ्यांवरी टेउनि ऊखळातें, खातो; जपावें किति वो ! खळातें ?' ॥ १५

इत्यादि खोडी जरि बायकांहीं निरोपिल्या, त्यावरि माय कांहीं ।
न क्रोध दावी; मुख कृष्णजीचें पाहे सुखें, चित्त न उष्ण जीचें. ॥ १६

सभय नयन जों जों दाखवी लोकरीती,
विशद चरित गोपी त्याचि तों तों करीती; ।
स्वमुख जननि जेव्हां प्रेमसंयुक्त पाहे,
कडकडुनि वदे हा, मानुनीयां कृपा हे. ॥ १७

मातेसहीं बोलतसे हरी तो, तीचें, तयांचें मन जो हरीतो; ।
'माते !' म्हणे, 'हें लटिकेंचि सारें, या बायकांचीं वचनें असारें. ॥ १८

नाना कुचेष्टा मजसीं करीती, उरीं कठोरीं दृढ कुस्करीती; ।
देती बळें चाउनि दंश दांतें, सोसूं किती या प्रमदामदातें ? ॥ १९

अधर चाटुनियां प्रमदा पिती, तुज वदेन म्हणे, तरि दापिती; ।

---

१. भांडीं, मडकीं. २. ज्यांचे कांठ गेले तीं पात्रें. (श्लोक २९ पहा.) ३. चिमटे. ४. मलिन, घाणेरड्या. ५. ज्या घरांत देवांना कांहीं मिळत नाहीं तें घर दुर्गतीचें स्थान होय. ६. सोडलेलीं वांसरें बांधण्यास बायका गुंतल्या असतां. (श्लोक ३० पहा.) ७. पशूंच्या समाजांत. ८. चिमणा बाळ, लहान बाळ. ९. दह्यादुधाचा भूमीवर सेक करतो. १०. तापलेलें, कोपलेलें. (श्लोक ३१पहा.) ११. 'सुमुख' असाही पाठ आहे. १२. असत्य. १३. चावे, दंतव्रण. १४. मत्तस्त्रियांच्या मदातें, बायकांच्या दांडगेपणातें. १५. ओष्ठ. १६. धाक लावितात, दटावितात.

म्हणति सर्व वधूजन नीकेरें, तुजचि माखुं अरे! जननीकरें. ॥ २०
जाचिती धैमकटी मजला गे!, बाळ मी, रैंळि न हे मज लागे; ।
व्यर्थ यत्न करितीं सहसा जे मूल काय तरणीसह साजे? ॥ २१
गोष्टी वदों आणिक काय माये! असोत त्या एक मनीं न माये; ।
उँरोज जैसे रुतती मला, गे! न वज्र हीरी मणि, हेमँ लागे'. ॥ २२
आणीक बोले झणि पूतनारी, म्हणोनियां तैत्पदपूतनारी ।
फोफांटती, मोहुनि नंदराणी जिला हरीच्या चरितीं शिराणी. ॥ २३
कीं, 'बोल हे घेउनि नंदनाचे, तूं नाचसी, बापहि नंद नाचे. ।
परंतु लँबाड कराल याला ऐशा गुणाच्या मकैरालयाला. ॥ २४
लबाड आम्हांतहि हा असा, गे! कल्पूनि गोष्टी लटिक्याची सांगे,' ।
ऐसा धिठा या बहु बोलतां, हे वाचा नव्हे, कृत्रिमतालता हे. ॥ २५
'एवं'पदीं श्रीहरि बोलिला हें, टीका भले वाचिति त्यांसि लैहे; ।
प्रत्यक्ष माते प्रति जे वदेना, तयास 'एवं' 'प्रति' भाव देना. ॥ २६
'एवं'पदामाजि हि एवमर्थ, श्रोते विचारूत भले समर्थ. ।
कथा असी हे बहुतां पुराणीं, गातां सुधेची पुरवी शिराणी. ॥ २७

---

१. सर्व स्त्रीसमुदाय. २. जोरानें, आवेशानें, क्रोधाद्यावेशपूर्वक प्रवृत्तीनें. ३. दांडगी, बळकट. ४. वक्रोक्त्यादिकेंकरून जी थट्टा ती. ५. कुच. ६. मनोहर, हिऱ्याचा मन हरण करणारा मणि. ७. सोनें. ८. पूतनेचा शत्रु. (कृष्ण.) ९. त्याच्या चरणानें पवित्र झालेल्या गोपांगना. १०. श्वासोश्वास टाकिती. ११. कौतुक. १२. मुलाचे. १३. लबाड. १४. समुद्राला. हा गुणमकरालय म्हणजे गुणसागर जो कृष्ण त्याला तुम्ही आतांपासून लबाड कराल. १५. 'लबाड आम्हां तरी हा' असा अन्य पाठ आढळतो. १६. कृत्रिमपणाची वेल. १७.'एवं धाष्टर्यान्युशति कुरुते' इत्यादि तिसाव्या श्लोकास अनुलक्षून हें वर्णन आहे. १८. लाभेल, मिळेल. १९. अनेक 'पुराण' संज्ञक ग्रंथांत. पुराणें अठरा आणि उपपुराणें अठरा आहेत. या पुराणांचीं व उपपुराणांचीं नांवें येणेंप्रमाणें:—पुराणें—'ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् । आग्नेयमष्टकं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा । वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा ॥.' उपपुराणें—'अष्टान्युपपुराणानि मुनिभिः कथितानि तु । आद्यं सनत्कुमारोक्तं नारसिंहमतःपरम् । तृतीयं नारदं प्रोक्तं कुमारेण तु भाषितम् । चतुर्थं शिवधर्माख्यं साक्षान्नंदीशभाषितम् । दुर्वाससोक्तमाश्चर्यं नारदोक्तमतःपरम् । कापिलं मानवं चैव तथैवोशनसेरितम् । ब्रह्मांडं वारुणं चाथ कालिकाह्वयमेव च । माहेश्वरं तथा शांबं सौरं सर्वार्थसंचयम् । पराशरोक्तं प्रवरं तथा भागवतद्वयम् । इदमष्टादशं प्रोक्तं पुराणं कौर्मसंज्ञितम् । चतुर्धा संस्थितं पुण्यं संहितानां प्रभेदतः ॥.'

आतां यशोदेप्रति गोपी[1]जाया, पूर्वोक्तचेष्टाकृतदोष [2]जाया, ।
परोपरी वर्णिति कृष्णजीच्या लीला, स्मरे जें स्वमनास जीच्या. ॥ २८
एवं यशोदेप्रति गोपदारा, असत्यता लावुनि त्या [3]उदारा; ।
आणीक शब्द प्रभुमाधवाचे, मृषा म्हणोनी वदति स्ववाचे. ॥ २९
'आम्ही म्हणों यास विवाहकाळीं वधू पहावी तुजतुल्य काळी; ।
कीं गोपकन्यासम गौरे[4]वर्णी' तेव्हां म्हणे आयिक काय वर्णी. ॥ ३०
'सुंदरत्व [5]सुरमानवलोकीं जीचिया [6]लवकृपाअवलोकीं, ।
मी तिचें [7]सुखनिधान वरीते, नित्य नूतन मला नवरी ते. ॥ ३१
मी विरक्त, मजला नवरी ते; [8]दाटुनीच वरिते मजला ते; ।
राहते मजचिमाजि सदा ते, सेविती वरदही जिस [9]दाते. ॥ ३२
[10]ब्राह्मणें तुडविलें मज लातें, त्या स्थळांतहि भजे मजला ते; ।
[11]तेचिं ते मज गमे न [12]असोसी, काय या उपरि अन्य असोशी? ॥ ३३
हार दे मज उदार [13]मणीचा, [14]क्षीरनीरनिधि, [15]बा रमणीचा; ।
[16]नेदखें करिलसा [17]सरि याची ऐसिया सधन सासरियाची. ॥ ३४
शत्रुसारहि तसा सुरवाडी नित्य ज्यांत अशि सासुरवाडी; ।
द्वीप, चंदन, अशोक, विराजे; ज्यासि वर्णिति कवी, ऋषि, राजे.' ॥ ३५
'इत्यादि लाबाड असे असाच, हेही तसें मानिसि काय साच? ।
धुंडोनि खातो जनगोरसा, गे! आश्चर्य तेव्हां तरि थोर सांगे. ॥ ३६
वधुनि [18]असुर आणी वेद, धुंडूनि पाणी;
[19]प्रळयजलधिमध्यें मत्स्य मी चक्रपाणी. ।
दधि घृत लपवीती काय दे दीनवाणी,
म्हणउनि वदतो गे! काय हे सत्य वाणी? ॥ ३७
आणखी विविध दैत्य[20]कंचाटें सांगतो हळहळूच [21]अचाटें, ।

---

१. गोपिका. २. दोष जाण्यासाठीं, दोष परिहार करण्यासाठीं. ३. उदार कृष्णाला. ४. गौरवर्ण, गोऱ्या रंगाची. ५. देवलोकीं आणि मनुष्यलोकीं. ६. जिच्या (ज्या लक्ष्मीच्या) लेशकृपा. अवलोकनांत. ७. सुखाचा ठेवा, माहेरघर. ८. बळेंच. ९. उदार, दानशूर. १०. भृगूनें हृदयावर. ११. तीच लक्ष्मी. १२. उत्कंठा. १३.मोठ्या रत्नांचा हार जो मला देतो. १४.क्षीरसागर. १५. रमणीचा (स्त्रीचा) बाप.१६. दिसत नाहीं. १७. बरोबरी. या माझ्या श्रीमंत सासऱ्याची बरोबरी करील असा मला कोणी दिसत नाहीं. १८. हयग्रीव नामक असुर वेद हरण करण्यासाठीं ब्रह्मदेवाकडे गेला, तेव्हां विष्णूनें मत्स्यावतार धारण करून समुद्रांतून वेद धुंडून काढिले, या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. १९. प्रलयकाळच्या समुद्रांत. २०. युक्ती. २१. विलक्षण मर्यादातिरिक्त.

आपणाचवरि वर्तवितो गे ! सर्व बाष्कळचि वैर्त[2] [3]वितो, गे ! ॥ ३८
जसिच गोष्टि निघे, तसि लौकरी प्रगट एक नवीच कथा करी; ।
घुसळितां सदनीं दधि बायका, हळुचि 'गोष्टि' म्हणे 'तुम्हि आयका'. ॥ ३९
'आहो वधूजन !' म्हणे 'मथितां दधीतें, म्यां येरिती घुसळिलें [4]अमृतोदधीतें; ।
केली रवी[5], म्हणतसे, कनकाचळाची[6], दोरी[7] तयास फणिच्या मणि चंचळाची. ॥ ४०
निराधार चाले तळीं अद्रि[8] भारी, न त्या देवदैत्यांत कोणी उभारी[9]; ।
तईं होउनी कूर्म दुग्धांबुडोहीं[10], धरीं पाठिसी, त्यासि नेदीं बुडोंही. ॥ ४१
फिरविजे[11] रवि जेंवि वधूगणीं[12], अचळ[13] तो चळतो फणिंच्या[14] गुणीं; ।
तनुस ते नुसते सुख वर्षतां, विरमते, रमते, मन हर्षतां. ॥ ४२
लक्ष्मी निघाली मथितां समुद्रा, मानें न कोणांचिहि तीस मुद्रा[15], ।
निर्दोष, ईच्छीच[16] न आपणातें, वरीन त्यातें, करि या पणातें. ॥ ४३
ब्रह्मा वृद्ध, सकाम[17]; कामरिपु[18] तो रुद्र स्मशानीं वसे;
दैत्यत्रस्त[19] सुरेंद्र; इंद्रगुरुही[20] इंद्राभिमानी असे; ।
दुर्वासादि अशांत[21] शांत मजही जो कांत इच्छीच ना;
माला[22], हें कमला[23] विचारुनि, गळां अर्पी जगज्जीवना. ॥ ४४
इच्छीना मजला सुरासुर भला, ऐसा दिसेना मला,
आशेशीं रमला जिच्या[24] नर, तिला तो दाससा भासला; ।
श्रीवत्सादि मला शिवे, न शमला; ऐशा घनश्यामला
माला, हें कमला विचारुनि, गळां घाली जगन्मंगळा. ॥ ४५

---

१. खोटी. २. गोष्ट. ३. सांगतो. ४. तुम्ही दहीं असें घुसळितां तसेंच पूर्वीं मी क्षीरसमुद्रमंथन केलें. ५. मंथनदंड. ६. मंदरपर्वताची. ७. वासुकीसर्पाची दोरी. ८. पर्वत. ९. उचलूं शकेना. जेव्हां मंदरपर्वत समुद्रांत बुडूं लागला तेव्हां देव किंवा दैत्य यांतून कोणासच त्याला वर उचलण्याचें सामर्थ्य नव्हतें, तेव्हां मी कूर्मावतार घेऊन त्यास पाठीवर धरिलें आणि अशा उपायानें त्यास बुडूं दिलें नाहीं. १०. क्षीरसागरांत. ११. हें यमक नामक शब्दालंकाराचें उत्तम उदाहरण आहे. जीं अक्षरें ज्या क्रमानें एकापुढें एक अशीं एकवार येतात, तींच अक्षरें त्याच क्रमानें पुन: एकापुढें एक अशीं आलीं म्हणजे यमकालंकार होतो. या श्लोकाच्या पहिल्या चरणांत 'रविजे' हीं अक्षरें एकापुढें एक अशीं आलीं आहेत, दुसऱ्या चरणांत 'चळतो' याची आवृत्ति झाली आहे, तिसऱ्या चरणांत 'नुसते' आणि चवथ्यांत 'रमते' ह्यांची आवृत्ति झाली आहे, म्हणून येथें यमकालंकार झाला आहे. १२. स्त्रीसमुदायांनीं. १३. पर्वत. (मंदार.) १४. वासुकीच्या दोरीनें. १५. मुखाकृति. १६. जो निर्दोष आणि लक्ष्मीसंबंधानें निरिच्छ त्याला. १७. कामातुर. १८. मदनशत्रु, शिव. १९. दैत्यांनीं त्रस्त केलेला. २०. बृहस्पति. २१. रागीट, शीघ्रकोपी. २२. पुष्पमाला. २३. लक्ष्मी. २४. जिच्या (लक्ष्मीच्या) आशेस जो गुंतला तो त्या लक्ष्मीचा दास झाला—असें तात्पर्य.

काढीतसां तुम्हि जशा नवनीत सारा; ज्यां शोधिला अमृतरत्नकदंब[1] सारा; ।
लोणी मुलांस तुम्हि चारितसां [2]स्वधामीं, पाजी सुरां, [3]युवति होउनियां, [4]सुधा मी. ॥ ४६
सुधाकुंभ जो लाधला [5]देवजाती, हिरोनी बळें, दैत्य घेऊनि जाती; ।
तईं मोहिनी होउनी [6]अंगनाचे करीं भाव, नानापरी अंग नाचे. ॥ ४७
बळी त्यांत तो निर्बळांलागि [7]दीपी, म्हणे हें न दे आणिकांतें कदापी; ।
अकस्मात ते देखती सर्व मातें, [8]स्मरें मोहिले, पावले विभ्रमातें. ॥ ४८
मजचि पाहति, ते[9] न सुधा पिती; घटचि तो करिं आणुनि अर्पिती; ।
म्हणति पाजिशि वांटुनि तूं जशी, पिउं तसे, रुसुनि क्षण तूजसीं. ॥ ४९

सुर असुर तईं मी बैसवीं वेगळाले,
[10]सहजरिपु तरी ते [11]भाव त्यांचे गळाले; ।
सकळ मज पहाती, जाणती देवराजे,
असुर [12]युवतिवेषें मोहती जेंवि राजे. ॥ ५०

[13]सुधापात्र घेऊनि [14]रंभोरु हातें, त्वरें वाढितां मी, [15]सुखांभोरुहातें ।
[16]सुरारी पहातां, दिसे [17]चंचळांला स्तनश्री; हरी वायु [18]वस्त्रांचळाला. ॥ ५१
घे मी सुधाकलश [19]वामकरांबुजानें वाढावया, इतर पात्र धरीं [20]दुजानें, ।
तों कंचुकी सुटतसे, [21]वसनांचळाला वारा हरी, दिसत सुस्तन चंचळांला. ॥ ५२
सुकुच [22]कुंकुमचर्चित देखिलें, [23]मृगमदें अतिसुंदर रेखिलें, ।
असुर ते [24]स्मरविव्हल मी करीं, अमृत दे [25]त्रिदशांप्रति लौकरी. ॥ ५३

---

१. अमृतरत्नांचा समुदाय. २. आपल्या घरीं. ३. स्त्री होऊन. मोहिनीरूप धारण करून विष्णूनें दैत्यांस मोह पाडून देवांस अमृत दिलें आणि दैत्यांस मदिरा दिली, या पौराणिक कथेस अनुसरून हें वर्णन आहे. ४. अमृत. ५. देवांच्या जातीला, देवांला. ६. सुंदर स्त्रियेचे भाव करून. ७. दडपी, दडावी. ८. कामानें. ९. दैत्य. १०. ज्यांच्या वैरी होते तरी ते मोहिनीरूप पाहून वैरभाव विसरून गेले. ११. वैरभाव. १२. स्त्रीवेश. १३. अमृताचें भांडें. १४. रंभा+ऊरु=केळीसारख्या मांड्या जिच्या अशी स्त्री. 'ऊरूत्तरपदादौपम्ये' (पाणिनि ४–१–६९) या सूत्रानें औपम्यसूचक बहुव्रीहि समासाचें उत्तरपद 'ऊरु'शब्द असल्यास स्त्रीलिंगीं तो दीर्घ होतो, जसें कलभोरू, रंभोरू. १५. मुखकमळांतें. (अंभोरुह=पाण्यांत होणारें कमळ.) १६. दैत्य. १७. चंचलबुद्धि पुरुषांला, चैनी पुरुषांला, दुष्टमति जनांला. १८. वस्त्राच्या पदराला वायु हरण करी. (अंचल=वस्त्राचा लांबीकडील प्रांतभाग, पदर.) १९. वाम म्हणजे डाव्या, करांबुजानें म्हणजे करकमळानें. २०. दुसऱ्या उजव्या हातानें. २१. वारा वस्त्राचा पदर उडवी. २२. केंशराच्या उटीनें चर्चिलेलें. २३. कस्तूरीनें. मृगाचा मद. 'मद'शब्दाचा अर्थ कस्तूरी. 'मदो रेतसि कस्तूर्याम्' इति मेदिनी. २४. कामार्त. २५. देवांला.

म्हणति दाउनि [1]वक्रविधू [2]वधू अमृत सर्व न दे तमघूवधू; ।
तरि मनें रुतलीं [3]मुखसारसा, गमतसे न सुधारस [4]सारसा. ॥ ९४
असुर लंपट [5]वक्रसुधाकरीं; अमृत दे अमरांप्रति लौकरी; ।
म्हणुनि दे फळ [6]कल्पितरूप मी, विषम अर्थ न [7]कल्पतरूपमीं. ॥ ९५
अमृत अमर प्याले, तो न होतां विलंब;
प्रगट दिसति चाऱ्ही बाहु [8]आजानुलंब; ।
उरिं [9]उदधिसुता **श्री**, शोभती शंख चक्रें;
'हर! हर! हरि कीं हा,' बोलती [10]दैत्यचक्रें. ॥ ९६
करातें जोडूनी [11]विनितें [12]**विनतापुत्र** जवळी
उभा स्कंधीं त्याचा त्वरित चढतों [13]व्योम कवळी; ।
शिरीं दापी दैत्या पद **गरुड**; तैसाचि [14]अमरीं
पुन्हा ध्यातां आलों, असुर वधिले फार [15]समरीं. ॥ ९७
उभा पक्षीस्कंधीं चरणतल [16]राजीवोत्पलदलीं;
[17]दळीं ऐसे पाडीं सुररिपु, जसा वायु [18]कदळी, ।
दळी धान्यें जांतें, [19]दळिं तशि शिरें म्यां [20]भरडिलीं,
[21]स्वचक्रें, तीं [22]चक्रें पळत [23]मृतनाथास रडलीं. ॥ ९८
बहू भांडला दैत्य जो [24]**कालनेमी**, **यमाच्या** गृहा, होउनी काळ, ने मी; ।
तई जो रणीं दानवाध्यक्ष मेला, स्वयें **कंस** तो भार झाला [25]क्षमेला. ॥ ९९
[26]सुगंधेवरी पापदुर्गंध राहे, रडे गाय होऊनि तेव्हां [27]धरा हे; ।

---

१. मुखचंद्राला. २. स्त्री आपला मुखचंद्र दाखवून. ३. मुखकमला. ४. सारखा, समान. ५. मुखचंद्राचे ठायीं. सुधाकर=चंद्र. (सुधा=अमृत आहे करांत=किरणांत ज्याच्या तो चंद्र). ६. कल्पित आहे रूप ज्याचें असा मी. ७. कल्पवृक्षाची उपमा ज्यास. ८. गुडघ्याला लागणारे असे लांब बाहु. ९. समुद्रकन्या ज्याच्या उरावर. १०. दैत्यांचे समुदाय. ११. विनीत, विनयसंपन्न, नम्र. १२. गरुड. विनता ही कश्यपाच्या तेरा स्त्रियांपैकीं एक. हिला अरुण, गरुड, अरुणि, आणि वारुणि असे प्रख्यात चार पुत्र होते. १३. आकाश. १४. देवांनीं ध्यान केल्याबरोबर पुनः आलों. १५. युद्धांत. १६. कमलपत्रीं. १७. सैन्यांत. १८. वारा जसा केळी पाडतो तसा. १९. सैन्यांत २०. चूर्ण केलीं. २१. मी आपल्या चक्रानें त्याचीं शिरें ठेंचून टाकलीं. २२. दैत्यसमुदाय. २३. यम. २४. शंभर मुखांचा एक दैत्य, याला विष्णूनें मारिलें. २५. पृथ्वीला. २६. पृथ्वीवर. २७. पृथ्वी.

विधि[1] प्रार्थितां, **यादवीं** जन्मलों कीं करूं **कंस**विध्वंसही मृत्युलोकीं. ॥ ६०
भूभार धाता[2] मजला निवेदी, **कृष्णा**वतारार्थ म्हणूनि वेदीं; ।
**कंसा**चिया त्याचि पुन्हा वधा मी तनू धरीं हे **वसुदेव**धामीं[3].' ॥ ६१
इत्यादि लाब्राड वदे जसाच, हेंही तसें मानिसि काय सांच[4]? ।
गोपीस हा जों परिहास[5] वाटे, तों वैखरी[6] जाय खऱ्याच वाटे. ॥ ६२
दावी अहो! नवल आदिवराह[7]; ठेवी, दाढेसि काष्ट, वरि वेष्टुनि वस्त्र ठेवी; ।
रांगोनि दाखवि मुसंडिहि[8] सूकराची, मोठी अगे! चपळता गुडघेकरांची. ॥ ६३
'बाहोल्याचें[9] फोडितो पोट हा, गे!; अंकीं तेव्हां लेंकरूंमात्र हागे, ।
आक्रंदोनी जाति बाळें पळूनी; बाई! आम्हां त्रास वाटे कळूनी. ॥ ६४
गुढघियावरि[10] होय उभा, सये[11]! नवल[12], केवळ **वामन** भास ये. ।
कपट चंचल चालत बोलतो, रडतियांसहि[13] हांसवि बोल तो. ॥ ६५
गळां[14] सूत, नेसूनि आंगोस्तरातें[15], म्हणे, 'मारिलें क्षत्रियां दुस्तरांतें; ।
कुठारेंचि[16] या छेदिलें कटकांतें[17],' म्हणे घेउनी, गे! करीं काटकातें[18]. ॥ ६६
धनु करुनि चुंईचें[19] चांगलें ठांण[20] मांडी;
पुढिल सरळ जंघा, वांकुडी वाम[21] मांडी; ।
श्रवणवरि[22] करातें ने, भंवास्त्रास[23] भंगी,
घडिभरि मुरली[24] घे ठाण मांडी त्रिभंगी[25]. ॥ ६७
घेतों भरूनि **यमुनें**तुनि कुंभ पाणी, तों ये, वदे हळुचि गोष्टि, धरूनि पाणी[26]; ।
कीं, 'घागरी उचलिल्या उदकीं वधूनीं; मी उद्धरीं क्षिति तसी असुरां वधूनी.' ॥

---

१. ब्रह्मा. २. ब्रह्मा मजला भूभार निवेदी, दैत्यांचा भूमीला भार झाला असें सांगे. ३. घरांत. ४. खरें. ५. थट्टा. ६. वाणी. ७. वराहावतारांतील कृति सोंगानें दाखवी. ८. वराहाची मुसंडी. ९. नृसिंहावतारांतील कृति दाखविण्यासाठीं बाहुलीचें पोट फोडून हिरण्यकशिपूचीं आंतडीं काढतों असें सोंग आणी. १०. वामनावताराची क्रीडा दाखविण्यासाठीं गुडघ्यांवर उभा राहून वामन (खुजा) होतो. ११. सखे. १२. हा केवळ वामनच होय असा भास होई हें नवल. १३. ज्याचा बोल (बोलणें, भाषण) रडतियांसही (रडणाऱ्यांसही) हांसवितो. १४. सुताचें जानवें गळ्यांत घालून परशुरामावताराची लीला दाखवी. १५. आंगवस्त्रातें. १६. कुऱ्हाडीनें. १७. कांट्यासारखे जे क्षत्रिय त्यांस. १८. आपल्या हातांत काटक (काटूक=लहानसें लांकूड) घेऊन म्हणे इत्यादि. १९. पत्रावळी करण्याच्या उपयोगी बरू इत्यादि चिरून बारीक केलेली काडी. २०. शरीराची एक प्रकारची ठेवण. तीर मारतेसमयीं बसण्याचा एक प्रकार. २१. डावी. २२. कानापर्यंत हात नेऊन. २३. शिवधनुष्याला. २४. मुरली घेऊन कृष्णावताराची लीला दाखवी. २५. तीन ठिकाणीं अंगभंग (आंग वांकडें) करून मुरली वाजवितो. २६. हात.

फळ चिरूं जरि वाळुक, कांकडी, नृहरिआकृति दाखवि रोकडी; ।
म्हणतसे, 'अशि काढुनि आंतडी, असुर[1] म्यां वधिला ऐतितांतडी[2].' ॥ ६९

पतिचरण धुतां गे! सत्कथा वामनाची[3]
कथुनि हरित तेव्हां वृत्ति[4], बाई! मनाची; ।
स्वपद म्हणतसे कीं धूय धाता[5] असाची
धरिसि जवळ माथा तें म्हणे गोष्टि साची. ॥ ७०

जो तातआज्ञेंत[6] न पुत्र वागे हा त्याचिया जाचितसे जिवा गे! ।
मी तातशब्दें[7] निज माय[8] मारीं, ऐसें करी शासन त्या कुमारीं. ॥ ७१

गेलों[9] वना करुनि गोष्टि खरी पित्याची जो [10]स्त्रीस वश्यहि सकाम तथापि त्याची; ।
आणि व्रजांतहि म्हणे मजलागिं तातें[11] संस्थापिलें स्ववचनासहि सुव्रतातें. ॥ ७२

हा विष्णु सर्वैक्यपणें तसाच, पिता तरी नंदचि यास साच; ।
एवं मृषा सर्व विवर्त वीतो आईक[12] जें होईक[13] वर्तवी तो. ॥ ७३

ज्यांच्या घरीं चौर्य करीं न लागे हा त्यांचिया जाचितसे मुलां गे! ।
करूनियां बौद्ध[14] शिरोरुहातें[15] लुंची[16] म्हणे आपुलियाचि हातें. ॥ ७४

उपडितां निज केशहि जो रडे करवि दावुनि लोचन[17] कोरडे; ।
बहुत दु:ख मनीं जरि कालवे[18], भिउनि यास तयांस न बोलवे. ॥ ७५

म्हणे मला नेदिति गोरसा[19] जे हा धर्म त्यांचाचि मुलांस साजे; ।
लुंचूनि हे केश सुखाभिमानी चाऊनियां दांत मताभिमानी. ॥ ७६

करूनी अहो अश्व काठीकुमारा[20] करी फोंकें घेऊनियां त्या कुमारा[21]; ।

---

१. हिरण्यकशिपु. २. अत्यंत खरेनें. ३. वामनानें बळीपासून त्रिपाद भूमिदान घेतलें इत्यादि कथा. ४. मनाची वृत्ति हरित=मन हरण करी. ५. ब्रह्मा. ६. बापाच्या वचनांत. येथें संधि कर्तव्य असून केला नाहीं. ७. परशुरामानें बापाच्या आज्ञेनें आपल्या मातेचा (रेणुकेचा) वध केला, या पौराणिक कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. ८. रेणुका घराबाहेर स्नानास गेली असतां मार्तिकावतक देशाचा राजा स्वस्त्रीजनांसह जळक्रीडा करीत होता, ती क्रीडा पाहत राहिल्यामुळें तिला आश्रमीं येण्यास विलंब लागला, त्यावरून जमदग्नीनें तिला मारावें अशी पुत्रांस आज्ञा केली. ९. रामावतारीं दशरथाचें वचन सत्य केलें. १०. जो दशरथ कामुक आणि स्त्रीलंपट होता तरी त्याची आज्ञा मान्य केली. ११. वसुदेवानें. १२. ऐकीव. १३. होणारें. १४. नास्तिक. १५. केशातें. (डोक्यावर होणारे-केंस.) १६. उपटा. १७. आपण रडून दाखवी, परंतु डोळे मात्र कोरडे असत. १८. दु:खानें मन जरी घाबरें होई. कालवे=घाबरें होई. प्राण, जीव कालविणें=घाबरा होणें. १९. दुभतें, दहीं दूध लोणी ताक इत्यादि. २०. वृक्षाच्या शाखेचा भाग, सरळ गेलेला फांदीचा तुकडा. २१. वाईट मार.

दिसे तो करीं खड्ग जाणो सुपाणी म्हणे म्लेंछ हे [1]कल्कि मी [2]खड्गपाणी. ॥ ७७
न गृहिं ज्या मज गोरस सांपडे त्वरित नास्तिक बौद्ध ठसा पडे; ।
म्हणुनि होउनि कल्कि तयां वधी मग म्हणे वरवी धरि [3]भावधी. ॥ ७८
ज्याच्या घरीं गोरस हा न [4]लाहे त्याच्या करी जाच्र असे मुलां हे; ।
मेलेच्छ जाणों पडती कुमार दे अश्व लोटूनि तुझा कुमार. ॥ ७९
जें जें करी तें [5]शिशुवृंद सोसी पुन्हा धरी याचिच गे ! [6]असोशी; ।
स्थळींस्थळीं पाहुनि त्यां मुलां गे! मध्यें [7]हयारूढ फिरोंच लागे. ॥ ८०
मग म्हणे जरि [8]इंद्रियगोरसें जन न तृप्त करी मज वो ! रसें ।
वधिन होउनि कल्कि तयां [9]असा श्रवणकीर्तनिं याकरितां [10]असा. ॥ ८१
सर्वा तयांत जरि एक असेल साच, हा शब्द होउनि असत्यहि हो तसाच; ।
हें ही असो, परि अहो ! तुज नंदराणी नाहींत काय [11]विदितें कुळजे [12]वैराणी ! ॥ ८२
अहो यशोदे ! तुज सर्व ठाव्या गोष्टी तरी काय अशा उठाव्या ? ।
रंगाविणेंही दिसतो ठसासा, भीतो झणी आइकतील [13]सौसा. ॥ ८३
तूं काय हे आइकसील वाणी ? एथें असत्यास नसेच [14]वाणी, ।
सर्वज्ञ हो नंद तथापि त्यासी ऐसेंचि हा बोलतसे पित्यासीं. ॥ ८४
[15]स्रष्टा जनाचा [16]स्वपितामहाचा तया [17]चतुर्वक्रपितामहाचा; ।
मी बाप आई म्हणतों पित्यासीं लबाड वाटे न तथापि त्यासी. ॥ ८५
मी मायही बाप चतुर्मुखाचा, हा शब्द याच्याचि असे मुखाचा; ।
नाभींत गे ! [18]पंकज जाणवीतो, जाणो तया हाच [19]सुजाण [20]वीतो. ॥ ८६
न बोले अगे ! तूजसी काय वाणी ? न गोष्टींत याच्या असत्यास [21]वाणी, ।
[22]सहस्राननीं आपुली शेजे[23] हा गे ! वदे आणि बाळां तयांमाजि हागे. ॥ ८७
म्हणे तूज जे [24]श्री तिचा [25]दादुला मी, उरीं वाहतों कौस्तुभाचा [26]ललामी; ।

---

१. दशावतारांतील दहावा अवतार. २. खड्ग (तरवार) आहे पाणिस्थानीं हातांच्या (ठिकाणीं) ज्याच्या तो. मी खड्ग धरणारा कल्की असें म्हणे. ३. भावबुद्धि. ४. मिळे. ५. मुलांचा समूह. ६. आशा, थोर इच्छा. ७. हय (अश्व) आरूढ (बसलेला) घोड्यावर बसून. ८. इंद्रियरूप गोरसानें. ९. याप्रमाणें. १०. रहा, यास्तव पुराणश्रवण आणि भगवन्नामकीर्तन याठिकाणीं रहा. ११. ठाऊक. १२. हे सत्कुलोत्पन्न गृहिणि. १३. [illegible]. १४. कमताई, तोटा, उणेपणा. १५. उत्पन्नकर्ता. १६. आपल्या आजोबाचा (पितामहाचा)ही उत्पन्नकर्ता, तसाच ब्रह्मदेवाचाही उत्पन्नकर्ता. १७. ब्रह्म्याचा. (ज्यास चार तोंडें आहेत तो.) १८. कमल. १९. सुज्ञ, शाहणा. २०. प्रसवतो, जन्म देतो. २१. उणेपण. २२. शेष. (सहस्र=हजार आहेत आननें=मुखें ज्यास तो.) २३. शय्या, आंथरुण. २४. लक्ष्मी. २५. पति. २६. भूषण, अलंकार.

कसी ते न भांडे स्तनीं कुस्करीतो; जयीं आणि यांसीं कुचेष्टा करीतो. ॥ ८८

अगाई जांवाई अमृतजलधीचा[1] म्हणवितो,
वितो विश्वातें[2] तो स्वसुत विधि हेंही[3] मिरवितो; ।
असाही गौळें हीं लपविति दुधातें तदपि तो
पितो चौर्यें राजा म्हणवुनि तृणातें खुरपितो[4]. ॥ ८९

दुग्धाब्धि[5] ज्याचा ससरा[6] सखा तो चोरूनियां गोरसघांस खातो; ।
ज्याचे उरीं नित्य पहा रमा[7] तो गोपीउरीं सद्रुप[8] हार मातो[9]. ॥ ९०

देखोनि भी[10] रांजण पूर्णपाणी[11] तो मत्स्य एकार्णवीं[12] चक्रपाणी, ।
जो थापटूं दे न बळें असा गे! पाठीं धरी मंदरें[13] आणि सांगे, ॥ ९१

स्वचेंडू न घे आंत वाळूनि पाणी[14], म्हणे रांजणांमाजि या फार पाणी[15]; ।
असा भ्याड एकार्णवा माजि भारी, म्हणे उद्धरीं भूमि हा कैटभारी[16]. ॥ ९२

नख दुखे[17] निज आंगडिचा कसा न सुटतो तुज ठाउक तो कसा? ।
करुहें[18] असुरास चिरीतसे सकळ शब्द अवो! वरतो असे. ॥ ९३

ब्रह्मांड भेदित असें म्हणतो स्वपायें[19], शिंका दहीं घृत तया करितो उपायें; ।
निःक्षत्रिया क्षिति[20] करी फरशें करूनीं[21] तो हा कुऱ्हाड उचलूं न शके धरूनी.॥ ९४

स्वयंवरीं[22] त्र्यंबकचाप[23] हातीं रंगातें[24] भंगी, नृपती पहाती; ।
तो हा न मोडी[25] मृदु इक्षुदंडा[26] या कल्पना जाणतसे उदंडा[27]. ॥ ९५

भिउनि किंकर किंकर किंकरा करि पिता वरदान भयंकरा; ।
धरुनि वासहि जो जग आक्रमी बधिल त्यासि असाचि पराक्रमी. ॥ ९६

---

१. क्षीरसमुद्राचा. २. प्रसवतो. ३. ब्रह्मदेव माझा पुत्र अशी प्रतिष्ठा मारतो. ४. आपणास राजा असें म्हणवितो, परंतु खरें पाहिलें तर गवत खुरपीत असतो, त्याचें सर्व भाषण मिथ्या होय—असें तात्पर्य. ५. दुग्ध+अब्धि=दुधाचा समुद्र. ६. सासरा, श्वसुर. याचा सासरा दुधाचा सागर असूनही हा स्वतः गोरस चोरून खातो, तेव्हां हा सर्व मिथ्या भाषण करतो—असा भाव. ७. लक्ष्मी. ८. योग्य. ९. मावतो. १०. भय पावतो. ११. पाण्यानें भरलेला. १२. समुद्रांत. १३. मंदर पर्वत. १४. हात. १५. उदक. १६. कैटभ दैत्याचा अरि (शत्रु). विष्णु. १७. आंगड्याचा कसा सोडतांना माझ्या हातांचीं नखें दुखतात असें म्हणतो आणि त्याच नखांनीं असुरांचें विदारण करतो. १८. नखानें. १९. ब्रह्मांडाचा भेद आपल्या चरणानें करीन असें म्हणतो आणि तोच शिंक्यावरील दहीं दूध घेण्यासाठीं अनेक उपाय योजितो. २०. पृथ्वी. २१. कुऱ्हाडीनें. २२. सीतास्वयंवरप्रसंगीं. २३. शिवधनुष्य. २४. विवाहमंडपांत, सभेंत. २५. जो इक्षुदंड मोडण्यास असमर्थ तो भवसागरासन मीं मोडिलें असें म्हणतो. २६. ऊस. २७. पुष्कळ.

चरणचवडियां तेंवी करांच्या तळांतें,
चुकउनि सैकळांगें[1] लावुनी भूतळांतें, ।
उडत उडत चाले पाळथा जेंवि मीसा[2],
खद खद खद हांसे हांसतां ये उमासा[3]. ॥ ९७
वरि गिरि फिरतां जो लोचनीं[4] भाव दावी,
किति म्हणउनि बाई! कूर्मता[5] ते वदावी! ।
बुबुळयुगुळ[6] चाळी, झोंप डोळ्यांत भावी[7],
करि नवल चरित्रें मागिलीं आणि भावी[8]. ॥ ९८
बाळंतिणीपुढिल घेउनि बाळकातें मानेतळीं हळुच घालुनियां करातें, ।
मीं गोकुळासि वसुदेव अधोक्षजा या ठेवूनि आणिन 'वित्ते[9] जिस नंदजाया. ॥९९
पैसरवि[10] बहु वस्त्रें कीं नदी भानुजा[11] ते,
बुडवुनि हि तटातें जे म्हणे तीव्र जाते, ।
ढकलुनि पटें[12] पायें यांत लाहानसा गे!
मज असि यमुनेनें दीधली वाट सांगे. ॥ १००
दावी जसीं हीं लटकींच ठाणें, तैसींच आम्हांवरिही उठाणें[13] ।
न वत्स चारी अझुनी न गाई, लबाड हा तोचि असा अगाई? ॥ १०१
माया मृषा सर्वहि भावलीला, हा अर्थ गोपीवचनावलीला[14]; ।
दे कृष्ण आत्मा प्रिय वामनाचा, प्रकाश जो नित्य नवा मनाचा. ॥ १०२

---

## बाळक्रीडा[15]. (द्वितीय.)

(सवैवृत्त.)

एक दिनीं व्रजगोपनितंबिनि[16] बोलति श्रीहरिच्या जननीतें[17],
'कृष्ण घडीभर दे सदनाप्रति नेउनि खेळउं यासि सुचित्तें'. ।

---

१. सर्व अंगें चुकवून. २. मत्स्यावतारांतील लीलेचें सोंग दाखवितो. ३. उमाळा, दम. ४. डोळ्यांत. ५. कूर्मांची कृति. ६. जोडी. ७. दाखवी. ८. पुढचीं, होणारीं. ९. जन्म देते. वसुदेवानें मथूरेहून बालपणीं आपणास कसें आणिलें याचें अनुकरण करून दाखवितो. १० वस्त्रें पसरून ही यमुना नदी आहे, हिचें पाणी तटावरून जोरानें चाललें आहे असें म्हणतो. ११. सूर्यकन्या. (यमुना.) १२. वस्त्र. १३. रागानें आम्हांवर चालून जाण्यासाठीं उठणें. १४. गोपींच्या वचनमालेला. १५. हें प्रकरण श्रीमद्भागवत–स्कंध १० अध्याय ८ याच्या अनुरोधानें रचिलेलें आहे. १६. गोकुळांतील स्त्रिया. १७. यशोदेस.

'जाय' म्हणे व्रजपाळवधू निज बाळक जाणुनियां, भगवंतें
'मीं नैवजाय कदापि' म्हणूनि हि लोळणि घेतलि तेथ अनंतें. ॥ १
लोळणि घेतलि देखुनि विस्मय मानुनि बोलिलि माय यशोदा,
'बा! नवजाय म्हणोनि तुं काय निमित्त असें वदतोसि मुकुंदा?' ।
कृष्ण म्हणे, 'प्रमदा मज नेउनि आंवळिती हृदयीं मैदमंदा
तीक्ष्ण कुचाग्र मला रुतती परि त्यांसि नसे मजवांचुनि धंदा. ॥ २
शून्य घरीं मज नेउनि कोंडिति, खेळण मांडिति गोपिका शौरी
फेडुनि लुगडिं, घालिति फुगडि, ऊघडिं कामगृहें अतिगोरीं ।
दाखविती म्हणऊनि करीं भयें लोचन झांकुनि दृष्टि मि चोरीं
गूदगुल्या करिती मजला मग, दुष्ट अशा मज गोवेळपोरी. ॥ ३
खेळति शून्य बिऱ्हाडिं वऱ्हाड करूनि मला नवरा अति आर्तें,
नीजति गौरिहराजवळी परि नीजविती स्वतनूवरि मातें. ।
तेण मुली मज पाडुनियां मुलि हालविती बुलि ही निज हातें
फुगलि ते कशि ऊगलि राहिल फुंकिलि आणि जशी मुखवातें.' ॥ ४
गोपनितंबिनि लागिं विटंबुनि सांगे विटंबुनियां जननीतें
गोपि विरामति आयकितां जसि पावकिं वीघरती नवनीतें. ।
येकि दटाविति तर्जनि नासिकिं ठेउनि ओंठहि चावुनि दातें,
आणिक काय म्हणेल म्हणूनि कितेक भयें मुख झांकिति हातें. ॥ ५
मंजुळ आणि सुमंगळ केवळ आयकुनी निज बाळकवाणी
'पौतेजतां तुम्हि बाळ म्हणूनि तयांसि वदे व्रजपाळकराणी ।
लेंकरुं जाणुनि खेळवितां परि तूमचिं हीं बहु थोर गऱ्हाणीं.
हास्य म्हणे हरि हांसत चाड हा याचि तुम्हांसहि काय शिरोणी?'॥६
याहुनि ही हरि नित्य परोपरि भूलवि अंतरिं त्या व्रजनारी
एक त्रुटी जरि देखति हो! तरि कोटि युगांहुनि मानिति भारी. ।
कामीनिचा मुखपद्म वधू व्रजगोपनितंबिनिचा सुखकारी
कृष्ण मुकुंद रमाधरणीप्रिय वामनमानसहंस मुरारी. ॥ ७

---

१. न जाईन. २. स्त्रिया. ३. मदोन्मत्त. ४. स्तनाग्र. ५. गवळ्यांच्या मुली. ६. लग्न. ७. आवडीनें. ८. आपल्या शरीरावर. ९. अग्नींत. १०. विरघळणें. ११. लोणी. १२. सिग्गमणें. १३. यशोदा. १४. कौतुक, आवड. १५. अत्यल्प काळ.

## गोरसहरण.[1]

(श्लोक.)

श्रीविघ्नराज[2] विधिजा[3] पद सद्गुरूचें, वंदीन; यांविण मनीं सहसा न रूचे. ।
नानावतार धरि एक अनेक जाला, मी सर्वदा शरण दीन तया अजाला[4]. ॥ १
जो ब्रह्मरूप अवतार बहू धरीतो, नानारुपें[5] स्वजन सेवक उद्धरी तो, ।
भूभारवारण दशांतिल[6] आठवा हो, नंदालयीं[7] प्रगट तो हरि आठवा[8] हो ! ॥ २
व्रजसुतांसह गोकुळपाळ[9] तो, निजसुखें विविधांपरि[10] खेळतो, ।
ठकुनि[11] गोपवधू रस घेतसे, चपळ तो मन चोरुनि नेतसे. ॥ ३
वर्यें वेदें[12] वर्षांचिया बाळकाची, कसी कीर्ति ? ऐका जगत्पाळकाची; ।
सवें सौंगडे[13] ते बरे शीकवीले[14], सदां माधवें गोरसा सोंकवीले. ॥ ४
जे सोंकले गोपकिशोर[15] सौंची[16] ते आणिती पाळत[17] गोरसाची; ।
गेली असे गौळणि ते जळाला, तों येति गोपाळ तया स्थळाला. ॥ ५
संपूर्ण भाग्योदय[18] होय जीचा, तीच्या घरा ये सुत नंदजीचा; ।
जो चिंतनें सर्व भया हरीतो, ऐका पुढें काय करी हरी तो. ॥ ६
लोटूनियां गेहकपाट[19] हातें पाहे पुढें ऊंर्ध्वे[20] तया गृहातें, ।
सिक्यावरी पात्र दिसे पयाचें[21] आरंभिलें सौधन[22] हो ! तयाचें. ॥ ७
दूरस्थ तो यत्नहि सूचवीतो पाटावरी पाट हरी रचीतो. ।
त्याहीवरी स्थापुनि गोपजांला[23] त्याच्या गळां आपण रूढ जाला. ॥ ८
पात्रा पयाच्या करिं सोहरीनें पाडूनियां छेद तया हरीनें, ।
घटाघटी वाजति ते धरूनी आच्छादिलें अंबर सांवरूनी. ॥ ९

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवत–स्कंध १० अध्याय ८ यांतील कथाभागाच्या आधारें रचिलेलें आहे. यांत श्रीकृष्णानें अनेक प्रसंगीं गोरस (दहीं, दूध, लोणी, ताक इत्यादि) चोरून खाण्यासाठीं जे उपाय योजिले त्यांचें वर्णन आहे. २. गणेश. ३. सरस्वती. ४. जन्मरहित विष्णुला. ५. वृत्तसुखार्थ येथें 'रु' ऱ्हस्व केला आहे. ६. भूमीचा भार नाहींसा करण्यासाठीं जे दहा अवतार घेतले, त्यांतील हा आठवा अवतार. ७. नंदाच्या घरीं. ८. स्मरा, स्मरण करा. ९. गोकुळाचा स्वामी. १०. परोपरीनें, नानातऱ्हेनें. ११. ठकवून. १२. चार वर्षांचे वयाचा. वेद चार आहेत म्हणून लक्षणेनें चार असा अर्थ येथें घेतला आहे. १३. सोबती. १४. नाद लावून दिला, गोडी लावून दिली, सवकविले, चट लावून दिली. १५. गोपबालक. १६. खरी. १७. पाळथ, गुप्तबातमी, गुप्तरूपें कोणत्याही गोष्टीचें परिज्ञान करून घेणें. १८. उत्कर्ष. १९. घराचें दार. २०. वर डोळे करून. २१. दुधाचें. २२. मिळविण्याचा उपाय. २३ गोपबाळकांला पाटांच्या राशीवर उभे करून त्यांच्या मानेवर आपण उभा राहून शिक्यावरील गोरस चोरून खातो.

श्रवणिंचे[1] श्रवणीं नग[2] हालती, गळति गुंफिलिया शिरिं मालती[3]; ।
घुसळितां कुचकुंभहि कांपती अमृत[4] ज्यांतिल घे कमळापती[5]. ॥ ६
फिरविते रवितें[6] दधिभीतरी[7], मिरविते[8] रवितेज नगांबरी[9]. ।
स्वकरिं[10] ते करि चंचलता, मनीं[11] उपरमे[12] परमेश्वरगायनीं[13]. ॥ ७
बाइ ! म्यां उगवतांच[14] रवीला[15], दाट घालुनि दहीं चरवीला[16], ।
त्यांत गे ! फिरवितांच रवीला[17] सार[18] काढुनि हरी चरवीला[19]. ॥ ८
मथी[20] पुत्रभावें असी गायमाय[21] स्तनीं प्रेमपान्हा[22] तिच्या काय माय[23] ? ।
अशामाजि ये सर्वसंसारसाक्षी[24] असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी[25]. ॥ ९
फुटे प्रेमपान्हा, भिजे आंत चोळी, हरीहानि[26] मानूनि ते हात चोळी; ।
धरी भक्तिनें अर्पिल्याची स्पृहा[27] हा म्हणोनी म्हणे, 'व्यर्थ जातें अहाहा !' १०
न घेववे व्यापकचित्स्वरूपें[28], न घेववे तो रसें[29] साक्षिरूपें[30]; ।
पुत्रत्वरूपासि जयासि दावी, ते भोक्तृता[31] त्याचि मुखें वदावी. ॥ ११

---

१. कानांतील. २. अलंकार. ३. मालतीचीं पुष्पें. ४. दुग्धरूप अमृत. ५. कमळेचा (लक्ष्मीचा) पति. श्लोक ५ आणि ६ हीं स्वभावोक्ति नामक अलंकाराचीं उदाहरणें आहेत, कारण यशोदा दधिमंथन करूं लागली असतां साधारणतः स्त्रियांची त्याप्रसंगीं जी अवस्था दृष्टीस पडते तिचें हुबेहुब वर्णन या पद्यांत केलें आहे. तसेंच यांत शब्दांची आणि अर्थाची चमत्कारिक योजना केली असल्यामुळें हीं उभयचित्रसंज्ञककाव्याचीं उदाहरणें होत. चित्रकाव्याचे शब्दचित्र, अर्थचित्र, आणि उभयचित्र असे तीन प्रकार आहेत. ज्यांत शब्द आणि अर्थ या दोन्हींची रचना चमत्कारिक असते त्यास उभयचित्र काव्य असें म्हणतात. या श्लोकांत प्रासयमकांचाही उत्कृष्ट मासला आहे. ६. मंथनदंडातें. ७. दह्यांमध्यें. ८. जिच्या अलंकारांवर सूर्याचें तेज मिरवत आहे. ९. अलंकारावर. १०. हात चंचल (हालत) आहेत. ११. मनांत विश्रांति पावे (उपरमे). १२. स्थिरावे. १३. परमेश्वराच्या स्तवनांत, स्तोत्रपठनांत विराम पावते. या श्लोकांत शब्दरचना फार चमत्कारिक आहे म्हणून हें शब्दचित्रसंज्ञक काव्याचें उदाहरण होय. काव्याच्या ध्वनि (उत्तम), गुणीभूतव्यंग (मध्यम) आणि अव्यंग (कनिष्ठ, चित्रकाव्य) या तीन प्रकारांपैकीं हा कनिष्ठ होय. १४. सूर्योदयाबरोबर. १५. सूर्यास. १६. दधिमंथनपात्रांत, मंथनाच्या डेऱ्यांत. १७. मंथनकाठीस. १८. नवनीत. १९. चारिला, खाऊं घातलें. २०. वश होई. २१. मातारूपी गाय. २२. प्रिय पुत्रादिकांच्या दर्शनादि संबंधानें जो पान्हा येतो तो. २३. मावे. २४. संसारांतील सकळ घडामोड प्रत्यक्ष पाहणारा. (कृष्ण.) २५. कमललोचना. (यशोदा) जेथें होती तेथें श्रीकृष्ण आला. २६. दुग्ध फुकट गेलें हें हरीचें नुकसान झालें म्हणून हात चोळूं लागली. २७. इच्छा. २८. सर्वव्यापक आणि चैतन्यस्वरूप. २९. वात्सल्यरस. ३०. सर्व प्राण्यांचीं कर्में उदासीनपणें प्रत्यक्ष पाहणारा. ३१. भोग, सुख

जननिच्या स्तनदुग्धरसार्पणें, स्वसुखतृप्तिहि मानिचि तर्पणें; ।
क्षणि असा रस जाय गळोनियां म्हणुनि घे हरि हेंचि कळोनिया. ॥ १२
'क्षुधित मी, स्तन दे मज लौकरी' म्हणुनियां रवि गाढ धरी करीं, ।
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी, मन जिचें बुडतें सुखसागरीं. ॥ १३
मुखसुखामृतरश्मि पहातसे, तुम्हि हि कां स्वमनीं न पहा तसे ? ।
परि तयासहि टाकुनि धांवते, तुम्हि हि ध्याल क्षणी अजि ! धांव ते. ॥ १४
त्रिभुवनात्मक राज्यहि ये करा, त्यजुनि तें हरिभक्तिचि हे करा; ।
जरि बुडोनि समस्तहि जातसे, तरि बुडो, हरि तोचि भजा तसे. ॥ १५
प्रभूस नेणोनिच पुत्रभावें, ते गौळणी स्त्रीप्रकृतिस्वभावें, ।
लोटोनियां चक्रगदायुधातें धांवे, उते दुग्ध, तया दुधातें. ॥ १६
तो प्रेमपान्हा अवधाचि मातें न पाजिला कां पुरुषोत्तमातें ? ।
म्हणोनि कोपास चढे हरी तो, जो क्रोधकामा स्मरणें हरीतो. ॥ १७
चावोनि ओष्ठ दशनीं मधुकैटभारी
फोडी शिळेकरुनि तें दधिपात्र भारी; ।
शिंकाघरांत हरि घालुनि पौणि खातो,
दे मर्कटांसि नवनीतचि आणिकां तो. ॥ १८
मी घे स्वभक्तिरस कीर्तनि वो ! रसाचा
टाकूनि त्या मज इला निजगोरसाचा, ।
लोण्या दह्यांस हरि, जो न कधीं भुकेला,
कां फार लोभ म्हणऊनिच नाश केला. ॥ १९

---

१. ज्या रसानें स्वसुखाची तृप्ति होते तो. २. नागरिक स्त्री. (यशोदा.) ३. मुखरूप सुखकारक अमृतकिरण चंद्र. (रश्मि=किरण.) कृष्णाचें जें मुख तोच कोणी सुखप्रद चंद्र त्याला. ४. यशोदा कृष्णाच्या मुखचंद्रास जशी पहात असे तसें तुम्ही आपल्या मनांत (हृदयांत) जो कृष्णरूप चंद्र आहे त्यास कां पाहत नाहीं ? कृष्ण हा सर्वसाक्षी परमात्मा असल्यामुळें सर्वांच्या हृदयांत त्याचा मुखचंद्र आहे, त्यास निरंतर पाहतां येईल—असें तात्पर्य. ५. हातीं. ६. तें त्रिभुवनराज्य टाकून सुद्धां. ७. कृष्णातें. (चक्र गदा इत्यादि आयुधें धारण करणारास.) ८. वर येई, तापून उत येई अशा दुधाकडे. ९. मला पुरुषोत्तमाला. (कृष्णाला.) १०. जो हरी क्रोध काम इत्यादिक षड्रिपूंस नष्ट करतो. ११. स्मरणमात्रें, स्मरणरूप भक्ति केल्यानें. १२. दांतांनीं. १३. कृष्ण. (मधु आणि कैटभ या दैत्यांचा अरि—शत्रु.) १४. दगडानें. १५. हस्त. १६. लोणी.

मृषा[1] अश्रु डोळां, परि क्रोध साच, हरी दाखवी अर्थ येथें असाच. ।
मृषा नीरें[2] नेत्रांत मातेसि दावी[3], मृषा क्रोधवार्ता कसी हे वदावी[4] ? ॥ २०
पितां थानिचा क्षोटिला म्यां भुकेला, म्हणोनी असा बाळकें क्रोध केला; ।
क्षुधाक्रोधयोगें करी रोदनातें[5], म्हणे माय तेव्हां असें नंदनातें[6]. ॥ २१
असा पात्र फोडूनियां चक्रपाणी मृषा दाखवी लोचनामाजि[7] पाणी; ।
परि क्रोध जो ओष्ठ[8] चावुनि दावी, तयाची मृषा[9] काय वार्ता वदावी ? ॥ २२
कोणी दिसेना जननी असेना, न ते स्थळीं युद्ध, न दैत्यसेना; ।
कोणासि हो ! चावुनि ओष्ठ दावी, न क्रोधवार्ता लटिकी वदावी. ॥ २३
ऋषी[10] आपणा ज्ञानदृष्टीं पहाती, म्हणोनी असा दावुनी कोप हातीं, ।
शिळा घेउनी पात्र फोडी म्हणावा न मिथ्या, तई क्रोध साचा गणावा. ॥ २४
विना क्रोध हा मारितो दैत्यसेना, ऋषी जाणती क्रोध याला असेना; ।
मृषा क्रोधवार्ता हरीची वदावी, जिहीं त्यांसही क्रोध कां देव दावी ? ॥ २५
अशास ही क्रोध कसा उठावा ? तो त्या मुनींद्रांसहि ठाव[11] ठावा[12]; ।
कीं द्रोह[13] भक्तांवरि साहवेना, तेथें क्षमा सोसुनि राहवेना. ॥ २६
ज्या भक्तिनें आवडताति भक्त, ज्या भक्तिनें ते न गणी विभक्त; ।
त्या भक्तिनें जो रसें[14] योजिला हो ! दिल्हा न त्याचा मज आजि लाहो[15]. ॥ २७
स्मरोनि मद्बाल्यचरित्र[16] गाय[17] द्रवे[18] जसी देखुनि वत्स गाय; ।
तो प्रेमपान्हा[19] मजला तसा हे न पाजितां जाय न तेंचि साहे[20]. ॥ २८
भजोनिही एक असें द्विजाती सप्रेमही काम्यफळासि[21] जाती; ।
दुग्धासि धांवे पुरुषोत्तमातें टाकोनि माता प्रिय तें न मोतें[22]. ॥ २९

---

१. मिथ्या. २. उदक. ३. डोळ्यांस अश्रु आणिले ते मात्र मृषा, पण क्रोध आला ही वार्ता मृषा नव्हे, असा उल्लेख पुढें श्लोक २६-२७ यांत स्पष्टपणें आला आहे. ४. ही वार्ता खोटी म्हणतां येत नाहीं—असा भाव. ५. रडण्यास. ६. पुत्राला. ७. डोळ्यांत. ८. ओंठ चावणें ही क्रिया क्रोधव्यंजक आहे. ९. जो क्रोध दाखविला तो खोटा असें म्हणतां येत नाहीं. १०. ऋषि जर त्याला ज्ञानचक्षूनें पाहतात, तर तो शिळा घेऊन दधिपात्र फोडून राग दाखवितो तो मिथ्या समजूं नये; या रागास भक्तद्रोह अथवा प्रेमांतर असें योग्य कारण असावें. ११. स्थान, ठिकाण. १२. माहीत, ठाऊक. १३. द्वेष. १४. भक्तिप्रेमरस. १५. लाभ. १६. माझी लहानपणाची कृति. १७. गाई, गाणें गाई. १८. प्रेमपान्हा सोडी. १९. गाय जशी वत्सास पाहतांच प्रेमपान्हा सोडते तशी यशोदा प्रेमपान्हा आला असतांही तो मला पाजीत नाहीं. २०. सहन होई. २१. परमेश्वरास भजणारे द्विज (द्विजाति) जर काम्य फलाची इच्छा करणारे असतील तर ते काम्य फळ पावतील, पण परमेश्वराला प्रिय नाहींत—असा भाव. २२. मला.

खराचि हा क्रोध मुनीस दावी, कथामृताची गति हे वदावी; ।
आतां पुढें कौतुक काय केलें, तें आइका चित्त जयां भुकेलें. ॥ ३०

तें दुग्ध नीट करितां क्षण एक झाला,
तों आठवी जननि त्या क्षुधिता अजाला, ।
'ये थान देइन' म्हणूनि मनीं कृपा हे
देखे[1] न त्यासि, परि तत्कृतमात्र[2] पाहे. ॥ ३१

हासे, परंतु बहु गोरसनाश झाला,
'मारीन' यास्तव मनींच म्हणे अजाला[3]; ।
काठी धरूनि अवलोकन जों करीते
देखे घरांत, मग ये अति लौकरी ते. ॥ ३२

तों काष्ठउलूखल[4] पृष्ठभागीं उभा, दुजे मर्कटही विभागीं; ।
चोरूनि खातो नवनीत[5], पाणी[6] घालूनि सिंका प्रभु चक्रपाणी. ॥ ३३

उडी टाकुनीयां पळाला हरी तो, समस्तां भयालागिंही जो हरीतो; ।
न तो सांपडे कीं जया कामनाहीं[7], न ठायीं पडे त्यांचिया त्या मनांही.॥ ३४

श्रमें श्रांत[8] तीचा बहू देह झाला, बहू धांवतां ये कृपा त्या अजाला; ।
जैसी हस्तिनी[9] बालहस्तीसि हस्तीं[10] यशोदा धरी कृष्णहस्त स्वहस्तीं. ॥ ३५

कृतापराधें[11] प्रभु रूदनातें करी, धरी त्या मधुसूदनातें[12], ।
करीं उगारी वरि वेत्र[13] भारी, कांपे भयें देखुनि कैटभारी[14]. ॥ ३६

अहो ! लोचनीं पूर वाहे जळाचा, मुखीं माखला रंग तो काजळाचा; ।
मुखा ऊपरी नाचवी आड पाणी[15], भयें ताडणाच्या प्रभू चक्रपाणी. ॥ ३७

---

१. यशोदेला कृष्ण कोठें दिसेना, पण गोरसपात्रांचा जो नाश त्यानें केला तो दिसला. २. त्याणें केलेला गोरसनाश मात्र. ३. जन्मरहित कृष्णाला. ४. लांकडी उखळ. ५. लोणी. ६. हात घालून. (अध्याय ९ श्लोक ८.) ७. वासनाहीं. ज्याला कामना आहे त्याला तो सांपडावयाचा नाहीं. ८. थकलेला. ९. जशी हत्तीण आपल्या सोंडेनें आपल्या लहान कलभास धरते तशी. १०. शुंडेस. येथें 'हस्तीं' सप्तमी विभक्ति आहे. असा सप्तमीचा प्रयोग अन्यत्रही आढळतो जसें, 'भूपें हळूच धरिला कलहंस पायीं.' 'कोणाला धरावयाचें असतां त्याचा जो अवयव धरावयाचा तद्वाचक शब्दाची सप्तमी योजण्याचा संप्रदाय संस्कृतांत ही आहे. (नवनीत.) ११. अध्याय ९ श्लोक ११ पहा. १२. मधुदैत्याला मारणारा (कृष्ण) त्यातें. १३. वेताची काठी. १४. कैटभ दैत्याचा अरि. (कृष्ण.) १५. छडी लागूं नये म्हणून तोंडावरून इकडे तिकडे हात आडवा नाचवी. हें 'स्वभावोक्ति' नामक अलंकाराचें उदाहरण आहे.

नीलपंकजतनू सकुमारा देखतां अजि! अशास कुमारा, ।
वेत्र दाखवि जरी घननीला हाणवे न तरि त्या जननीला. ॥ ३८
संत्रस्त तो देखियला मुरारी, उगारितां वेत्रें भयें थरारी; ।
टाकूनि काठी मधुसूदनातें बांधूं म्हणे त्या निजनंदनातें. ॥ ३९
न कामना ज्यास, न वासना ही, प्रेमेंविना बंधन त्यास नाहीं; ।
तें प्रेम वाहे हृदयांत माय दाव्यांत तीच्या म्हणऊनि माय. ॥ ४०
ब्रह्मांडकोटीं न कदापि मांता, बांधों तयातें शकतीच मांता; ।
वार्ता असी ज्या स्वजनीं वदावी, आधीं अबद्धत्व तयांस दावी. ॥ ४१
हा अनंतचि, तथापि हि लोकीं बाळरूप जननी अवलोकी; ।
बद्ध हा म्हणति येरिति जाणा, दाखवी तदपि त्याचि सुजाणा. ॥ ४२
ऐवं द्विधां कौतुक देव दावी, कथा असी हे रुचिनें वदावी; ।
न बांधवे केंवि तया प्रकारा वदों कसा बंधहि निर्विकारा? ॥ ४३
आधींच दावें उखळास माय बांधी न त्यामाजि मुकुंद माय; ।
बांधी जसें कां इतरां नरा हे, तों दोनि बोटें व्यवधान राहे. ॥ ४४
पाठीकडे उखळ आणुनि मध्यभागीं, पोटाकडे जननि अंघ्रियुगीं विभागीं, ।
देईन गांठि म्हणतां न पुरेचि दावें, त्या नंतरें नवल होइल तें वदावें.॥४५
दावें दुजें जोडुनि त्याशि माय बांधे, तरी त्यांत हरी न माय; ।
बांधेच दांवीं अवघ्या गृहाचीं तरी उणे ये! नवलाव हाची. ॥ ४६
जें तें उणें अंगुळ दोनि माजी आश्चर्य तें गोपवधूसमाजीं; ।
मातेसही विस्मय फार वाटे; तरी नये बुद्धि विचारवाटे. ॥ ४७
न आदि, ना मध्य, न अंत ज्याला; बांधे कसें कोण तया अजाला? ।
जरी स्वयें सर्व जगांत मांता, त्या बांधिती यत्न करूनि माता. ॥ ४८

---

१. निळ्या कमलाप्रमाणें ज्याचा देह. २. पुत्रास. ३. मेघश्यामा. ४. फार त्रासलेला असा. ५. मुर दैत्याचा अरि. (कृष्ण.) ६. अध्याय ९ श्लोक १२ पहा. ७. आपल्या पुत्रातें. (कृष्णातें.) ८. मातेच्या हृदयांत प्रेम होतें म्हणून ती त्याला प्रेमबंधनानें बांधण्यास समर्थ होती; त्याला वासना नसल्यामुळें त्यास प्रेमाशिवाय इतर बंधनें बांधण्यास असमर्थ होत–असा भाव. ९. मावे, मावतो. १०. कोटि ब्रह्मांडांत न मावणारा. ११. आई. (यशोदा.) १२. कशानेंही बांधला जात नाहीं असा भाव. १३. आपल्या भक्तांस (स्वजनांस) प्रेमाशिवाय इतरें बंधनें बांधूं शकत नाहींत असें दाखवी. १४. असें. १५. दोन प्रकारचें. १६. गाई म्हशी इत्यादिकांस बांधण्याची विरड्यानें युक्त अशी दोरी. १७. अंतर, कमी. (अध्याय ९ श्लोक १५). १८. दोन शेवटांनीं. १९. चमत्कार, नवल. २०. गोपाळांच्या स्त्रीसमुदायामध्यें. २१. अध्याय ९ श्लोक १७ पहा. २२. मावता.

हें तत्व नेणोनिच कष्ट भारी माता करी, देखुनि कंठभारी,[1] ।
दयाकटाक्षें जननीस पाहे; बांधोन घे दाखवि तैं कृपा हे. ॥ ४९
कीं मुक्ति बद्धांसहि[2] देव देतो, जे आत्मविद्या[3] गुरु दे, वदे तो ।
मुक्त स्वयें मुक्तिहि दे, अहो! तो; प्रेमें तयाचा प्रभु बद्ध होतो. ॥ ५०
प्रसाद मोठा विधि[4] पावला हो! परंतु त्यालागिहि देव लाहो[5] ।
न दे असा; आणि शिवादिकांहीं न वश्य हा देव अनादि[6] कांहीं. ॥ ५१
उरीं सदा श्री जगदेकमाता, गुणीं तिच्या ये घडि एकमाता; ।
गोपिप्रसादांश तईं तिला, हो! होतां, रमेलाहि[7] अतर्क्य लाहो. ॥ ५२
एवंच लक्ष्मीकमलासना[8] ही प्रसाद ऐसा कवणासि नाहीं; ।
बांधोनि घे गौळणिच्याच हातीं; ब्रह्मा रमा कौतुक हें पहाती. ॥ ५३
बांधे यशोदा बहुतां उपायीं; यत्नाविणें वामन त्या सुपायीं ।
प्रेमेंच बांधे, अजि! आयत्यानें; केलें न जाणों तप काय त्यानें. ॥ ५४

---

# वनसुधा.[9]

## अध्याय पहिला.

(श्लोक).

सुगति[10] दे अति दुष्ट अघासुरा, स्मर मना दृढ त्या अनघा[11] सुरा,[12] ।
प्रभु ऋणी जन्हि दे परमा गती, स्वपददास्यचि[13] ते नर मागती. ॥ १
भक्तांनिमित्तचि[14] अघासहि[15] मोक्ष झाला, भक्ताहि देउनिहि मोक्ष अधोक्षजाला,[16] ।
वाटे असेंचि मजला ऋण त्या जनांचें,[17] भक्तप्रियत्व इतुकें भवभंजनाचें.[18] ॥ २

---

१. अध्याय ९ श्लोक १८ पहा. २. स्वकर्मानें बंधन पावणारांस. ३. वेदांतविद्या. ४. ब्रह्मा. ५. लाभ; त्याला देव असा लाभ न दे. (अध्याय ९ श्लोक २०). ६. ज्याला आदि नाहीं असा देव. ७. यशोदा मातेला जो प्रसाद मिळतो त्याचा अंश जरी मिळाला तरी तो प्रसादांश मोठा अतर्क्य लाभच असें वक्षस्थलीं असणारी लक्ष्मी मानते. ८. लक्ष्मीला आणि ब्रह्मदेवाला. ९. हें प्रकरण श्रीमद्भागवत–स्कंध १० अध्याय ११–१३ यांच्या आधारें रचिलेलें आहे. यांत श्रीकृष्णानें गोपजनांसह वनांत जी क्रीडा केली ती वर्णिली असून ती सुधेसारखी मधुर आहे म्हणून त्याला 'वनसुधा' असें नांव दिलें आहे. कृष्णानें कंसपक्षानुयायी अघासुर आणि बकासुर यांचा वध केला त्याचें यांत वर्णन केलें आहे. १०. मुक्ति. ११. निष्पाप ऐशा. १२. देवा. १३. निजचरणसेवा. १४. गोपांसाठीं. १५. अघासुराला. १६. कृष्णाला. १७. भक्तांचें. १८. संसारनाशकाचें.

भक्तानिमित्तें वदनीं निघाला, दिल्हा तरी मोक्षचि त्या अघाला; ।
[2]तो भक्तिनें कां स्वमुखीं न घाला? पडेल दुःखावरि [3]सद्य घाला. ॥ ३
मारूनि अज्ञान अघासुराला, स्वानंद दे [5]वत्सप बासुरांला, ।
स्वनामघोषें वदनें हरी तो निघे, स्वनामें [6]अघ तो हरीतो. ॥ ४
येतां मुखांत [7]अघमूळ [8]अघासुराला, नासूनि देइल सुखें [9]अनघां सुरांला; ।
[10]वांग्वल्लिकीर्तनभरें [11]सुरराजटाळी वाजेल, जे सकळ [12]विघ्नसमाज [13]टोळी. ॥ ५
गो [14]बुद्धिसंततिच [15]इंद्रियवत्सपाळा जे देव पाळिति तयांसहि [16]वत्सपाळां ।
पापें अघेंचि गिळिलें तरि, [17]यो हरी तो तोंडांत कीं [18]अघ अघासुर जो हरीतो.
येथें पहा तुम्हि कथा असि कृष्णजीची [19]द्वैपायन स्तुति करी मुनिकृष्ण जीची,।
सांगे कथा शुकहि तेचि [20]परीक्षितीतें, जे उद्धरी अजि! तयाउपरि [21]क्षितीतें.॥
पिउनि [22]सविषही हो! पूतनेच्या स्तनातें,
मनिं धरि जननीचें श्री[23]गदाहस्त नातें, ।
निजपरमपदातें जो स्वधीरां जनां दे,
गुणरहित [24]विकुंठीं श्रीमहाराज नांदे. ॥ ८
राक्षसी जरि म्हणों जन [25]नीची, दे मुकुंद [26]पदवी [27]जननीची, ।
सद्य [28]ने स्वपरमा सदनातें, तें खरें करि सुखप्रद नातें. ॥ ९

---

१. अघासुर हा पूतनेचा भाऊ. कृष्णास मारण्यासाठीं हा कंसाच्या आज्ञेनें आला होता. यानें कपटानें अजगराचें रूप धरून तोंड वांसून मार्गांत ठाणें मांडिलें होतें. याचें तोंड ही पर्वताची खिंड आहे असें समजून यांत गाई व गोप यांनीं प्रवेश केला. तेव्हां कृष्णानें आपलें शरीर मोठें करून आंत शिरून अघासुरास चिरून गाईगोपाळांस मुक्त केलें आणि त्या दुष्ट असुराला मुक्ति दिली, अशी कथा आहे. २. त्याला तुम्ही भक्तिपूर्वक आपल्या मुखांत कां घालीत नाहीं? त्याचें मुखानें नामस्मरण कां करीत नाहीं?. ३. जें नाम घेतलें असतां दुःखाचा परिहार लागलाच होईल. ४. दुःखावर घाला पडेल=दुःख नष्ट होईल. ५. गोपाळ. (वत्सांस पाळणारा.) ६. पाप. ७. पातकमूळ. ८. पापरूप असुराला. ९. निष्पाप देवांला. १०. वाणीनें केलेल्या हरिकीर्तनाच्या भरानें. ११. इंद्राची टाळी. (हा संस्कृतप्राकृत शब्दांचा समास चिंतनीय आहे.) १२. अडचणींचा समुदाय. १३. निवारी. या श्लोकांत यमकरचना साधिली आहे. १४. गाई ह्याच केवळ बुद्धिसंतति. १५. इंद्रियें हींच केवळ वत्सांचा समुदाय. १६. इंद्रियरूप वत्सांस पाळणारे जे देव त्यांस जर पापरूप अघासुरानें गिळिलें तर. १७. येवो, तो हरि तोंडांत येवो, त्या हरीचें नाम मुखीं येवो. १८. पातक हाच अघासुर. १९. कृष्णद्वैपायन मुनि व्यास. २०. परीक्षित् राजाला. २१. पृथ्वीतें. २२. विष लावलेल्या (स्तनातें). २३. गदापाणि. (कृष्ण.) २४. वैकुंठीं. २५. नीच. २६. स्थान, जागा. २७. मातेची, मातेच्या योग्यतेस चढवी. २८. तत्क्षणीं तिला निजधामाप्रत नेई. २९. मातेचें तें सुखप्रद नातें सत्य करी.

स्वलोकास ज्या [1]ने हरी पूतनेला, करूनी तिचा बंधुही [2]पूत नेला; ।
तयाही बका [3]धाकुटा ये [4]व्रजाला, तया शोक त्याचा महातीव्र झाला.॥ १०
घाली झणी [5]व्रजजनावरि दैत्य घाला, 'मारूं' म्हणे हरि 'वनांतचि त्या अघाला;
त्याकारणेंचि वनभोजन हेतु केला, [6]भातादह्यांसि न शिळ्या हरि जो भुकेला.॥
एवं व्रजाप्रति अघासुर दुष्ट यावा, त्याचा वनांत हरुनी बळगर्व यावा, ।
यालागिं जाय [7]विपिनांस, उठे प्रभातें न स्पष्ट जों बरवि होय [8]रविप्रभा ते. १२
बोले मुलांप्रति हरी पहिले दिशीं कीं, 'रात्रींच सिद्ध करणें [9]अशनादि शिकीं; ।
जाऊं समस्तहि उद्यां [10]वनभोजनातें.' पोटांत भाव वधणें अघदुर्जनातें. ॥ १३
एके दिनीं मनिं धरूनि असें हरी तो, चाले प्रभातसमयीं, खळ जो [11]हरीतो; ।
[12]शृंगीरवेंचि करि जागृत [13]मित्रसेना, देणार [14]जागृतिस ज्याविण हो! असेना. १४
[15]खडबडोनि समस्तहि धांवले, सहितवत्स हरीप्रति पावले; ।
सकळ खेळति सोडुनि वासुरां, परम कौतुक जें गगनीं सुरां. ॥ १५
वनीं खेळती बाळ ते [16]बल्लवांचे, तुरे खोंविती मस्तकीं [17]पल्लवांचे, ।
फुलांचे गळां घालिती दिव्य हार, [18]स्वनाथासवें ते करीती [19]विहार. ॥ १६
[20]स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत, नाना गळां घालिती, ते करीती [21]तनाना, ।
शिरीं बांधिती [22]मोरपत्रें विचित्रें, शरीरावरी [23]रेखिती दिव्य चित्रें. ॥ १७
नसोनी उणें [24]रत्नमुक्तां सुवर्णा, उगाळूनियां मृत्तिकावर्ण [25]वर्णां ।
[26]तनू रेखिती, कृष्ण ही लोकरीती करी चित्र देहीं, जसे ते[27] करीती. ॥ १८
हरिहि आपण त्यांतचि खेळतो, म्हणुनि वर्णितसे [28]शुक खेळ तो. ।

---

१. नेई. २. पवित्र. तिचा बंधु बकासुर पवित्र करून नेला. ३. पूतना व बक यांचा धाकटा बंधु अघासुर. ४. गोकुळाला. ५. गोकुळांतील लोकांवर. ६. 'भातादह्यासिं न शिळ्यास हरी भुकेला' असाही पाठ आढळतो. ७. वनांत. ८. जों रविप्रभा बरवि स्पष्ट न होय तोंच=अरुणोदयाबरोबर. ९. खाण्याचे पदार्थ आणि शिकीं इत्यादि वनभोजनाचें साहित्य. १०. उद्यानांत अथवा उपवनांत जाऊन जो भोजनसमारंभ करतात तो. ११. जो खळांचा संहार करतो, नाशितो. १२. लहान शिंगांच्या शब्दानें. १३. मित्रसमुदायास जागें करून. १४. चैतन्यास, ज्ञानास, अज्ञाननिद्रामुक्तीस. १५. मोठी गडबड करून. १६. गोपाळांचे, गवळ्यांचे. १७. नूतन अंकुरांचे, पालवीचे. १८. आपल्या स्वामीसह. १९. क्रीडा. २०. ज्या गुंजांच्या माळांत त्यांचें (गुंफण्याचें) चातुर्य दिसे. २१. गाण्याचे आलाप घेती. २२. मोरांचीं पिसें. (प्राकृतसंस्कृत शब्दांचा समास.) २३. अंगावर सुंदर चित्रें काढतात. श्लोक १६ व १७ यांत स्वभावोक्ति नामक अलंकार आहे. २४. रत्नांस आणि मोत्यांस. २५ रंगास. २६. अंगावर चित्रें काढतात. २७. गोपबाळ. २८. शुकमुनि.

चहुंकडे करिती नवल क्षिती, परि हरीसचि सर्वेहि लक्षिती. ॥ १९
पहायास शोभा मृगांकाननाची पुढें मूर्ति जातां मृगांकाननाची, ।
गडी त्या चतुर्वक्त्रबापास हातीं धरीतीच धांवोनि निष्पाप होती. ॥ २०
धांवोनि लावी पहिलें करातें, श्रेष्ठत्व दे त्या अजि! लेंकरातें. ।
जो तो म्हणे, 'लाविन मीच पाणी; धरीन आधीं प्रभु चक्रपाणी.' ॥ २१
परोपरी खेळति जी! वनांत अर्पूनि चित्तें जगजीवनांत ।
धरूनियां मर्कटपुच्छ हातीं तयांसवें वृक्षिं उडों पहाती. ॥ २२
मुखें वासुनी लोचनभ्रूतटातें उभारूनियां वांकुल्या मर्कटातें, ।
अहो! दाविती शब्द तैसे करीती, असे खेळती बाळ निःशंकरीती. ॥ २३
खगांचिया साउलिच्याच संगें ते धांवती हास्यरसप्रसंगें, ।
हंसोचिया दाखविती गतीतें, जे लाधले हंसगुरुगतीतें. ॥ २४
वनीं देखती मेघनीळास मोर प्रमोदें करी नृत्यलीला समोर, ।
तयासारिखे नाचती तोक सारे, खुणावूनि अन्योन्य कीं, 'तो कसा रे!'॥ २५
जसे दांभिक ध्यानमुद्रा धरीती, जना दाविती ज्ञान ही बोधरीती, ।
तसी दाविती ते बकाभ्यासमुद्रा गडी हांसवीती कृपेच्या समुद्रा. ॥ २६

---

१. मृगांची (श्वापदांची) आणि अरण्याची शोभा पहावयास. २. मृगाचा (हरिणाचा) अंक (चिन्ह) आहे ज्यास तो मृगांक (चंद्र) त्याजसारखें आनन (मुख) ज्याचें तो चंद्रवदन कृष्ण, त्याची. ३. चतुर् (चार) वक्त्र (मुख) ज्याला तो चतुरानन (ब्रह्मदेव) त्याचा बाप. ४. हाताच्या ठायीं, कृष्णाचा हात धरून. 'हातीं' ही सप्तमी आहे. ५. हात. ६. चक्र आहे पाणीच्या ठायीं (हातांत) ज्याच्या तो. (कृष्ण.) ७. 'जगज्जीवन' असें समासघटित पद व्याकरणनियमानुरोधानें होतें. ८. वानरांचें शेंपुट. ९. झाडावर उडण्यास. १०. उडों पहाणें=उडणें हा व्यापार (क्रिया) करावयाची इच्छा धरून त्या व्यापाराचे तजविजींत असणें. ११. डोळ्यांच्या भिंवया चढवून. १२. वेडावणें, दुसऱ्यानें खिजावें म्हणून त्याच्या पुढें वेडींवांकडीं तोंडें विचकणें, हातवारे करणें, तोत्रें बोलणें, वांकडें चालणें किंवा अशा प्रकारच्या खोड्या करणें. १३. 'पक्ष्यांचिया' असाही पाठ आहे. १४. स्कंध १० अध्याय ११ श्लोक ३६-३७ पहा. १५. चालीतें. १६. हंस (यति) गुरु (श्रेष्ठ), योगिजनांमध्यें जे श्रेष्ठ त्यांना प्राप्त होणाऱ्या गतीला; हंस=परमहंस, तपासाठीं ज्यानें इंद्रिय दमन केलें असा संन्यासी. १७. मेघासारख्या निळ्या कृष्णास. १८. आनंदानें. १९. बालक. २०. ईश्वराचें एकाग्र मनानें ध्यान करीत असणें अशी अचल स्थिति. २१. उपदेशद्वारा. २२. माशांनीं जवळ यावें म्हणून बकासारखी (बगळ्यासारखी) ध्यानस्थ मुद्रा धरून स्तब्ध बसणें; ध्यानस्थ मुनीप्रमाणें बगळा जसा बसतो तसे हे बालक ध्यानस्थ स्तब्ध बसतात. २३. कृपासागर जो कृष्ण त्याला.

उडत उडत चाले जेंवि मंडूक[1]जाती
उकड[2] बसति तैसे त्यासवें तीव्र जाती, ।
न बहु परिसतां ते हस्तपादादि पाणी
मरति नवल पाहे हांसतो चक्रपाणी[3]. ॥ २७
नामप्रतापें घन[4]सन्निभाच्या प्रतिध्वनी देति दिशा नभांच्या, ।
तों तों बळें गर्जति तोक सारे, तुम्ही न गर्जा[5] ध्वनि तो कसा रे! ॥ २८
रमति हांसति हास्यरसें असे, निजमनोगत ज्यांस जसें असे, ।
करिच तो वनिं खेळ अहो! तसे विमळ जे[6] स्मरतां मन होतसे. ॥ २९
वदे शुकाचार्य परीक्षितीतें कीं 'धन्य राया! करिती क्षितीतें[7] ।
श्रीमूर्ति जे ब्रह्मसुखानुभूती[8] तीभोंवत्या खेळति त्या विभूती. ॥ ३०
संतांसि जें ब्रह्म सुखानुभूतीं दासांसि[9] तें दैवत सर्वभूतीं[10] ।
जना दिसे बाळक लोकरीती क्रीडा तयासीं शिशु ते करीती. ॥ ३१
अलभ्य ज्याचा पदरेणु[11] सिद्धां योगेश्वरांलागुनिही प्रसिद्धां, ।
प्रत्यक्ष तो शेषहि हो! स्ववाचा वर्णू शकेना व्रजे[12] वैभवाचा.' ॥ ३२
वदे शुकाचार्य असेंचि राया, कीं 'वासुरें सोडुनियां चराया ।
क्रीडा अशा श्रीहरिशीं करीती अलोकभाग्यें[13] परि लोकरीती. ॥ ३३
स्वजनजीवन[14] दैत्यअजीवनी[15] सगुण तो व्रजराज[16] अजी[17]! वनीं ।

---

१. बेडूकजाती. २. उकिडवे, चवड्यावर बसलेले. ३. कृष्ण. 'चक्रपाणि' हें तद्गुणसंविज्ञान बहुव्रीहि समासाचें उदाहरण आहे. ज्या वर्णिलेल्या गुणाचें संविज्ञान (चिन्ह, खूण) ज्याच्या विशेष्यांत नित्य सांपडते तो 'तद्गुणसंविज्ञान' बहुव्रीहि समास होय. येथें हातांत चक्र असणें हा जो गुण सांगितला तो कृष्ण या विशेष्यांत नित्य आढळतो. बहुव्रीहि समासाच्या दुसऱ्या प्रकारास 'अतद्गुण-संविज्ञान' असें म्हणतात. ४. मेघतुल्या (कृष्णाच्या) नामप्रतापें. ५. तुम्ही (श्रोते) तसा प्रतिध्वनि उठण्यासारखा हरिनामाचा गजर कां करीत नाहीं? ६. जो खेळ स्मरले असतां मन विमल (पापरहित) होतें. ७. पृथ्वीतें. ८. ब्रह्मसुखाची अनुभूति (अनुभव) जिला घडला आहे अशा त्या श्रीमूर्तीच्या सभोंवतीं जशा विभूति (ऋद्धिसिद्धि इत्यादि देवता) खेळत आहेत असे ते गोपबालक कृष्णाच्या भोंवतीं खेळतात असें दिसलें. (स्कंध १० अध्याय १२ श्लोक ११.) ९. भक्तांस. १०. सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं. ११. ज्याचे पदरेणु (चरणरज) सिद्धांस अथवा योगिवरांस दुष्प्राप. (अध्याय १२ श्लोक १२.) १२. वैभवाचा (भाग्याचा) व्रज (समूह). १३. गोपबालक कृष्णाशीं ज्या क्रीडा करीत त्या लोकरीतीस अनुसरूनच होत्या परंतु त्यांनीं कृष्णाशीं क्रीडा कराव्या हें त्यांचें भाग्य अलौकिक होतें. १४. स्वभक्तांस जीवन देणारा. (कृष्ण.) १५. दैत्यांचें जीवन हरणारा. १६. गोकुलाधिप. १७. अहो.

रमतसे जरि त्या जगजीवनीं मन बुडे, न बुडे मृगजीवनीं. ॥ ३४
वनचरित्र सुधा व्रजकाननीं करुनि तें हरि वामनआननीं, ।
हरिच ओतुनि वैभव देतसे, अमृतबिंदु हरीच वदे तसे. ॥ ३५
ग्रंथ हा 'वनसुधा' रचला हो! दे सुधेहुनिहि फारच लाहो. ।
जो वनांत हरि हा रमला हो! देतसे स्वयशहार मला हो. ॥ ३६

---

## अध्याय दुसरा.

(श्लोक.)

स्थिरचरात्मक जो अवघा हरी स्वजनजीवनहेतु अघा हरी; ।
सुख सुरद्रुम कामदुघा सुरा, स्मर मना! वधि जेंवि अघासुरा. ॥ १
रसें पहाति नभीं अवघे सुर, त्वरित ये इतुक्यांत अघासुर. ।
दुरुनि लक्षितसे खेळ खेळ तो बकबकीरिपु ज्यांसह खेळतो. ॥ २
त्या मुलांत हरिचा प्रताप तो देखतां अघ मनींच तापतो. ।
'हा' म्हणे 'भगिनिबंधुघातकी मीच एक उरलों तिघांत कीं. ॥ ३
या मुलांसहित यास गिळावें, ते गिळूनि न पुन्हा उगळावें; ।
दोंनिमित्त न वधीं जरि सारे क्रोध दारुण शमेल कसा रे!? ॥ ४
करुनियां तिळ यासह लेंकरें नरडिच्या रुधिरें सलिलें करें ।
बरवि देइन आजि तिळांजळी, करिन तृप्त बकी बक या जळीं.' ॥५

---

१. जगतास जीवन देणारा आधारभूत जो कृष्ण त्याचे ठायीं. २. जर त्या जगज्जीवनाचे ठायीं मन बुडालें तर तें मृगजीवनीं (मृगजळांत-संसारभ्रमरुप जीवनांत) बुडावयाचें नाहीं. ३. मृगजळांत. ४. गोकुळाच्या वनांत क्रीडा करून तें सुधेसारखें मधुर वनचरित्र हरि आपल्या हातानें वामनपंडिताच्या आननीं (मुखीं) ओततो, वामनकवीकडून 'वनसुधा' काव्य हरि आपणच करवितो–असा भाव. ५. लाभ. ६. स्थावरजंगमात्मक. ७. स्वभक्तांच्या जीवनाचें कारण (हेतु) जो हरि. ८. पापा. ९. सुरांचा (देवांचा) द्रुम (वृक्ष)=कल्पवृक्ष. १०. कामधेनु. ११. देवांस. १२. गोपबालक व कृष्ण यांचा क्रीडारस. १३. स्कंध १० अध्याय १२ श्लोक १३ पहा. १४. दुष्ट. १५. बकासुर आणि पूतना यांचा शत्रु कृष्ण. १६. पूतना आणि बकासुर यांचा घात करणारा, सोदरनाशकृत्. (अध्याय १२ श्लोक १४.) १७. ओकून टाकावें. १८. पूतना व बक या दोघांचा सूड उगविण्यासाठीं जर मी सर्वांस मारिलें नाहीं तर माझा भयंकर कोप शांत कसा होईल ?. १९. या कृष्णासह सकल गोपबालक हे तीळ आणि त्यांच्या नरडीचें रुधिर (रक्त) हेंच सलिल (उदक) घेऊन तद्द्वारा बक व पूतना यांस तिलांजली देईन. २०. तिळ आणि उदक यांनीं भरलेला अंजलि. श्राद्धप्रसंगीं मृत पूर्वजांस तिलोदकांजलि अथवा तिलांजलि देण्याचा संप्रदाय आहे.

परंतु हातें जरि हे वधावे, कोणी झणी घेउनि जीव धांवे ।
म्हणोनि पोटींच कलाप[1] सारा, निवे असा हो! पसरी पैसारा[2]. ॥ ६
ऐसें विचारुनिच रौजवाटे[3] निजे, पहातां गिरिरौज[4] वाटे ।
मोठा धरी देह भुजंगमाचा[5] जो नाशकर्ता स्थिरजंगमाचा. ॥ ७

अघ अजगर मोठा तोंड वासूनि वाटे
शयन करि मुलांला तुच्छ होऊनि वाटे, ।
न[6] फणि परि फणीसा दीसतो हा स्वरूपी
म्हणउनि शिशुवृंदें स्वैरभावें[7] निरूपी[8]. ॥ ८

म्हणति, 'दुष्ट भुजंग असे खरा, तरि भिऊं न तया खळशेखरा[9]; ।
सकळ यांत निघों तरि काय हो! करिल सर्प भयानक कीय[10] हो. ॥ ९
निघोनि पाहों घडि एक सारे, गिळील आम्हां खळ हा कसा रे? ।
शिरावरी श्रीव्रजराज[11] हा कीं जो[12] मृत्युकाळा सकळांस हाकी.' ॥ १०
म्हणति, 'एकै[13] गिळी जरि साप हा घडिमधेंचि मरेल कसा पहा! ।
चिरुनि टाकि जसाचि बका क्षणें वधिल यासि पहा कमळेक्षणें.' ॥ ११
जरि असा अजि! निश्चयं सांपडे, अजित[14] सर्व म्हणोनि ठसा पडे, ।
अघफणांतहि[15] हार दिसे हरी, अघबकीबक जो [16]निमिषें [17]हरी. ॥ १२

---

## अध्याय तिसरा.

(श्लोक.)

हरिकथा [18]परिसा अतिपावनी, करि पहा! कसि त्यासि कृपा वनीं, ।
भरंवसा धरितां हरिचा [19]हरी [20]भवभयें नकसा अजि! [21]संहरी? ॥ १
देखोनियां दुःख अघास वाटे, त्याआंत जावें अवघ्यांस वाटे[22]; ।
[23]नामध्वनीयुक्त अवीट टाळी ते वाजवीती स्वअरिष्ट टाळी[24]. ॥ २

---

१. जमाव, गाईगोपाळांचा समुदाय. २. शरीराचा पसारा. ३. राजमार्गी. ४. हिमालय. ५. सापाचा, अजगराचा. अजगरवपु धरून सर्वांस भक्षण्याच्या आशेनें रस्त्यांत पर्वतासारखा पडून राहिला. ६. तो फणायुक्त नव्हता तरी नागासारखा दिसे. ७. स्वेच्छ. ८. पाही, अवलोकी. ९. दुष्टशिरोमणि. १०. देह. ११. हा व्रजराज (कृष्ण) शिरावर असतां, रक्षण करण्यास तत्पर असतां. १२. जो मृत्यु व काल यांस हांकलून लावणारा. १३. आमच्यापैकीं एकाला. १४. जिंकला न जाणारा. (कृष्ण.) १५. अघासुराच्या फणांमध्यें पुष्पहारासारखा हरि दिसला. १६. पळांत. १७. संहार करी. १८. ऐका. १९. कृष्ण. २०. संसारभयें. २१. नाहींशी करतो. २२. मार्गांत. २३. वृत्तसुखार्थ 'ध्वनि' शब्द दीर्घ केला आहे. २४. आपल्या अरिष्टास टाळणारी अशी मोठी नामध्वनियुक्त टाळी त्यांनीं वाजविली.

गडी सर्व टाळीरवें केशवाचे[2] असे धांवती श्रीहृषीकेश[3] याचे, ।
सवें हांकिलें वृंदेंही वासुरांचें, भयें कांपले देह सर्वां सुरांचे. ॥ ३
सुखीं सुरांच्या गगनीं अहाहा! अनर्थ झाला म्हणती 'पहा हा, ।
परंतु रक्षील हरी प्रभावें' झाले उगे मानुनि याच भावें. ॥ ४
पोटीं सवत्स शिशुवृंद जरीं निघाला, नाहीं तयांत हरि, हें कळलें अघाला; ।
यावा मुकुंद म्हणऊनिच वाट पाहे, हें देखतां हरिस उद्भवली कृपा हे. ॥ ५
देखोनि मानित अही हरि विस्मयातें, कीं सर्प हा करिल दारुण भस्म यांतें, ।
जाळील लाविल न हा असुर क्षणातें यांच्या तरी करिन मी असुरक्षणातें.॥ ६
निजबळप्रद सर्व खळांस मी, विषमता[10] न सुरां असुरांसमी; ।
म्हणुनि होतिल दैत्यविषें मृतें परि तयां उठवीन कृपामृतें. ॥ ७
गृहसुखीं निघणें जरि मज्जना[11] तरि करीन भवांबुधिमज्जना; ।
स्वकृतभोग[12] घडेच जरी खरा, तरि न बाधक साधकशेखरा. ॥ ८
गृहरती[13] जरि होति सुखावहा, तरि म्हणे, 'मज रक्षिल देव हा.' ।
जरि अचूक सुखासुख पावतो. तरि तया बुडवीच न भाव[14] तो. ॥ ९
'ऐसें जरी अजगरोदरवन्हिजाळ[15] हे नाश पावतिल वत्सप[16] वत्सजाळ[17], ।
वर्षोनि त्यां उपर मी स्वकृपामृतातें[18] रक्षीन मारुनि अघासुर यां मृतांतें.' ॥ १०
विचारूनि ऐशा कृपेनें हरी तो, स्वयें जो रिघे जो खळां संहरीतो; ।
पडे भक्त त्यामाजि घाली स्वदेहा[19], जया आपुलें देव सर्वस्व [20]दे हा. ॥ ११
पडे ज्यांत भक्त स्वयें त्यांत टाकी उडी आणि काढूनि आणी तटाकीं[21]; ।
जगीं ख्याति ऐसी कराया हरी तो निघे त्यांत, जो त्या खळा [22]संहरीतो.॥ १२

---

१. टाळीच्या आवाजानें. (हा प्राकृतसंस्कृत शब्दांचा समास चिंतनीय आहे.) २. कृष्णाचे. ३. कृष्ण. (इंद्रियांचा+स्वामी=हृषीक+ईश.) ४. समुदाय. ५. या श्लोकांत यमकालंकार आहे. ६. प्रतापें. ७. हरि रक्षील असा भाव मनांत धरून सर्व देव स्तब्ध झाले. ८. आपल्या पोटांत वासरांसह गोपबालक जरी शिरले तरी त्यांत कृष्ण नाहीं हें अघासुरास समजलें. ९. प्राणरक्षणास. १०. असमता, कमजास्तपणा. ११. माझ्या जनास, माझ्या भक्तांस जर संसारसुखांत शिरणें आहे तर मी त्यांस भवांबुधीमध्यें (संसारसागरामध्यें) बुडवीन. (मज्जन=बुडणें.) १२. आपण केलेल्या कर्मांचा भोग (फळ) जरी प्राप्त होतो, तरी तो साधकशेखरा (साधकोत्तम ज्ञानी पुरुषास) बाधक होत नाहीं. १३. गृहप्रीति, संसारसुखाची गोडी. १४. देव माझें रक्षण करील—हा भाव. १५. अजगराच्या पोटांतील अग्नीच्या ज्वालेनें. १६. वासरांचें पालन करणारे गोपाळ. १७. वत्ससमुदाय. १८. आपल्या कृपारूप अमृतातें. १९. ज्या संकटीं स्वभक्त पडे त्यांत आपल्या देहास घालीं, आपणच त्या संकटांत उडी टाकी. २०. देतो. २१. तीरास. २२. नाश करतो.

मृत्यु [1]जे घडिस होय अघाला, प्राण ते क्षणिच ये [2]अनघांला. ।
[3]दोनि एकसमयींच कराया जाय त्यांत, म्हणतो शुक [4]राया. ॥ १३

प्रथम उठवितां हे देखती जों भयातें
न जिति नि[5]जगडी तों केंवि मारूं तयातें; ।
करि [6]शरण न रक्षी जों दुजें काम घेना
[7]उभयहि न घडे हें त्यांत जों मी रिघेना. ॥ १४

स्वभक्तांसि जो देव [8]सर्वस्व दे हा, अघाच्या मुखीं वाढवी तो [9]स्वदेहा; ।
जसा [10]वायु दाटे, तसें दुःख वाटे, निघे प्राण तो [11]ब्रह्मरंध्राचवाटे. ॥ १५
हरीच्या स्मृतीनें [12]तनुत्याग होतो, न ये मागुती [13]गर्भवासा अहो ! तो. ।
हरिस्पर्श दे[14]हावसानीं अघाला म्हणोनी न [15]देहांतरीं तो निघाला. ॥ १६
हरिस्पर्श त्याचा [16]अगण्या दिसांचा करी भस्म हो ! पापपुण्यादि [17]सांचा ।
[18]समीरासवें ज्योति त्याची निघे ते न कोणी परी देह जाऊनि घेते. ॥१७
बऱ्या पुण्यदेहास पुण्यें सजावें, अघें यातनेच्या [19]शरीरास जावें, ।
न [20]दोन्ही, तरी [21]कृष्णरूपीं भरावें. श्रुती बोलती शब्दसंदर्भ [22]रावें. ॥१८

---

१. ज्या घटिकेस. २. अनघ (निष्पाप) असे जे गोपबालक त्यांला अघासुरास मरण आल्याबरोबर प्राण आले, अघासुर मरण पावला, आणि गोपबालक सजीव झाले. ३. अघासुरप्राणहरण आणि गोपप्राणदान या दोन गोष्टी एकदम करण्यासाठीं तो अघाच्या मुखांत शिरला. ४. परीक्षित् राजा श्रोता आणि शुक हा वक्ता. ५. माझे सोबती जीवंत राहणार नाहींत, यास्तव या अघासुराला मीं कसा मारूं ? या संवगड्यांस आधीं उठविलें असतां ते या असुरास पाहून भयानें जिवंत राहणार नाहींत. ६. शरण आलेल्यास रक्षिलें नाहीं तों दुसरें काम पत्करीन. ७. अघासुरवध आणि सवत्सगोपरक्षण हीं दोन्ही कार्यें मी जोंपर्यंत त्याच्या मुखांत शिरलों नाहीं तोंपर्यंत होणार नाहींत. ८. सकल धन देतो. ९. आपला देह मोठा करी. १०. प्राणवायु कोंडे. ११. मस्तकांतून. (अध्याय १२ श्लोक ३१.) १२. देहविसर्जन. १३. पुनर्जन्म पावत नाहीं. प्राणी चौऱ्याशीं लक्ष योनि पावून मुक्त होतो, पण हरिस्मरणानें इतक्या योनींत उत्पन्न होण्याच्या पूर्वीच जन्ममरणमुक्त होतो—असा भाव. १४. अंतकाळीं. (देह+अवसान=शरीर+अंत.) १५. अन्यदेह (पुनर्जन्म) पावला नाहीं. १६. अगणित. १७. पाप व पुण्य इत्यादिकांचा सांचा. (संचय, सांठा.) १८. वायूबरोबर जी ज्योति (तेजोमय प्राण) निघाली ती पुनः कोणत्याही देहांत शिरली नाहीं; अघासुर हरिस्पर्शी झाल्यामुळें जन्मांतरमुक्त झाला. १९. पुण्य करून दिव्य देह मिळवावा अथवा अघें (पाप) करून यातनामय शरीर संपादावें, आणि ह्या दोन्ही गोष्टी (पाप व पुण्य) न झाल्यास कृष्णरूपीं तादात्म्य पावावें. २०. पाप व पुण्य नसल्यास. २१. विष्णुरूपांत संमीलन पावावें. (अध्याय १२ श्लोक ३३.) २२. मोठी आरोळी मारून.

भुजंगातुनी[1] मूर्ति जेव्हां निघाली, अघज्योति तैं झेंप येऊनि घाली; ।
तयांतूनि बाहेर जो देव यावा, नभीं दाखवी तेज तो दिव्य यावा. ॥ १९

सवत्सें[3] मुलें जीं मृतें त्यांस देवें[4], पहातांचि तीं ऊठती हो ! सदैवें. ।
तैंयांयुक्त[5] बाहेर जेव्हां निघाला, हरी मुक्ति दे ज्योतिरूपा[6] अघाला. ॥ २०

स्तवीती नभीं देव कीं देवराया, 'अजी ! पाउलें हीं तुझीं दे वराया.' ।
पडे पुष्पवृष्टी वना नंदनाची[7], उभी मूर्ति नंदाचिया नंदनाची[8]. ॥ २१

बाहेर ये अघमुखांतुनि एक वेळे, लंघी नभा विबुधनाद[9], समुद्र वेळे[10], ।
वाद्यां सुखांत जयशब्द 'नमो नमो[11] जी !' संतोष तो दशशतानन[12] ही न मोजी ॥

तो सत्यलोकांत विधातयाला[13], ये आयकों नाद, सुधा[14] तयाला, ।
निमेष[15] होई, इतुक्यांत पाहे, येऊनियां श्रीहरिची कृपा हे. ॥ २३

स्वभक्तरक्षार्थ मुखीं निघाला, जे[16] योगियां ते गति दे अघाला. ।
'अंतीं मुखा ये गति[17] दे जना मी,' माहात्म्य दावी व्रजराज[18] नामीं. ॥ २४

घनतनु[19] दनुजारी वस्त्र ही पीतें[20] साजे,
स्तविति सुर विमानीं देखती हो ! तसा जे. ।
झळकति वनमाला[21] रत्नराजी[22] विराजे
जलदरुचि[23] पहा तो, मोरे[24] ते देव राजे. ॥ २५

---

१. कृष्णाची मूर्ति भुजंगांतून (अघासुररूप सर्पाच्या तोंडांतून) जेव्हां बाहेर निघाली तेव्हां अघाची ज्योति (प्राणमय तेज) त्यावर झेंप घाली, त्या कृष्णस्वरूपांत शिरली. २. येणें (तेजाचें), प्रकाश. ३. मेलेलीं वासरें आणि मुलें. ४. श्रीकृष्णानें. ५. त्यांसह. ६. तेजोमय. ७. इंद्राच्या नंदनवन नामक उद्यानांतील पुष्पांची वृष्टि. ८. पुत्राची. ९. विबुधांचा (देवांचा) नाद (घोष) जयघोष नभा लंघी. (अध्याय १२ श्लोक ३४ पहा.) १०. समुद्र वेळा (मर्यादा) उल्लंघन करून चढे. ११. नमस्कार. १२. सहस्रवदन शेष. १३. ब्रह्मदेवाला सत्यलोकीं देवांचा जयघोष ऐकूं आला. १४. त्या विधात्याला तो नाद सुधा (अमृततुल्य) होय. येथें उपमान (सुधा) आणि उपमेय (नाद) यांचा अभेद वर्णिला आहे, म्हणून हा रूपक नामक अलंकार होय. १५. पळ, अल्पकाळ. १६. जी गति योगिजनांला प्राप्त व्हावयाची ती अघासुराला देई. १७. अंतकाळीं ज्याच्या मुखीं माझें नांव येतें त्याला मी गति (मुक्ति) देतों. १८. श्रीकृष्ण. १९. मेघश्याम, दैत्यरिपु. २०. पिंवळें. २१. वनमाला='आपादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥;' वनपुष्पें, तुळसी, इत्यादिकांची केलेली कृष्णाच्या गळ्यांतील आपादलंबिनी माला. २२. रत्नांची माळा. २३. जलदाची (मेघाची) रुचि (कांति) ज्यास तो. २४. मेघश्याम श्रीकृष्णापुढें देव हे मोरासारखे भासले.

अजि ! अभक्तअघासुरआननीं हरि शिरे गति दे व्रजकाननीं. ।
[2]हरिकथेंत मुखीं जरि तो निघे निजसुखींच न कां मिसळूनि घे ? ॥ २६

---

## अध्याय चवथा.

(श्लोक.)

जो आहुती वैदिक[3]विप्रसिद्धा, नेघे मुखीं देव मुखीं प्रसिद्धा, ।
तो गोप[4]बाळार्पित खाय घांस श्रीकृष्ण, जो संहरि हो ! अघास. ॥ १
भक्तां जसा सुलभ अन्यजनास नाहीं, सौलभ्य[5] हें न कमळा[6] कमळासनां[7] ही. ।
कीं लाभ नाम वदनीं जरि एक घारे[8], आतां पहा ! हरिचि तारक सत्कथा रे !
देऊनियां मुक्ति[9] अघास देवें, मुलें सवें घेउनि तीं सदैवें, ।
सरोवराच्या बरव्या तटातें, आला हरी नाशुनि संकटातें. ॥ ३
[10]अजित काय मुलांप्रति बोलतो, अजि ! तसाचि धरा मनिं बोल तो. ।
स्वगडियांस वदे वचनामृता, करि सजीवहि जेंवि जना मृता. ॥ ४
म्हणे कृष्ण त्यां बाळसंतां[11], 'पहा रे ! अरे ! या स्थळीं सर्व [12]संताप हारे, ।
करीं ठाव खेळाचि या संपदा हा, जया वाळवंटीं घडे [13]संप दाहा. ॥ ५
पहा हे मऊ शीतल स्वच्छ वाळू[14], रुचे अन्न एथें क्षुधा तुच्छवाळूं, ।
पहा साउली दाट केंवि द्रुमांची[15], नव्या पल्लवीं श्री पहा विद्रुमाची[16]. ॥ ६
स्वपदींच[17] पद्मालयाश्री[18] जळाला[19], करी देखतां दाह जातो जळाला. ।
न नीरांस हे स्वच्छता मानसाच्या[21], गती ज्यांत संतांचिया मानसांच्या. ॥ ७
झाडें पुण्यफळें करूनि सुफळें[22] केळीं बरीं पोफळें[23],
नारेळें सजळें[24] विचित्र उजळें हीं रम्य सीताफळें, ।

---

१. मुखीं. (येथें संस्कृत भाषेप्रमाणें सामासिक शब्दांचा संधि करणें अवश्य असतां तो केला नाहीं.) २. जर हरिकीर्तनांत कृष्णाबरोबर अघासुराचें नांव मुखांत आलें, तर त्यास कृष्ण आत्म-सुखामध्यें मिळवून कां घेणार नाहीं ? हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. ३. वैदिक द्विजांनीं सिद्ध केलेली (आहुति). ४. गवळ्यांच्या मुलांनीं दिलेला. ५. कृष्णाची सुलभता. ६. लक्ष्मी. ७. ब्रह्मदेव. श्रीकृष्ण भक्तांस जसा सुलभ आहे तसा कमळेस (लक्ष्मीला) आणि कमळासनाला (ब्रह्मदेवाला) सुलभ नाहीं. ८. राहे. ९. भागवती गति. १०. कृष्ण. ११. गोपालबालक हेच संत. १२. सगळा ताप शांत होतो. १३. दाहाची समाप्ति. १४. स्कंद १० अध्याय १३ श्लोक १-५ पहा. १५. वृक्षांची. १६. पोंवळ्यांची श्री (शोभा) नवीन फुटलेल्या पालवींत दिसते ती पहा. १७. आपल्या पायींच. १८. लक्ष्मी. १९. उदकाला. २०. उदकास. २१. मानससरोवराच्या. हें सरोवर हिमालय पर्वताच्या गंधमादननामक शिखराच्या उत्तरेस आहे. २२. चांगल्या फळांनीं युक्त. २३. सुपारीचीं झाडें. २४. उदकयुक्त.

तैसीं हीं प्रबळें स्वसंचितबळें जीं तुंबळें जांबळें,
पुष्पें हीं विमळें अशोक बकुळें कुंदादिकांचीं कुळें. ॥ ८
पाळीयुक्त तळीं असीं न सुतळीं स्वर्गीं न वा भूतळीं,
वायूतें विमळीं जळीं सकमळीं जीं पाळिती शीतळीं, ।
अंतर्बाह्य अली महाशतदळीं [11]भृंगावळी [12]सांवळी
बिंदू[13] त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ताफळीं? ॥ ९
वदे कृष्ण गोपाळ बाळां जनातें, 'बसूनी करूं ये स्थळीं भोजनातें, ।
वनीं वत्स सोडा चरायासि पाणी, तयां पाजुनी या' म्हणे चक्रपाणी.॥ १०
'बरें कृष्णजी! बोलसी तूं जसा रे! तसें वर्ततों, लक्षितों तूज सारे.' ।
असे जेविती सोडुनी वासुरांतें, नभीं होय आश्चर्य सर्वां सुरां तें. ॥ ११
तपांचीं फळें त्या मुलांचीं तशीं कीं अहो! सोडिती सर्व निश्चित शिंकीं,।
हरीभोंवती मांडितां भोजनातें वदे व्यास जे पंक्तिशोभा[16] जनातें. ॥ १२
शिंकाच कोणी अशनें करीती, पत्रावळी एक अनेकरीती, ।
कित्येकिं दूर्वांकुरदर्भकांहीं केलीं स्वपात्रें व्रजअर्भकांहीं. ॥ १३
निजमुख कवणाही आड दृष्टी असेना,
रचुनि बसवि ऐसी भोंवती बालसेना, ।
हरिवदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या,
म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार[22] केल्या. ॥ १४

---

१. मोठीं. २. उंच. ३. स्वच्छ, पांढरीं. ४. समुदाय. ५. पाळ, पाळी=तळें, विहीर यांच्या भोंवतालीं पाणी बाहेर न जावें म्हणून माती दगड इत्यादिकांचा केलेला परिधि. ६. पाताळांत, स्वर्गांत अथवा भूमीवर अशीं तळीं दिसत नाहींत. ७. जीं (तळीं) सकमळीं शीतळीं विमळीं जळीं वायूतें पाळिती, ज्या तळ्यांतील स्वच्छ, थंड आणि कमलशोभित उदकाच्या योगें वारा शीतल आणि सुगंध वाहतो अशीं तळीं. ८. आंत व बाहेर. ९. भ्रमर. १०. मोठ्या कमळांत. ११. भ्रमरपंक्ति. १२. काळी. १३. पाण्याचा बिंदु त्याच शतपत्रकमळावरच्या दळावर (पत्रावर) मुक्ताफळाची बरोबरी करतो. १४. मोत्यें. श्लोक ८ व ९ यांत 'ळें' आणि 'ळीं' या अक्षरांची प्रत्येक चरणांत आवृत्ति वारंवार झाली आहे, म्हणून यांत अनुप्रासालंकार झाला आहे. वामनास अनुप्रास फार आवडत असत असें यावरून दिसतें. १५. कृष्ण (चक्रपाणी) म्हणे:—ये स्थळीं बसूनि भोजनातें करूं, तयां (वत्सां) पाणी पाजुनीयां वनीं चरायासि सोडा (आणि) या. (अध्याय १३ श्लोक ६ पहा.) १६. दहाव्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें वागतों. १७. देवांना तें आश्चर्य होय. १८. शिधा सामग्री भरून आणलेलीं शिंकीं. १९. अध्याय १३ श्लोक ८ पहा. २०. भोजनपात्रांऐवजीं कोणी दुर्वांकुरावर, कोणी दर्भांवर, कोणी शिंक्यांवर वाढून घेऊन भोजन केलें. (श्लोक ९ पहा.) २१. गोपबालकांनीं. २२. कृष्णाचें तोंड पाहण्यास सर्व सारखेच उत्सुक होते म्हणून वर्तुलाकार पंक्ति बसविल्या.

गळाला असे सर्व देहाभिमान, स्वसंस्कारशेषें क्वचिद्वर्तमान, ।
असा [1]चीमणा देह वाटे मनातें बहू कृष्णसामीप्य त्या वामनातें. ॥ १५
बहु खुजे अतिवामन हो गडी, तनु जशा [2]भवसागरसांगडी, ।
[3]स्वनिकटत्व तयां बहु देव दे, [4]कँवळ दे निजगुह्य तयां वदे. ॥ १६
[5]अलंकार मिथ्या गमे हेंचि साच, स्वसंस्कारशेषें दिसे तो तसाच. ।
असा जो [6]खुजांगी [7]स्वदेहाभिमान प्रभू बैसवी [8]त्यांस साम्यें समान. ॥ १७
[9]प्रारब्धयोगें जरि भोग साच क्षणेक वाटे तरि तो तसाच ।
मिथ्या पहाती बहुदूरदृष्टीं [10]कीं भोग [11]कर्मानुगुणें [12]अदृष्टीं. ॥ १८
[13]अहंकर्तृता आणि तें [14]कर्म साच, स्वयें मानितो [15]अज्ञ जैसा तसाच, ।
स्वभोक्तृत्वही भोगही सत्य मानी, न जाणोनि हें वर्म देहाभिमानी. ॥ १९
अहंकर्तृता भोक्तृतेलागिं दावी, तरी [16]ज्ञानकाळीं मृषा ते वदावी, ।
खरें मानिलें कर्म तो भोग वाटे, जरी चालतो विश्वमिथ्यत्ववाटे. ॥ २०
[17]प्रारब्ध तें निश्चित भोग दावी, भोगी तरी दुःख सुखें वदावीं, ।
तें नाठवे भोगुनि भोग कांहीं, बाळांस संतांस शुकादिकांहीं. ॥ २१
[18]यो मला सुखचि दुःख न यो जी! [19]वासना जन मनीं अशि योजी, ।

---

१. लहान. २. त्यांच्या तनु (शरीरें) संसारसागर तरून जाण्यास भोंपळ्याच्या सांगडीसारख्या दिसल्या. ३. आत्मसांनिध्य. ४. घांस. ५. सुवर्ण खरें असून त्याचे केलेले कडीं तोडे इत्यादि नानाविध अलंकार (दागिने) हे मिथ्या आहेत. पण ते अलंकार असे संस्कारविशेषानें लहान रूपें धरतात, तसें श्रीकृष्ण हा अप्रमेय आणि अज्ञेय असूनही देहाभिमानरूप संस्कारानें वामनत्व धरतो. सारांश, श्रीकृष्ण परमात्मा यद्यपि अतींद्रिय होय तथापि देहधारण केल्यामुळें बालकासारखा लहान होऊन आपल्याबरोबर सर्व गोपबालकांस समानत्वें (सारखेपणानें) भोजनास बसवितो—असा भाव. ६. खुजेपण, वामनत्व. ७. देह हाच मी अशा अभिमानानें. ८. गोपबालांस. ९. प्रारब्धयोगें जरी (विषयादिक) भोग क्षणीक साच (सत्य) वाटे तरी तो बहुदूरदृष्टीं मिथ्या वाटे. १०. कारण. ११. कर्मास अनुसरून. १२. दैवीं. १३. मी सर्व कर्मे करतों—हा भाव. १४. हें सर्व कर्म माझें हा भाव. १५. जैसा अज्ञ (अजाण मनुष्य) अहंकर्तृता आणि तें कर्म साच स्वयें मानितो तसाच देहाभिमानी हें वर्तन जाणोनि स्वभोक्तृत्व आणि भोग हीं सत्य मानी—असा अन्वय. १६. ज्ञान प्राप्त होतें तेव्हां ती अहंकर्तृता मिथ्या असें म्हणतात. १७. प्रालब्धानें भोग भोगणें निःसंशय प्राप्त आहे आणि भोग हे सुखदुःखमय आहेत, परंतु तें सुखदुःख शुकासारख्या साधुजनांस आणि बालकांस (भोग भोगूनही) आठवत नाहीं. भोग भोगिले तरी बालांस आणि मुनिजनांस त्यांतील सुखदुःखाची आठवण नसते. १८. येवो. १९. जन मनांत आम्हांला सुख येवो, दुःख न येवो अशी वासना योजी (धरी).

भोगी[1] जे स्मरति त्यासचि वाटे, संत चालति न या जन वाटे. ॥ २२
असे संत ते [2]बाळसंतोष जाणा, गडी श्रीमुरारी स्वयें त्या [3]सुजाणा, ।
[4]जरी होत दुःखी सुखी भोगकाळीं स्मृती त्या न नित्या सुखाच्या सुकाळीं. २३
क्षुधादिबाधा सरतेचि काळीं स्वचित्सुखाच्या पडती सुकाळीं, ।
ते बाळसंतोष जयां सदा हा संतोष जो तोष दिशांस दाहा. ॥ २४
संतोषतो नंदकुमार साचा बाळांस तैशा [5]परमारसाचा ।
पंक्तीस दे लाभ [6]अजी! वनांत बुद्धी जयांच्या [7]जगजीवनांत. ॥ २५
[8]हरी देह तो देहबुद्धीस मानी मृषा स्नेह वैषम्य तत्वीं समानीं, ।
[9]खुजी तेचि जों जों जयाची वदावी, समीपत्व तों तों तयां देव दावी. ॥ २६
एवंच जों जों जडसाच वाटे, तों तों असें दूरिल याच वाटे, ।
जों जों खुजा हा अभिमान होतो, समीप तों तों हरिही अहो! तो. ॥२७
असे [10]कर्णिका [11]अंबुजामाजि जेंवी मुलां मध्यभागीं बसे [12]कृष्ण जेवी ।
मुखीं ग्रास सप्रेम घाळूनि हातीं दहीं भात, हे देव लीला पहाती. ॥ २८
[13]वंशी [14]नादनटी तिला [15]कटितटीं खोवूनि [16]पोटीं [17]पटीं
[18]कक्षे वामपुटीं [19]स्वशृंगनिकटीं [20]वेतांटिही [21]गोमटी, ।
जेवी [22]नीरतटीं [23]तरुतळवटीं, श्रीश्यामदेहीं [24]उटी
दाटी [25]व्योमपोटीं सुरां, सुख लुटी घेती [26]जटी [27]धूर्जटी. ॥ २९

---

१. जे भोगांची स्मृति करतात (वासना धरतात) त्यांसच भोग होतात; संत (साधुजन) या जनवाटेनें (भोगाची वासना धरणें ह्या मार्गानें) जात नाहींत. २. गोपालबालक. ३. शहाणा. ४. जरी गोपाळ भोगकाळीं सुखी अथवा दुःखी होतात तरी त्यांस नित्य सुखाच्या सुकाळीं सुखदुःखांची स्मृति व्हावयाची नाहीं. ५. अत्यंत आनंदाचा. ६. अहो. ७. 'जगज्जीवनांत' असा समास पाहिजे. जगताला आधारभूत जो श्रीकृष्ण त्याच्या ठायीं. अजी! ज्याच्या बुद्धी जगजीवनांत (आहेत) तैशा बाळांत (ही) नंदकुमार साचा संतोषतो (यास्तव) वनांत त्याच्या पंक्तीस परमा रसाचा लाभ दे—असा अन्वय. ८. वामनरूप. ९. ज्याची देहबुद्धि जों जों खुजी (लहान) होते तों तों देव त्याच्या समीप येतो. १०. कमळांतील गड्डा, बीजकोश. ११. कमळामध्यें. १२. कृष्ण हा बीजकोश, मुलें हीं कमळदळें आणि मुलांची मंडळाकार पंक्ति हें कमळ, असें येथें रूपक आहे. १३. वेळूची केलेली मुरली (पांवा). १४. नादानें नटणारी. (मंजुळ नादाची.) १५. कमरेस. १६. निऱ्या खोंवण्याच्या ठिकाणीं. १७. वस्त्रांत. १८. डाव्या काखेमध्यें. १९. आपलें वाजविण्याचें शिंग, डावे कुशीस वाजविण्याचें शिंग खोंवून. २०. वेताची छडी. २१. सुंदर. २२. यमुनेच्या कांठीं जेवतो. २३. झाडाखालीं. २४. श्यामदेहावरील उटणें. २५. आकाशाच्या पोटांत सुरांची (देवांची) दाटी झाली. २६. जटाधारी तपस्वी. २७. शंकर, (येथें तपस्वी.)

घे हातीं केवळा मनांत कैवळा त्या सुंदरा गोवळा
चित्तालागिं वळा, स्वसत्व निवळा, ध्या सांवळा कोवळा; ।
कीर्तीचा धवळा सुधाब्धिधवळा जो भक्तिचा जांवळा
प्रेमातें खवळा उठे कळवळा त्या प्रीतिनें आंवळा. ॥ ३०

हरी कर्णिकेच्या स्थळीं मध्यभागीं मुलें भोंवतीं र्‍हस्वदीर्घें विभागीं, ।
लहानापुढें थोर अंभोजपत्रें असीं बैसवीलीं भेवार्कातपत्रें. ॥ ३१

वत्स सर्वहि सुभागवतांत श्रीपती स्वशिशु भागवतांत ।
जेवितो म्हणति भागवतांत स्वात्मतारसविभागवतांत. ॥ ३२

वर्णरीति यमकीं समजा ते तेचि कीं विषम कीं सम जाते, ।
शब्द वामनशुभानुभवाचे त्रास ते हरिति भानुभवाचे. ॥ ३३

---

१. घांस. २. आलिंगन द्या. ३. ध्यान करा. ४. पांढरा, ज्याची कीर्ति शुभ्र. (कीर्तीचा रंग पांढरा असा कविसंकेत आहे.) ५. जो क्षीरसागरासारखा पांढरा. ६. श्लोक २९ आणि ३० यांत अनुक्रमें 'टी' आणि 'ळा' या अक्षरांची आवृत्ति वारंवार प्रत्येक चरणांत झाली आहे म्हणून येथें अनुप्रासालंकार आहे. ७. ठेंगणीं आणि उंच अशीं निराळीं करी. ८. कमलपत्रें. जशीं कमलांतील पत्रें कर्णिकेच्या भोंवतीं आधीं लहान व मग मोठीं अशीं क्रमानें लाविलेलीं असतात तशीं श्रीकृष्णानें आपल्या सभोंवतीं लहानमोठीं या क्रमानें मुलें बसविलीं. कृष्ण हा कर्णिका व लहान मुलांच्या आधीं आणि नंतर मोठ्या मुलांच्या पंक्ति हीं पत्रें त्यानें बसविलीं. ९. संसाररूप सूर्याच्या उष्णापासून तारणारा जो कृष्ण त्याणें. १०. उत्तम गवतांत, तृणांत. ११. भगवद्भक्त गोपाळ त्यांत. १२. श्रीमद्भागवतपुराणांत. १३. स्वात्मरसाचा विभाग घेणारे जे शिशु त्यांत. १४. यमकांमध्यें वर्णांची रचना कधीं सम कधीं विषम जाते; यमक साधण्यासाठीं केलेल्या शब्दरचनेंत अर्थ कधीं वेडावांकडा होतो, कधीं सरळ असतो, तथापि ते शब्द आपल्या शुभ अनुभवानें असल्यामुळें ते भानुभवाचे (सूर्यरूप संसाराचे) त्रास हरण करितात. १५. सूर्यासारखा ताप देणारा संसार.

# ब्रह्मस्तुति[१].

## चरण पहिला.

(श्लोक.)

ज्याणें मुक्ति अघासुरासि दिधली, वत्सां मुलां जीवनें[२],
ज्याणें देउनियां, सरोवरतटीं आरंभलीं भोजनें, ।
जो कां वत्सपवत्सरूप[३] विधीनें[४] सर्वांस नेल्यावरी
झाला अब्दभरी[५], नमूं स्थिरचरीं तो चित्स्वरूपी हरी. ॥ १
ज्याणें दाउनियां अतर्क्य महिमा ब्रह्मा मनीं मोहिला,
तो आच्छादुनि नंदनंदन[६] वनीं जो एकला राहिला, ।
तेव्हां सावध होउनी नमुनियां ब्रह्मा करी जे स्तुती,
त्या 'ब्रह्मस्तुति'[७]ची करी हरिच तो टीका स्वयें श्रीपती. ॥ २
जो कां एक अनेकरूप दिसतो, तो वाम[illegible]ुखें,
टीका या स्तुतिची करूनि करितो श्रोत्यां जनाला सुखें; ।
ब्रह्मा नेत्रजळें पदाब्जयुगुळें[८] न्हाणूनियां जेथुनी,
श्रीमद्भागवतीं[९] करी स्तुति तिची टीका पहा तेथुनी. ॥ ३

---

१. हें काव्य श्रीमद्भागवत--स्कंद १० अध्याय १४ याच्या अनुरोधानें रचिलें आहे. अघासुराचा वध केल्यावर एके दिवशीं श्रीकृष्ण गोवत्सांस चराक्यास सोडून गोपालबालकांसह नदीच्या पुलिनावर भोजनास बसला. इतक्यांत ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाचें सामर्थ्य पाहण्यासाठीं सर्व गोवत्सांस आणि गोपबालकांस चोरून नेलें. पण तितक्यांचींही रूपें धारण करून श्रीकृष्णानें गोकुळांत सर्व व्यवहार यथापूर्व चालविला, तेव्हां ब्रह्मदेव त्यास शरण येऊन त्याची स्तुति करूं लागला. त्या ब्रह्मदेवकृत स्तुतीची ही वामनपंडितांनीं प्राकृतांत श्लोकबद्ध टीका केली आहे. "ब्रह्मस्तुति हा ग्रंथ माधुर्य आणि प्रसाद यांचें माहेरघर आहे. यांत वामनानें भक्तिरसपूरित वर्णन पुष्कळ ठिकाणीं केलें आहे. * * * या प्रकरणांतील किती एक उद्गार आणि वर्णनें इतकीं चांगलीं उतरलीं आहेत कीं, मराठी भाषेंतील उत्तमकाव्यांत तीं पहिल्यास्थानीं बसविण्यास योग्य आहेत. या ग्रंथांत आत्मविचाराचा कठिण विषय जरी वर्णिला आहे तरी सर्वत्र सोपी, गोड आणि बाळबोध भाषा घातली आहे." (वामनावरील निबंध, पृ० ४९.) २. प्राण. ३. वांसरें राखणारा आणि वत्सें एतद्रूप. ४. ब्रह्मदेवानें. ५. एकवर्षभर. ६. नंदाचा पुत्र. ७. ब्रह्मदेवानें कृष्णाची जी स्तुति केली तिची टीका कृष्ण (श्रीपति) स्वयें करी--असें पंडित म्हणतात. ही टीका त्रिचरणी आहे, पहिल्या चरणांत भक्तियोग, दुसऱ्यांत कर्मकांड आणि तिसऱ्यांत भक्ति. ८. चरणकमलद्वयें. ९. श्रीमद्भागवत--स्कंध १० अध्याय १४ पहा.

ब्रह्म्यानें हरिरूप दृष्टि सहजें तेव्हां[1] वनीं देखिलें,
श्रीगोपाळपणांत बाळपणिचें प्रेमें मनीं रेखिलें, ।
आधीं वेष तसाच वर्णुनि तया वंदूनियां त्यावरी,
त्याची निर्गुणता तथा सगुणता वर्णील ते वैखरी[2]. ॥ ४
जो[3] एक स्तुति योग्य तूं विधि म्हणे नंदात्मजा! त्या तुतें,
मी वंदीन जया स्वरूप बरवें अत्यंत हें साजतें; ।
मेघश्याम शरीर बीज झळके[4] त्यामाजि पीतांबरीं,
गुंजांचे अवतंस[5] मोरमुगुटीं शोभे मुखश्री बरी. ॥ ५
जेव्हां मारुनियां अघासुर, वनीं आरंभिलीं भोजनें,
तेव्हां वेष जसा तसाच विधिला येथें जगज्जीवनें[6] ।
दृष्टीं दाखविला चतुर्मुख तया वर्णील रूपा बरें,
या श्लोकांतचि उत्तरार्ध रचितां ऐसीं पहा अक्षरें. ॥ ६
कंठीं श्रीवनमाळिका[7], करतळीं[8] दध्योदनाचा[9] बरा
शोभे ग्रासविलास वेणु[10] जठरीं पीतांबरीं साजिरा, ।
[11]शृंगी[12] आणिक वेत्रही[13] धरियला कांखेस डावेकडे,
जेवी सव्यकरीं[14] हरी मृदुपदीं त्याच्या विधी[15] पडे. ॥ ७
एवं कृष्ण असे सुवेषविधिनें गोपाळवेषें असा,
माथां वंदुनि वर्णिला खनयनीं तत्काळ भासे जसा; ।
आम्हा या तनुचा अतर्क्य महिमा हा वर्णवेना कधीं,
तेव्हां वर्णिल कोण आणिक असें बोलेल आतां [15]विधी.॥ ८
ऐसा गोवळवेष केवळ जसा पद्मोद्भवें[16] देखिला,
तैसा वर्णुनि शंकला हरि अहो! गौळीच म्यां लेखिला[17]. ।
जो या देवपणीं अतर्क्य महिमा जो तर्कवेना कधीं,
तेव्हां वर्णवतो अतींद्रिय[18] कसा? बोलेल ऐसें विधी. ॥ ९

१. गोपालबालकांसह वाळवंटांत भोजन करीत होता तेव्हां. २. वाणी. ३. 'नौमीड्य' इत्यादि श्लोक १ ला पहा. ४. वीज मेघरूप देहावर चमकते. (तडित्=वीज हेंच अंबर=वस्त्र होय). ५. अलंकार, तुरे. ६. जगताचें जीवन (आधार) जो त्यानें. ७. आपादलंबिनी माला. (पृष्ठ ३२२ टीप २१ पहा.) ८. हातांत. ९. दहिंभाताचा. १०. घांस. ११. मुरली कंबरेस लाविली आहे. १२. शिंग. १३. काठी. १४. डाव्या हातानें. (येथें 'सव्य' म्हणजे 'उजवा' असा अर्थ समजावा). १५. ब्रह्मदेव. १६. पद्मापासून (कमळापासून) आहे उद्भव (जन्म) ज्याचा तो विधाता. १७. 'देखिला' असाही पाठ आहे. १८. जो इंद्रियांस विषय (गम्य) नाहीं असा.

जें[1] तूझें अवताररूप दिसतें दृष्टीस सर्वां जना,
हेंही केवळ पांचभौतिक नव्हे देवा ! जगज्जीवना ! ।
जें माझ्याच अनुग्रहार्थ रचिलें ऐकोनि मत्प्रार्थना,
याचाही महिमा कधीं न गवसे कोणाचियाही मना. ॥ १०
जें दृष्टीस दिसे, मनांत गवसे, याचा जयीं नाकळे
कोणाला महिमा, अतींद्रियपणीं माहात्म्य कैसें कळे ? ।
आनंदात्मक, पाणि पाद न जया, जें शुद्धमायामय,
ब्रह्मात्मानुभवैकमात्र अवघें होऊनि जें अद्वय. ॥ ११
ज्या देवासि अपाणिपाद म्हणती वेदस्मृती तत्वतां,
तों तो होउनियां अहो ! सगुणही त्याला निराकारता; ।
कर्णांवांचुनि ऐकतो, श्रुति म्हणे, नेत्रांविणें पाहतो,
तेव्हां निर्गुणधर्महीन न घडे मायामय स्वामि तो. ॥ १२
जें ब्रह्म तें धर्मविहीन आहे, न आइके आणिक तें न पाहे, ।
साक्षित्वही निर्गुणता न साहे, प्रकाशुनी दीप उगाच राहे. ॥ १३
दीपप्रकाशें तरि नेत्र पाहे, नेत्रांविणें दीप उगाच आहे, ।
मायेविणें ब्रह्म न धर्म साहे, श्रुतींत येथें सगुणात्मता हे. ॥ १४
साक्षात् सुखानुभवरूप तुझें तयाचा,
कैंचा कळेल महिमा म्हणऊनि बाचा ।
श्लोकांत यांत वदली कमळासनाची,
तेही अहो ! सगुणताचि जनार्दनाची. ॥ १५
ब्रह्म तों सुखचि केवळ आहे, तें निजात्मसुख ईश्वर पाहे, ।
त्यासही न कर पाद तथापी, भक्तवत्सल रमापतिरूपीं. ॥ १६
नयन हेंचि अतींद्रिय दोंपरी, सगुण एकचि वर्णियला हरी, ।
प्रकटरूप महत्वहि नाकळे, तरि अतींद्रियभाग्य कसें कळे ? ॥ १७
भाव हाचि महिमेंत न कांहीं, तारतम्य उभयत्रहि नाहीं, ।

१. 'अस्यापि देव' इत्यादि श्लोक २ रा पहा. २. हें तुझें शरीर इतर प्राण्यांच्या शरीराप्रमाणें पांच भूतांपासून झालेलें नव्हे; पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें समजावीं. ३. कृपा, प्रसाद. ५. जें तुझें शरीर डोळ्यांना दिसतें त्याच्या स्वरूपाचा महिमा जर कोणाला कळत नाहीं, तर जें तुझें आनंदात्मक ब्रह्मात्मानुभवैकमात्र करचरणरहित शरीर त्याचें ज्ञान कसें होईल ?. ५. जें शुद्ध सत्वगुणात्मक. ६. करचरणरहित. ७. 'यच्छोत्रेण न शृणोति' इत्यादि श्रुतिवचन. ८. ब्रह्मदेवाची वाचा. ९. इंद्रियांनीं जाणण्यास अशक्य, इंद्रियातीत. १०. लहानमोठेपणा हा भाव.

न्यून पूर्ण महिमा न हरीचा रूपभेदमहिमा सम साचा. ॥ १८
आत्मत्वभक्ति सहजें प्रियता विधाता, श्लोकांत या तिसरियाच वदेल आतां; ।
पूर्वी अतर्क्य महिमा वदला [1]विरिंची, यालागिं येविषयिं शंकित बुद्धि [2]त्याची. १९
न महिमा हरिचा जरि आकळे, तरि निजानुभवत्व कसें कळे? ।
न कळतां [3]भवबंध तुटे कसा? म्हणुनि संशय उद्भवला असा. ॥ २०
तरि [4]समुद्रतरंग जळीं मुरे, मग दुजेपण त्यांत कधीं नुरे, ।
मन मुरे स्वचिदात्मपणीं जरी, कळविण्यांत तयांत नुरे उरी. ॥ २१
परि अनुभव ऐसा [6]साधकां होय तेव्हां,
जरि भजनविशेषें तत्कृपा होय जेव्हां, ।
भजन सफळ तेव्हां भक्ति जेव्हां ठसावे,
सकळहि कळणें तें भक्तिमार्गेचि धांवे. ॥ २२
असे वत्स जेथें जसी गाय धांवे, तसा बोधही भक्ति तेथें ठसावे, ।
परी प्रीति जे ईश्वरीं आत्मभावें, तिये प्रीतिला '**भक्ति**' ऐसें म्हणावें. ॥ २३
कळे आत्मता बोध झालाचि त्याला, पुढें भक्तिनें साध्य तों केंवि बोला? ।
असे बोलती दांभिक ज्ञानमानी कुतर्काश्रयें शब्द बोधाभिमानी ॥ २४
जड निषेधुनि शुद्ध चिदात्मता, गुरुमुखें कळली जरि तत्वतां, ।
मन मुरोनि अशेषपणें उरे, तरिच सिद्ध न जेथ दुजें स्फुरे. ॥ २५
यालागिं जीवेश्वरऐक्य जेव्हां कळे निजात्मा कळलाचि तेव्हां, ।
आत्मप्रियत्वें गुरुदेवभक्ती करील तेव्हांच समाधिमुक्ती. ॥ २६
श्रुती '[8]यस्य देवे परा भक्ति' ऐसी पहा बोलती याच अर्थास कैसी? ।
गुरु होय दावी चिदात्मत्व जेव्हां, तयाची करावी अहो! भक्ति तेव्हां. ॥ २७
जसी कां देवाची करि परम भक्ति प्रियपणें,
गुरूची ही तैसी करि जरि मनें ऐक्यनिपुणें, ।
गुरूनें जे त्याला अनुभवरहस्यार्थ कथिले,
प्रकाशूनी प्राप्ति स्थिति परम देती मग भले. ॥ २८

---

१. ब्रह्मदेव. ईश्वराच्या स्वरूपाचा महिमा अतर्क्य आहे, त्याचें ज्ञान कोणाला होत नाहीं असें ब्रह्मदेवानें म्हटलें, म्हणून संसारमुक्त कोणीच होत नाहीं अशी शंका घेण्याचें कारण नाहीं, याचें विवरण तिसऱ्या श्लोकांत आहे. २. ब्रह्मदेवाची. ३. संसाररूप बंधन. ४. समुद्राची लाट. ५. मिसळे, एकरूप होई. ६. देवास भक्तीनें वश करणाऱ्या लोकांस. ७. जेथें भक्ति आहे तेथेंच बोध (ज्ञान) ठसतो. ८. ज्याची देवावर मोठी भक्ति. ९. ज्ञानस्वरूपत्व

श्रुतीचा असा अर्थ यालागिं जेव्हां, करी भक्ति आत्मज्ञ तो सिद्ध तेव्हां, ।
गुरूच्या मुखें जें कळे शब्दबोधें तयाची स्थिती स्वात्मताभक्तिवेधें. ॥ २९
याकारणें '[1]तत्वमसीति'वाक्यें जीवेशवाच्यांशनिषेधऐक्यें, ।
आत्मप्रियत्वें गुरुदेवभक्ती, करी सुरे चित्त तयींच मुक्ती. ॥ ३०
कोणी [2]जडाजडविवेक [3]करूं निघाले, ज्ञानाभिमान मनिं मानुनि मूढ झाले. ।
आतां किमर्थ म्हणती सगुणा भजावें? ते ज्ञानगर्वनिधि हेंचि तयां म्हणावें. ३१
अभ्यासही करिति केवळ निर्गुणाचा, तों तों अधीक मनिं आदर मीपणाचा, ।
'अभ्यास मी बहु बरा करणार ऐसा,' चित्तांत भाव सहसा उपजे न कैसा? ३२
[6]आत्मज्ञ होउनिहि जे भजती मुकुंदा, त्याचा सदा श्रवणकीर्तनरूप धंदा; ।
आत्मैक्यभक्ति हृदयीं गुण दिव्य कानीं, ते सिद्ध होउनि कदापि न होति मानी. ॥
[8]श्रवणकीर्तनभक्ति जसी जसी, हरिकृपाऽभिवृद्धि तसी तसी, ।
जसि कृपा उपजे मधुसूदना तसि तसी अगुणीं स्थिरता मना. ॥ ३४
जसि जसी स्थिरता हरिची दया, तसतसा अवलोकिल तो तया, ।
मनिं तरंग अहंकृतिचा कसा मग उठें? जरि निश्चय हा असा. ॥ ३५
[11]ज्ञाता स्वभक्तिच करी दृढबोधसिद्धी, बोधीं न भक्तिविण निश्चळ होय बुद्धी, ।
याकारणें [12]अजितभक्तिमहत्व आतां ज्ञानाहुनी अधिक [13]वर्णितसे विधाता. ॥ ३६
[14]ज्ञानीं प्रयास मनसुस्थिरता कराया, आत्मज्ञ मांडिति, [15]भवांबुधितें तराया; ।
चित्तस्थिरत्व करितां श्रमि फार होती, [16]वृत्ती निरोधिति तथापि न त्या रहाती. ॥
ते [17]शुद्धनिर्गुणउपासक कष्ट जेव्हां, ऐसे वृथा अफळ देखति तेचि तेव्हां, ।

---

१. तत् त्वम् असि इति–तें तूं आहेस असीं छांदोग्य उपनिषदांतील वाक्यें. २. जड=अचेतन. अजड=सचेतन. ३. 'करूनि धाले' असाही पाठ आहे. ४. अहंकाराचा. ५. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. ६. आत्मस्वरूप जाणणारे आत्मविद्. ७. अभिमानी, अहंकारयुक्त. ८. श्रवण आणि कीर्तन हे नवविध भक्तीपैकीं दोन प्रकार होत. बाकीचे सात:–स्मरण, स्वनिवेदन, सख्य, समर्चन, पादसेवन, दासता, आणि नमस्करण. ९. जेथें संधि कर्तव्य असून केला नाहीं अशा उदाहरणांपैकीं हें एक होय. १०. ईश्वराच्या निर्गुण स्वरूपांत मन स्थिर होतें. ११. ज्ञाता पुरुष बोधसिद्धि (आत्मज्ञान) आपल्या भक्तिद्वारा दृढ करतो, कारण भक्तीशिवाय बुद्धि स्थिरता पावत नाहीं. १२. ईश्वरभक्ति महिमा. १३. अज्ञ संसार कसा तरून जातील हें तिसऱ्या श्लोकांत वर्णिलें आहे. ज्यांस ज्ञान नाहिं ते भक्तिद्वारा संसारसागर तरतात, यास्तव ज्ञानाहून भक्ति थोर असें वर्णिलें आहे. १४. 'ज्ञाने प्रयास' इत्यादि श्लोक ३ रा पहा. १५. संसारसागरातें. १६. चित्तवृत्ति आंवरून धरतात. १७. ईश्वरास ज्ञानमार्गानें प्राप्त करून घेण्यास फार प्रयास पडून ते निष्फळ होतात म्हणून निर्गुणउपासक ईश्वराची भक्ति करतात.

ब्रह्मा म्हणे, 'हरि! तुझ्या चरणारविंदा, वंदूनि मांडिति तव श्रवणादि धंदा. ३८
योगी प्रयास न करूनि समस्तभूतीं, वस्त्रांत तंतु तुज चिंतुनि येचिरीती; ।
साष्टांग ते करिति वंदन विश्वरूपा, लक्षूनियां जड जगांतहि चित्स्वरूपा. ॥३९
'ज्ञाने प्रयासमुदपास्य नमंत एव' श्लोकांत या चरणिं येरिति हाचि भाव, ।
ज्ञानीं प्रयास न करी सगुणात्मयोगी, ज्ञानें तथापि करि वंदन वीतरागी. ॥४०
ज्ञानीं प्रयास न करूनिहि बोधरीती, विश्वात्मते करुनि वंदन ते करीती; ।
भेदेंकरूनि भजणें पशुतुल्य ऐसें, स्पष्ट श्रुती वदति जाणति ते न कैसें? ॥४१
ज्ञानें असे करिति ते प्रणिपात तूतें, तूझें कथामृतचि जीवन त्यास होतें, ।
लीला तुझ्या श्रवणिं आइकती मुकुंदा! सांडूनि योगपथ आणिक सर्व धंदा. ४२
जे संतहृत्कमळसारसुधा निघाली, त्यांच्या मुखें करुनि कर्णपुटास आली, ।
वा रे! अशा हरिकृपाख्यसुधेस प्याले, ज्ञानें श्रमाग्नि विझतां हृदयीं निवाले. ४३
तुझ्या कथा त्रिविध ताप हरी! हरीती, कष्टाविणें श्रवणअमृत जें भरीती, ।
स्थानें धरूनि बसती श्रवणार्थ जेथें, कानीं कथा रिघति आपणहूनि तेथें. ॥४४
एकाग्रचित्ततनु निश्चळ, मौन वाचे, जे येरिती केवळ घेति कथामृताचे, ।
ब्रह्मा म्हणे, 'अजित तूं, तुज जिंकणारे नाहींत यद्यपि तयां वश तूं मुरारे! ॥४५
टाकूनियां इतरसाधनमात्र धंदा, तूझी कथा सतत आइकती मुकुंदा, ।
त्यांचें जिणें सफळ जे भगवत्कथेतें मानूनि जीवन जिती त्यजिती व्यथेतें. ॥ ४६
श्लोकांत या तिसरियांत पदापदाचा जो वामनाननपुटीं हरिरूप वाचा, ।
वाक्यार्थभाव वदली बरव्या प्रकारें, पाहोत संत हरिभक्तिपथें विचारें. ॥ ४७

---

१. पादकमळा. २. वस्त्रामध्यें तंतु जसा उपादान कारण आहे तसा तूं सर्व सृष्ट पदार्थांत आहेस असें चिंतुनी. ३. साष्टांग वंदन अष्टांगपात=अष्टांगप्रणाम='जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया। शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः॥,' दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, भाळ, वाचा, नेत्र, उर, आणि बुद्धि या अंगांनीं केलेला नमस्कार. ४. ज्ञानस्वरूप. ५. ज्ञानप्राप्त्यर्थ किंचित् ही प्रयास न करून देह, वाणी आणि मन यांनीं नमस्कार करतात इत्यादि. ६. गेली आहे विषयप्रीति ज्याची तो. ७. नमस्कार. ८. उदक. ९. संतांनीं मनापासून स्तविलेल्या तुझ्या अमृतरसतुल्य अशा कथा कानावर आल्या असतां. १०. कानावर. पुट—कोणत्याही वस्तूचा द्रोणासारखा जो आकार करतात तो; अंजलिपुट, कर्णपुट, नासापुट, पर्णपुट, इत्यादि. ११. पृष्ठ ६९ टीप ३, व पृष्ठ १७८ टीप ५ पहा. १२. ग्रास, घांस. १३. तूं अजित असतांही संतांनीं तुला भक्तिभावानें वश करून जिंकिलें आहे—असा भाव. १४. भगवत्कथेला प्राण समजून. १५. वामनपंडिताच्या मुखानें या तृतीय श्लोकाचा पदशः जो अर्थ श्रीकृष्णानें वदविला तो संत भक्तिपूर्वक कितपत यथार्थ आहे हें पाहोत.

‘योगप्रयासपथ टाकुनियां मुकुंदा ! आत्मैक्यभक्ति करुनी तव भक्तिधंदा, ।
आरंभिती श्रवणवंदनरूप,त्यांला होतोसि तूं वश’ असें विधि बोलियेला. ॥ ४८
यानंतरें बोलतसे विरिंची कीं, ‘भक्ति हे टाकुनियां हरीची ।
ज्ञानार्थ मोठ्या पडती प्रयासीं, न कष्ट देती फळ तें तयांसी’.॥ ४९
अमृतपुष्करणी धरणीवरी, सकळ मंडळ जेथ झरे हरी, ।
असिहि टाकुनि भक्ति तुझी बरी, श्रमति ते श्रममात्र तयां उरीं. ॥ ५०
टाकूनि भक्ति असि केवळ बोधसिद्धी जे भक्तिगम्य जन इच्छिति ते समाधी, ।
टाकूनियां सकस तंदुळगर्भ शाळी, जे स्थूळ फोल कुटिती श्रमती त्रिकाळीं. ॥५१
अव्यक्त निर्गुणचि भोगुनि यत्नरत्नें, होऊनि खिन्न शिरिं वंदिति भक्ति यत्नें, ।
श्लोकामध्यें तिसरिया विधि भक्ति ऐशी जें बोलिला विशद वर्णियलेंच तैशी.॥ ५२
आत्मैक्य एक करिती सगुणीं उपेक्षा, जे ज्ञानगर्वित न सेविति अंबुजाक्षा, ।
श्लोकांत येथ चवथ्यांत कुबुद्धि त्यांची गोपाळरूप हरिसीं वदला विरिंची. ॥ ५३
आत्मज्ञ हे द्विविध येरिति वर्णियेले, आत्मज्ञ आणि सगुण प्रिय थोर केलें. ।
आत्मज्ञता सुगम हे चिदचिद्विवेकीं केली निरर्थक तथापि अभक्तलोकीं. ॥ ५४
आत्मा प्रकाशक जडासि असें कळाया, आयास काय परि जोंवरि देवराया ! ।
नारायणा न भजती, स्थिति त्यांस नाहीं,हा शब्दबोधचि, न सिद्धि तयांत कांहीं. ५५
जे देवतांतरउपासकमात्र आधीं, सत्संगमें धरियली शुचिआत्मबोधीं, ।
आत्मा प्रकाशक असें कळलें तथापि, सर्वात्मता न कळली हरिच्या स्वरूपीं. ॥५६
ते बोधयत्नहि करूनि कितेक कष्टी, होऊनियां मग विचारुनि दूरदृष्टी, ।
श्रीविष्णुभक्ति करितां कृतकृत्य झाले, श्लोकांत त्या तिसरियांत निरूपियेलें. ५७
श्लोकांत जे कथियले विधिनें चतुर्थीं, आत्मज्ञ होउनिहि ते पडले अनर्थीं, ।
आत्मज्ञ हे द्विविध येरिति वर्णियेले, आत्मज्ञ आणि सगुणी प्रिय थोर केले. ५८
‘आधींच विष्णुभजनीं न जयां प्रवृत्ती, होऊनि खिन्न मग जे हरिभक्त होती, ।
त्यांलागिं कष्ट बहु फार’ म्हणे विधाता, वर्णील विष्णुभजनीं सुगमत्व आतां. ५९
श्लोकांमधें द्विविध जे वदला विरिंची, आत्मज्ञता न वदतां वदला तयाची; ।
आतां वदेल तिसरें हरिभक्ति ज्यांला, मूळींहुनी हरिकृपेस्तव बोध झाला.॥ ६०

---

१. योगाभ्यासाचा कष्टमय मार्ग. २. ‘श्रेयःस्रुतिं’ इत्यादि श्लोक ४ था पहा. ३. कसदार. ४. स्पष्ट. ५. कमलनेत्र हरीला. ६. दोन प्रकारचे=एक भक्तीवांचून आत्मज्ञ आणि दुसरा भक्तिद्वारा आत्मज्ञ. ७. चैतन्य आणि जड यांच्या विचारीं. ८. कृतार्थ, सफलेच्छ. ९. मनाचा कल, ओढा. १०. सोपेपणा, जाण्याचा सुलभ मार्ग.

आत्मा न जाणतहि जे भजती मुकुंदा, त्याचा सदा करिति जे [1]श्रवणादिधंदा, ।
त्यांला गुरू हरिच होउनि अप्रयासें, देईल [2]बोधें परिपूर्ण वदेल ऐसें. ॥ ६१
'[3]पूर्वीच म्यां स्वरुप देखियलें अनंता! तें वर्णितों म्हणवुनी' विनवी विधाता ।
कीं, 'देखिलें बहु जगीं निजकर्मयोगीं जे कर्म सर्वहि [4]समर्पिति तूजलागीं.॥६२
आवश्यकें करुनियां [5]विहितें स्वकर्में [6]निष्काम तीं तुज समर्पिति विष्णुधर्मैं, ।
कर्मार्पणेंचि तुझि आवडि त्या जनांला, तूझ्या कथा मग हरी! रुचती तयांला.६३
कर्मार्पणें तव कथाश्रवणेंचि ज्यांला, त्वद्भक्तिचा परमदुर्लभ लाभ झाला, ।
आत्मैक्य आवडि तुझी कळली मुकुंदा! झालेच सिद्ध न करोनिहि [7]योगधंदा. ॥
अनायासें ऐशा तव चरणदास्यें करुनियां;
[8]गति श्रेष्ठा तुझ्या तुजचि भजती जे नर तयां, ।
त्यजूनी जे अन्या मग शरण आले तुजपरी,
तयांही त्या सिद्धि श्रमगणसमृद्धी बहु करी. ॥ ६५
जाणोनि जे [9]चिदचिदात्मविवेकमात्रा, मानूनि धन्य भजती न [10]सरोजनेत्रा, ।
त्यांला श्रमाविण नसे फळ अन्य ऐसा श्लोकांत यांत कथिला स्फुट भाव तैसा.॥
गर्भस्तुतींतहि असें [11]दशमींच येथें, श्लोकद्वयें [12]विधिभवादिक भाव तेथें, ।
हा स्पष्ट अर्थ वदले श्रुतिसिद्ध देवें [13]गीतेंतही कथियलें स्फुट वासुदेवें. ॥६७
गर्भस्तुतिश्लोक हरीच येथें वाखाणितो श्रीहरिभक्ति जेथें, ।
ते संस्कृत श्लोकहि दोनि वाचा, त्यानंतरें अर्थ पहा तयांचा. ॥ ६८
[14]श्लोकद्वयार्थहि हरीच वदेल येथें संक्षेपरूप बहु विस्तरता न जेथें, ।
कीं आत्मता कळलि शाब्दिकबोधरीती, जें मुक्ति हेचि म्हणऊनि मनीं धरीती. ॥

---

१. हरिनाम गुणकीर्तन ऐकण्याचा उद्योग. २. भक्तिद्वारा ज्ञान. योगद्वारा ज्ञान प्राप्त होत नाहीं. ३. 'पुरेह' इत्यादि श्लोक ५ वा पहा. ४. देतात. ५. उचित. ६. कर्मफलाची वांछा न धरतां, कर्मापासून होणाऱ्या सिद्धि आणि असिद्धि या दोहोंच्या ठायीं समबुद्धि ठेवून. भगवद्गीता–अध्याय २ श्लोक ४८ पहा. ७. चित्तवृत्तीला आटोक्यांत ठेवण्याविषयींचा उद्योग. ८. भागवती गति. ९. विश्वव्यापक आत्म्यातें. १०. कमलनेत्रा. ११. दशम स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायांत 'गर्भस्तुति' हें प्रकरण आहे. १२. ब्रह्मदेव, महादेवादिक. १३. 'यांति मद्याजिनोऽपि माम्'=जे माझी भक्ति करतात ते मज येऊन मिळतात; 'ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्'=जे माझ्याशीं भक्तीनें वागतात ते माझ्या ठायीं आहेत, आणि मी त्यांच्या ठायीं आहे–इत्यादि वचनें पहा. (भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक २५-२९.) १४. जे ज्ञानी आहेत ते हरिपादसेवा न करतां परमपदाधिरूढ होऊन अधः पतन पावतात परंतु जे हरिभक्त आहेत ते पतन न पावतां विघ्नमस्तकीं पाय देऊन निर्भय होत्साते वागतात–असा या दोन श्लोकांचा भावार्थ आहे.

[1]आत्मज्ञता परम तें पद त्या पदींही यत्नें चढोनिहि अहो! पडताति [2]देही, ।
कीं आत्मता कळलि, कां सगुणास आतां सेवूं[3]? म्हणूनि भजती न तुतें अनंता! ॥
तुझा [4]भाव जेव्हां असा अस्त झाला, मतिभ्रंश तो मोह आला तयांला; ।
जरी शुद्ध होती बरी बुद्धि त्यांची, तुझा भाव जातांच ते शुद्धि कैंची? ॥ ७१
दृष्टिप्रकाश [5]उदयाद्रिस सूर्य येतां, आंधार तीस रवि अस्तगिरीस जातां, ।
शुद्धा मती सगुणभावविना अशुद्धा, सिद्धीविना हरिकृपा अवघ्या असिद्धा. ॥७२
पायीं तुझ्या [6]आदर ज्यांस नाहीं, आत्मज्ञता त्यांस फळे न कांहीं. ।
हा [7]आद्यपद्यार्थ दुज्यां विमुक्तां निरूपिती केवळ **विष्णुभक्तां**. ॥ ७३
तुझी नावडी, मुक्त झालों म्हणूनी जयां भ्रष्टती ते जसे [8]ज्ञानमानी, ।
तसे **माधवा**! जे [9]तुझे ते कधींही [10]न होती, न ते चूकती मार्ग कांहीं.॥७४
सखा सोयरा स्वामि तूं **शेष**शायी म्हणूनी [11]सुहृद्भाव तूझ्याचठायीं ।
तयां रक्षिता तूं जनीं नित्य होसी, शकेना करूं विघ्न कोणी तयांसी. ॥ ७५
महाविघ्नसेनापती मोठमोठे तयांचे शिरीं पाय देवोनि वाटे, ।
हरी! चालती मोक्षमार्गीं तुझे जे, तशांही न ते बाधती [12]विघ्नें राजे. ॥ ७६
गर्भस्तुतिश्लोकयुगार्थ ऐसा, **हरी**विणें होइल मोक्ष कैसा? ।
**गीता** श्रुती बोलति येचरीती, तें बोलतां श्लोक अनेक होती. ॥ ७७
न तें बोलवे, ग्रंथ वाढे म्हणोनी, अगत्यास हे बोलिलों श्लोक दोनीं; ।
पुढें [13]भारती **भार**तीच्या [14]पतीची पहा! दाविते काय शोभा स्तुतीची?॥७८
तुझा अतर्क्य महिमा नकळे **अनंता**! श्लोकांत हें दुसरिया वदला [15]**विधाता**; ।
बोलोनि येरिति मनींच सशंक झाला, कीं मोक्ष याउपरि होय कसा जनाला?॥७९
देणार मुक्तिस कळे महिमा न त्याचा, लोकांस मोक्ष मग हा घडणार कैंचा? ।
शंका असी हृदयिं, तीस हरावयाला हे श्लोक तीन कमळासन बोलियेला.॥ ८०
अतर्क्य महिमा जरी, तरिहि तूं निजात्मा **हरी**!
प्रकाशक मनीं स्फुरे, मन मुरे तया भीतरी; ।

---

१. आत्मज्ञानप्राप्ति झाल्यावर सगुणाची उपासना कशास्तव करावी असें विमुक्तमानी म्हणतात म्हणून परमपदारूढ झाले तरी अधःपतन पावतात. २. प्राणी. ३. उपासना करूं. ४. तुझ्याविषयीं भक्तिभाव. ५. हृदयपर्वतावर. ६. भक्तिभाव. ७. पहिल्या श्लोकाचा अर्थ. (३२ व्या श्लोकाचा अर्थ. अध्याय २.) ८. ज्ञानाचा व्यर्थ अभिमान ज्यांस असे. ९. तुझे भक्त. १०. अधःपतित आणि भ्रष्टमति होत नाहींत. ११. मित्रपणा. १२. विघ्नें हेच राजे. १३. वाणी. १४. स्वामी ब्रह्मदेवाची. १५. ब्रह्मदेव.